किंमत २ रुपये



फू मांच्यूचा शेवट !

(फू मांच्यू कथा)

— श्री. बाबूराव अर्नाळकर

यमाला

ऑक्टोबर १९५९

डॉ. फू–मांच्यूचा शेवट ?

[डॉ. फू–मांच्यू कथा]

(कादंबरी क्र. ४२१)

: लेखक :

बाबूराव अर्नाळकर

रहस्यरंजन, ३७ वेस्टर्न इंडिया हाउस, फोर्ट : मुंबई नं. १

किंमत दोन रुपये

जयमाला
वर्ष ३ रें अंक ९ वा
क्रमांक ३१
ऑक्टोबर १९५९

डॉ. फू–मांच्यूचा शेवट ?
बाबूराव अर्नाळकर
किमत २ रुपये

★ ★

मुद्रक
ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ,
पुणें २.

प्रकाशक
ना. वि. काकतकर
रहस्यरंजन–प्रकाशन,
महाराजा बिल्डिंग
गिरगांव, मुंबई ४.

कथेसंबंधीं थोडेंसें

अडीच वर्षांच्या कालावधीनंतर मी आज वाचकांच्या हातीं डॉ. फू–मांच्यूची कथा देत आहें. या असामान्य फू–मांच्यूची ही दहावी कथा आहे आणि यापूर्वींच्या सर्व कथांचें वाचकांनीं मनःपूर्वक स्वागत केलें आहे.

फू–मांच्यूच्या या कथांचा जनक सॅक्स से–होमर हा आहे आणि त्याच कथांचे स्वैर अनुवाद मी वाचकांना सादर केले आहेत. हें रूपांतर नसल्यामुळें यांतील सर्व वातावरण युरोप–अमेरिकेंतील असतें आणि नांवेंहि इंग्रजी असल्यामुळें कांहीं वाचकांना या कथा वाचतांना अडखळल्यासारखं होते, असें म्हणणें एकून मी या कथा बंद केल्या होत्या.

पण गेल्या दोन वर्षांत अनेक वाचकांनीं पत्रद्वारें फू–मांच्यूची कथा वाचावयास मिळावी असा आग्रह धरल्यामुळें ही आजची कथा सादर करीत आहें. अर्थातच यापुढील फू–मांच्यूची कथा आपणांला कधीं वाचावयास मिळेल हें मी सांगू शकत नाहीं, पण प्रस्तुत कथा आपणां सर्वांनाच आवडेल अशी माझी खात्री आहे.

बाबूराव अर्नाळकर

डॉ. फू-मांच्यूचा शेवट ?

१

अमेरिकेवर संकट ?

तीन मोटारी एका भव्य ब्रॉंझ धातूच्या दाराजवळ थांबल्या. त्या दारावर येशू ख्रिस्ताचा वेदनायुक्त चेहेरा कोरला होता आणि त्याच्या डोक्यावर कांटेरी मुकूट होता, एक माणूस मोटारींतून उडी घेऊनच खालीं उतरला आणि त्या दाराकडे धांवला. दहा माणसें त्याच्या मागोमाग उतरलीं. त्या उंच मनोऱ्याभोंवतीं वारा घोंघावत होता आणि वरून कोसळणाऱ्या बर्फानें जमिनीवर गालिचा घालण्यास सुरवात केली होती.

चार पहारेकरी जणूं काय जादूप्रमाणें बाजूच्या अंधारांतून अचानक पुढें आले आणि त्या दारासमोर ओळीनें उभे राहिले. त्यांच्यांतील एका पहारेकऱ्यानें दाराकडे येणाऱ्या माणसाला रोखून पाहिलें. त्याला ताबडतोब ओळख पटली आणि तो शिस्तीनें सलाम करीत अदबीनें म्हणाला, 'नमस्ते कॅप्टन.'

ज्याला कॅप्टन म्हणून संबोधण्यांत आलें होतें त्या माणसानें त्याच्या पाठीमागें असलेल्या मंडळींना हलक्या आवाजांत भराभर हुकूम सोडले व नंतर त्या ब्रॉंझच्या दरवाजावरील घंटीचें बटन दाबलें. तें दार इतक्या त्वरेनें उघडण्यांत आलें कीं, आंतल्या बाजूला उभा असलेला बुटका आणि अगदीं

स्त्रीप्रमाणें नीटनेटका पेहेराव केलेला तरुण जणू काय त्या आवाजाचीच वाट पहात होता.

तो माणूस लगबगीनें आंत गेला आणि त्यानें तें भव्य दार बंद केलें. बाहेरची खोली एखाद्या ऑफीसप्रमाणें सजविलेली होती. पण आतां रात्रींची वेळ असल्यामुळें त्या दार उघडणाऱ्या तरुणाखेरीज इतर कुणीच तेथें नव्हतें.

'तुझें नांव रिचेट ना ?' त्या आंत आलेल्या माणसानें विचारलें. 'मला धर्मोपदेशकाकडे घेऊन चल. मी येथें येणार हें त्यांना माहित आहे.'

त्या माणसानें पुढें केलेलें कार्ड पाहून तरुणानें मान लवविली. तो आंत गेला आणि कांहीं क्षणांतच पुन्हां बाहेर येऊन त्यानें त्या पाहुण्याला तेथल्या लिफ्टकडे नेले. पाहुणा त्या मनोऱ्याच्या अगदीं वरच्या टोंकाला असलेल्या एका बैठकीच्या खोलींत गेला. तेथें एकच माणूस बसला होता आणि त्याच्या पुढच्यांतील टेबलावर अनेक ग्रंथ ठेवलेले होते. पाहुण्याला तेथेंच सोडून रिचेट निघून गेला आणि आंतला माणूस हस्तांदोलन करण्यासाठीं उभा राहिला.

तो माणूस उंच आणि सडपातळ होता, वेषावरून आणि चर्येवरून तो धर्मोपदेशक होता हें स्पष्ट होतें.

'तुम्हीं सुरक्षित आहांत याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतों.' पाहुणा म्हणाला.

'ईश्वराचे आभार मानणें आवश्यकच असतें.' धर्मोपदेशक म्हणाला, 'माझ्या कामांत अडथळा येणार हें मी जाणून होतों, पण ही कैद—'

'ती आवश्यक होती. आज संध्याकाळीं तुम्हीं तुमचें रेडिओवरील भाषण अर्धवट सोडल्यानंतर मी विमानानें सातशें मैलांचा प्रवास केला आहे.' तो दुसरा माणूस म्हणाला.

'आपण अधिक चर्चा करण्यापूर्वीं मला एक विनंती करावयाची आहे.' धर्मोपदेशक म्हणाला, 'निनांवी माणसाबरोबर बोलणें अवघड जातें.'

'तुमची अडचण मला मान्य आहे.' तो दुसरा हंसून म्हणाला, 'स्मिथ हें सर्वसामान्य नांव आहे. तेव्हां मला तुम्हीं त्याच नांवानें हांक मारली तर चालेल.'

'ठीक आहे मि. स्मिथ, आज रात्रीं काय घडलें हे जर तुम्हांला माहित असेल तर कृपा करून मला सांगा. मला अनेक तारा आणि टेलिफोन-वरून संदेश मिळाले, पण तुमच्या सूचनेप्रमाणें नव्हे हुकुमाप्रमाणें मी कुणालाहि उत्तर दिलें नाहीं.'

स्मिथ्नें आपला पाईप पेटविला, त्या पाद्र्याकडे टक लावून पाहिलें आणि नंतर विचारलें, 'तुम्हीं बेशुद्ध पडल्यानंतर तुम्हांला सरळ येथें आणण्यांत आलें काय ?'

'होय, खरें म्हटलें तर त्यांनीं मला माझ्या घरीं न्यायला हवें होतें. पण वॉशिंग्टन्हून रहस्यमय सूचना पाठविण्यांत आल्या आणि मला येथें धाडण्यांत आलें. मी शुद्धीवर आलों तेव्हां बाजूच्याच छोट्या खोलींतील पलंगावर होतों.'

'बेशुद्ध पडण्यापूर्वीं तुम्हीं काय करीत होतां हें तुम्हांला आठवतें काय ?' स्मिथनें विचारलें.

'मी मायक्रोफोनसमोर उभा होतों आणि माझ्या हातांत भाषणाचें टांचण होतें.'

'ठीक,' स्मिथ फेऱ्या घालीत म्हणाला, 'माझ्या आठवणीप्रमाणें तुमचे शब्द असे होते, "जर आपणांला घटना शाबूत ठेवायची असेल, जर या देशांतील स्वातंत्र्य अगदीं अल्पप्रमाणांत का होईना राखावयाचें असेल तर देशांत असें एक पाप आहे कीं ज्याचें समूळ उच्चाटन झालें पाहिजे..." नंतर शांतता पसरली. अनेक आवाज ऐकू आले आणि तुम्हीं अचानक आजारी पडला आहांत असें जाहीर करण्यांत आलें. फादर येथपर्यंत तुम्हांला आठवतें काय ?'

'बरोबर आठवत नाहीं.' तो धर्मोपदेशक थकलेल्या स्वरांत म्हणाला 'त्यापूर्वींच माझा स्वतःवरील ताबा नष्ट होऊं लागला होता. मला कसेंसेच वाटत होतें. कल्पना एकत्रित करणें अवघड जात होतें आणि मी उभा होतों ती जागा आळीपाळीनें आकुंचन आणि प्रसरण पावत होती. एका क्षणाला मला वाटे कीं, जणू काय वरचें छत माझ्या अंगावर कोसळत आहे. तर दुसऱ्या क्षणाला वाटे कीं, आकाशाला भिडलेल्या कुठल्यातरी उंच मनो-

त्याच्या तळाशी मी उभा आहें. माझें मन आणि शरीर बधीर बनत चाललें होतें. नंतर काय घडलें तें मला आठवत नाहीं.'

'तुमच्या बरोबर कोण होते?' नेलॅंडनें विचारलें.

'माझे स्वतःचे डॉक्टर रेली हे होते.'

'डॉ. रेली, तुमचा सेक्रेटरी रिचेट आणि तुम्हांला येथें आणणारा ड्रायव्हर याखेरीज इतर कुणाला कांहीं माहित नाहीं ना?'

'नाहीं, मी बेशुद्ध पडल्यानंतर तशी व्यवस्था करण्यांत आली होती.'

'तुमचें भाषणाचें टाचण मिळालें काय!' स्मिथनें विचारलें.

'नाहीं, तें स्टुडिओंतच राहिलें.'

'फादर, तुमचें तें टांचण स्टुडिओंतहि मिळालें नाहीं, पण त्यांत काय लिहिलें होतें तें मला समजलें पाहिजे.'

बाहेर जोराचें वादळ आणि वारा रागानें किंचाळतच तेथल्या खिडक्यांच्या तावदानावर आदळत होता. धर्मोपदेशकानें दुसरी सिगारेट पेटविली आणि तो म्हणाला, 'तुम्हीं या माझ्या भाषणाला आणि माझ्या अचानक आजारीपणाला इतकें कां महत्त्व द्यावें तें मला समजत नाहीं.

स्मिथ खुलासा करण्याच्या भानगडींत पडला नाहीं, तो म्हणाला, 'तुम्हीं राष्ट्राला उद्देशून कोणती सूचना करणार होतां? कोणतें पाप समूळ नष्ट व्हायला हवें होतें?'

त्या ॲबॉट नांवाच्या धर्मोपदेशकाच्या चर्येवर बराच फरक पडला होता. तो आपल्या केसांत बोटें खुपसून म्हणाला, 'मला कांहींच आठवत नाहीं. माझ्या मेंदूवर कांहींतरी परिणाम झाला असावा असें माझ्या डॉक्टरांचें मत आहे.'

'हा जीवन–मरणाचा प्रश्न आहे.' स्मिथ गंभीर स्वरांत म्हणाला, 'तुमच्या भाषणाचें टांचण मिळविलेंच पाहिजे.'

त्यानें आपलें बोलणें अचानक थांबविलें. तो वादळाच्या आवाजाचा कानोसा घेत असावा असें दिसलें, नंतर अचानक पुढें सरकून त्यानें दार उघडलें, बाहेर रिचेट अगदीं वाकून उभा होता!

× × ×

एका चमत्कारिक निमुळतें आणि उंच छत असलेल्या खोलीत एका लांब आणि अरुंद टेबलाजवळ एक विलक्षण माणूस दिसला होता. तेथल्या चार खिडक्यांतून त्या जागेंत बाहेरचा प्रकाश येत होता. पण त्या खिडक्या इतक्या उंचीवर होत्या कीं एखाद्या राक्षसालाच त्यांतून बाहेर डोकावतां आलें असतें.

टेबलाजवळ बसलेल्या माणसाचें वय साठ आणि सत्तरच्या दरम्यान असावें. त्याचें शरीर दणकट होतें, डोक्यावरील केस शुभ्र वर्णाचे आणि बरेच लांब होते. त्याच्या अंगावर जुनाटच झगा होता आणि तो सारखा सिगारेट ओढीत होता, त्याच्या पुढच्यांतील टेबलावर सात टेलिफोन होते, आणि त्यांतील एखादा तरी चालू असे. कधीं कधीं त्याला दोन टेलिफोनचे रिसीव्हर डाव्या आणि उजव्या कानाला लावावे लागत असत. पण तो कुणालाहि उत्तर देत नव्हता, फक्त संदेश ऐकत होता.

अधून मधून तो त्याचें कामहि करीत होता, जवळच्या एका टेबलावर चित्रें तयार करण्याची खडूची माती होती आणि जवळच शिल्पकाराला लागणारीं हत्यारेंहि होतीं, त्यांचा तो उपयोग करीत होता, तो त्या मातीनें एका भयानक चिनी माणसाचें मुंडकें तयार करीत होता.

तो त्या आकृतीचें भव्य नाक नाजूक हातानें तयार करीत असतांना कुठेंतरी अस्पष्ट घंटानाद झाला आणि त्याबरोबर त्या खिडक्यांतून आंत येणारा प्रकाश मंद होऊन तेथें संपूर्ण अंधकार पसरला.

क्षणभर तेथें कोणतीहि हालचाल किंवा आवाज नव्हता. फक्त सिगारेटच्या टोंकाचा प्रकाश दिसत होता. नंतर अचानक अविस्मरणीय असा आवाज झाला.

'तुला आठ नंबरकडून अगदीं अलिकडचा संदेश मिळाला आहे काय ?'

त्या वृद्धानें लागलीच उत्तर दिलें, 'बारा वाजून वीस मिनिटांनीं जो माणूस छपन्न नंबरचा एजंट असें स्वतःला म्हणवितो तो रेडिओ स्टेशनांत पोहोंचला. त्यावेळीहि पोलिसांचा तपास चालू होता. आपल्या अडतीस नंबरच्या माणसानें नुकतेंच कळविलें आहे कीं या माणसाबरोबर एक लष्करी कॅप्टन आणि नऊ माणसें होतीं. नंतर तो माणूस धर्मोपदेशकाला भेटावयास

गेला. त्या विभागावर अगदीं बारकाईची नजर आहे पण अद्याप नवीन बातमी नाहीं.'

'ज्या नंबरवर भाषणाच्या टांचणाची जबाबदारी सोंपविण्यांत आली होती त्याचें काय ?'

'त्यानें अद्याप रिपोर्ट पाठविला नाहीं.' वृद्धानें उत्तर दिलें.

पुन्हां अस्पष्ट घंटानाद झाला, चारी खिडक्यांतून प्रकाश आंत आला आणि त्या वृद्ध शिल्पकारानें पुन्हां चिन्याचें मुंडकें तयार करण्यास सुरवात केली.

+ + ×

मनोऱ्यांतील अगदीं वरच्या भागांत आलेल्या धर्मोपदेशकाच्या बैठकीच्या खोलीबाहेर त्या छपन्न नंबरच्या अधिकाऱ्यानें रिचेटला अचानक गांठतांच त्या ऐटबाज तरुणाची बरीच त्रेधा उडाली होती.

'रिचेट, तूं अचानक येथें यावेंस त्याबद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं. स्मिथ् त्याच्याकडे रोखून पहात म्हणाला, 'तुझी आम्हांला बरीच मदत झाली आहे. शनिवारीं सकाळीं याच जागेंत ॲबॉटना डॉक्टर प्रेसकॉट् भेटावयास आले होते आणि त्यांनींच भाषणाच्या उत्तरार्धाचा मालमसाला सोडविला असें तूं सांगितलें आहेस.'

'माझी तशी समजूत आहे. अर्थातच त्या मुलाखतीच्या वेळीं मी हजर नव्हतों.' रिचेटनें उत्तर दिलें.

'फादर, डॉक्टर प्रेसकॉट् हे अध्यक्षाच्या निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून उभे राहिलेले आहेत. पण तुम्हीं तुमचीं व्याख्यानें आणि भाषणें याच खोलींत तयार करीत असतां आणि तीं रिचेट तपासून पहातो हें खरें नाहीं काय ?' स्मिथ्नें विचारलें.

'तें खरें आहे.' धर्मोपदेशक म्हणाला.

'यामुळें परिस्थिति स्पष्ट होते.' स्मिथ् रिचेटकडे वळून म्हणाला, 'सुरवातीचें भाषण तूंच तयार केलें होतेंस ना ?'

'होय, मी तुम्हांला त्याची नक्कल दाखविली आहे. राहिलेला भाग आपण पूर्ण करूं असें फादर म्हणाले होते आणि आम्हीं रेडिओ स्टेशनकडे

जात असताना आपण तें भाषण पूर्ण केलें असें ते मला वाटेंस म्हणाले होते.' रिचेट म्हणाला.

'आणि ते अचानक आजारी पडल्यानंतर ?' स्मिथ्‌नें विचारलें.

'त्यानंतर मी लागलींच स्टुडिओकडे गेलों पण भाषणाचें टांचण टेबलावर नव्हतें.'

'ठीक आहे रिचेट, तूं आतां जा.'

रिचेटचें कपाळ घामानें थब्‌थब्‌लें होतें, त्यानें मुळींच आवाज होऊं न देतां दार बंद केलें.

'स्मिथ्, माझी अशी परिस्थिति होईल अशी मला कल्पना नव्हती. डॉ. प्रेसकॉट् भेटावयास आले होते हें मला मुळींच आठवत नाहीं. मी मायक्रोफोनसमोर उभा राहिलों आणि माझी बुद्धी व शक्ति मला सोडून जात आहे असें वाटलें. गेल्या अठ्ठेचाळीस तासांत काय घडलें तें मला मुळींच आठवत नाहीं. प्रेसकॉट येथें आले आणि त्यांनीं मला कांहींतरी महत्त्वाचें सांगितलें, पण काय सांगितलें ? स्मिथ्, ती माहिती राष्ट्राला कळूं नये या उद्देशानें कुणीतरी माझ्यावर कांहीं चमत्कारिक प्रयोग केला असावा असें तुम्हांला वाटतें काय ?'

'फादर, तुम्हीं जिवंत राहिलां हें तुमचें सुदैव म्हटलें पाहिजे.'

'पण हें काम कुणाचें असावें ? आणि त्यानें कसें साधलें असावें ?'

'पहिल्या प्रश्नाचें उत्तर मी देऊं शकेन. जर तुमचें भाषणाचें हस्तलिखित सांपडलें तर मी दुसऱ्या प्रश्नाचें कदाचित् उत्तर देऊं शकेन, पण बहुधा तें नष्ट करण्यांत आलें असावें. रिचेट तुमच्याजवळ केव्हांपासून आहे?'

'जवळ जवळ वर्षभर,' फादर ॲबॉट म्हणाला.

'फादर, एक गोष्ट स्पष्ट आहे. डॉ प्रेसकॉटना अतिशय धोका आहे, आणि तुम्हांलाहि आहे.'

'पण निवडणुकीला प्रतिस्पर्धी म्हणून फक्त हार्वे हे एकटेच उभे आहेत. तुम्हीं त्यांच्यावर आरोप करणार काय ?'

'प्रिय फादर, हार्वे या डावाचें एक छोटेंसें प्यादें आहेत.' स्मिथ् हंसून म्हणाला.

' पण तरीहि ते अमेरिकेचे प्रेसिडेंट होतील. '

' ते हुकूमशहा खात्रीनें होतील. ' स्मिथ् म्हणाला. ' फादर, ते निवडणुकीसाठीं अमाप पैसा खर्च करणार आहेत. त्यांना तो कोठून मिळतो तें तुम्हांला माहित आहे काय ? '

' नाहीं. पण त्यांना अनुयायी मात्र खूप आहेत. मी जनतेला शहाणी आणि निष्पाप बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. पण स्मिथ, यंत्रानें माणसाला वेडें बनविलें आहे. जसजसें यंत्र ईश्वराप्रमाणें चमत्कार करूं लागलें आणि शास्त्र अणुगोलापर्यंत पोहोंचलें तसतशी मानवाची अधोगति झाली. ज्या दिवशीं हें यंत्र चंद्र-मंगळापर्यंत पोहोंचेल तेव्हां नैतिकदृष्ट्या मानवाला जगांतील रानटी जनावराइतकीहि किंमत रहाणार नाहीं. '

स्मिथ एका खुर्चीवर बसला आणि म्हणाला, ' हार्वेला एका माणसाची मदत आहे आणि युरोप ते अशिया, आशियाहून दक्षिण अमेरिका आणि दक्षिण-अमेरिकेपासून उत्तरेपर्यंत मी त्याच माणसाचा पाठलाग करीत आहें. आज युरोप -अमेरिकेची सर्व शक्ति त्या एकाच माणसाचा पाडाव करण्यासाठीं खर्च केली जात आहे आणि आज तो येथें आहे. '

' पण स्मिथ्, त्याचें नांव काय ? '

' फादर तुमच्याच हिताच्या दृष्टीनें त्याचें नांव न कळणें चांगलें. '

धर्मोपदेशकानें स्मिथ्च्या पोलादी नजरेला क्षणभर आपली नजर भिडविली आणि तो म्हणाला, ' मला ही तुमची सूचना मान्य आहे, मग तो माणूस कुणीहि असो. पण तोच हार्वेला मदत करीत आहे काय ? '

' फादर, तुम्हांला मी फक्त एकच गोष्ट सांगूं शकेन. ' स्मिथ् म्हणाला, ' पुन्हां माझ्याकडून कांहीं समजेपर्यंत तुम्हीं ही जागा सोडूं नका. '

' म्हणजे, कैद्याप्रमाणें रहा असेंच ना ? पण स्मिथ्, ईश्वराच्या उपासनेकडे मला दुर्लक्ष करतां येणार नाहीं. उद्या सकाळीं आठ वाजतां प्रार्थनेसाठीं मला चर्चमध्यें हजर राहिलेंच पाहिजे. मला कितीहि धोका असो, पण या माझ्या कर्तव्यांत कसूर होतां कामा नये. '

स्मिथ् उठून म्हणाला, ' फादर तुम्हीं माझा सल्ला ऐकण्यास तयार नाही. तेव्हां ईश्वरच तुमचें संरक्षण करो ! '

'ईश्वर सर्वांचेच संरक्षण करतो!'

स्मिथ तेथूनच बाहेर पडला आणि तेथें उभ्या असलेल्या लष्करी अधिकाऱ्याला म्हणाला, 'हेपबर्न, डॉ. प्रेसकॉटना टेलिफोन कर आणि मी तेथें जाईपर्यंत त्यांनीं आपल्या घराबाहेर एक पाऊलहि टाकतां कामा नये अशी त्यांना सक्त ताकीद दे, आणि आपण शक्य त्या त्वरेनें तेथें पोहोंचू अशी व्यवस्था कर. त्याचप्रमाणें इथल्या रिचेटवर नजर ठेव. त्याचप्रमाणें फादरवर रात्रंदिवस नजर राहील अशी व्यवस्था कर. त्यांचे प्राण मौल्यवान आहेत. कुणीहि या जागेजवळ येण्याचा प्रयत्न केला तर त्याला ताबडतोब अटक कर.'

'पण तुम्हीं कुठें चालला आहांत?' कॅप्टननें विचारलें.

'मीं फादरची रहाण्याची जागा तपासणार आहें.' स्मिथ म्हणाला, 'मी तुम्हांला स्टेशनवर भेटेन.'

२

डॉ. फू–मांच्यू

कॅप्टन हेपबर्ननें एजंट नंबर छपन्नकडून त्याला मिळालेल्या सूचना तंतोतंत अंमलांत आणल्या. अमेरिकेच्या अध्यक्षांवरच कांहीं संकट कोसळणार आहे अशी त्याला अंधुकशी जाणीव झाली होती. त्याला हुकूम देणारा माणूस अमेरिकनहि नव्हता, पण तो त्याला आवडूं लागला होता. त्यामुळें त्यानें याच्यावर सोंपविलेलें काम अगदीं चोख बजाविलें होतें.

तो आपल्या मोटारींत बसणार होता तोंच त्याला कांहीं संशय आला आणि तो मनोऱ्याच्या एका बाजूला गेला. आकाशांतून होणाऱ्या झंझावाती हिम वर्षावामुळें कांहींच स्पष्ट दिसत नव्हतें, पण मनोऱ्याच्या त्या बाजूची

खिडकी उघडली जात आहे असें त्याला वाटलें म्हणून त्यानें त्या खिडकी-खालींच दडी मारली.

वरून आवाज ऐकूं आला, 'मार्ग मोकळा आहे, तुला आतां जायला कांहीं हरकत नाहीं.' तो आवाज रिचेटचा होता.

नंतर कुणींतरी वरून उडी घेतली आणि खिडकी बंद झाली. हेपबर्ननें आपला हात पुढें करून खालीं उडी घेणाऱ्या त्या व्यक्तीला पकडलें आणि कधीं पाहिले नव्हते इतके सुंदर डोळे त्याला पहावयास मिळाले.

ती तरुणी होती. ती मध्यम उंचीची होती, पण सडपातळ असल्यामुळें अधिक उंच दिसत होती. जोरदार वाऱ्यापासून बचाव व्हावा यासाठीं तिनें आपल्या देहावर पायघोळ गरम कोट चढविला होता आणि गरम टोपीखालीं तिनें आपले कुरळे केस झांकले होते. तिनें आपल्या एका खांद्यांत एक कातडी बॅग अडकविली होती आणि हेपबर्ननें तिला घट्ट पकडतांच ती इतकी घाबरली होती कीं तिच्या हृदयाचे ठोके त्याला स्पष्ट ऐकूं येत होते. इतकी सुंदर तरुणी त्यानें कधींच पाहिली नव्हती.

'तूं कोण आहेस ? आणि काय करीत आहेस ?' त्यानें कठोर स्वरांत विचारलें.

ती कांपऱ्या आवाजांत म्हणाली, 'माझें नांव मिसेस् अडेर, मी फादर-कडे कामाला असतें. कुणाला यथून जाऊं द्यावयाचें नाहीं असा विचित्र हुकूम सोडण्यांत आल्यामुळें मला हा मार्ग पत्करावा लागला, मला घरीं गेलें पाहिजे, मी तो हुकूम जुमानणार नाहीं.'

'तुझें घर कुठें आहे ?' कॅप्टननें विचारलें.

'त्याच्याशीं तुम्हांला कांहींच कर्तव्य नाहीं.' ती रागानें म्हणाली, 'तुम्हीं फादरना बोलवा, ते तुमची खात्री पटवितील. मला सोडा, मी थंडीनें कुडकुडत आहें.'

कॅप्टन हेपबर्ननें तिचा हात आपल्या पोलादी पकडींत घट्ट पकडला होता. तो म्हणाला, 'प्रथम मला सांग, या बॅगेंत काय आहे ?'

'फादरचे खाजगी कागद आहेत. मी ते घरीं काम करण्यासाठीं नेत आहें.'

‘तर मग ते मला पाहिलें पाहिजेत.’

‘मी तें देणार नाहीं, तुम्हांला ते पहाण्याचा कांहींच अधिकार नाहीं.’ ती म्हणाली.

हेपबर्ननें ती बॅग खेचून घेतली आणि तो म्हणाला, ‘तुझ्याशीं कठोरतेनें वागण्याची माझी इच्छा नाहीं, पण सध्यांतरी माझें काम तुझ्यापेक्षां कितीतरी महत्त्वाचें आहे. एका तासानंतर ही बॅग तुझ्याकडे पाठविण्यात येईल. माझा मदतनीस जॉनसन तुला मोटारीनें तुझ्या घरीं पोहोंचवील.’

त्यानंतर त्यानें तिला खेचीतच पुढें नेलें. आपल्या मदतनिसानें त्या ठिकाणीं पहारा ठेवूं नये यामुळें तो संतापला. छपन्न नंबरच्या एजंटानें त्या जागेचा बंदोबस्त करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली होती. ती त्याच्या हाताला लोंबकळली होती. तो तरुण आणि अविवाहित होता. जगांत इतकी सौंदर्यसंपन्न तरुणी असूं शकेल असें त्याला पूर्वीं कधींहि वाटलें नव्हतें.

ती त्याच्याबरोबर दहा-पंधरा पावलें गेली. नंतर अचानक त्याचा हात खेंचण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, ‘कृपा करून माझें ऐका तरी!’

तो थांबला, ती हंसत होती, तिचें तें हास्य कारुण्यपूर्ण होतें, पण तितकेंच विलोभनीय होतें. डोळ्यांतील अश्रू बाहेर पडूं नयेत असा तिचा प्रयत्न होता. हेपबर्नचें हृदय विरघळलें, पण तो स्वभावानें संशयी होता. राष्ट्राविरुद्ध कांहींतरी कारस्थान शिजत होतें आणि त्यांत ती तरुणी भाग घेत होती.

‘माझें जास्त मागणें नाहीं,’ ती म्हणाली, ‘मला ती बॅग द्या, आणि माझ्या वाटेनें मला जाऊं द्या. उद्यां मी तुम्हीं सांगाल त्या ठिकाणीं तुम्हांला भेटेन आणि हवा असलेला खुलासा करीन.’

तिच्याकडे पाहिल्यास आपणाला भलताच मोह पडेल अशी भीति त्या तरुण कॅप्टनला वाटली. तो दुसरीकडे मान वळवून तिला पुढें खेचीत म्हणाला, ‘जॉन्सन तुला मोटारीनें घरीं पोहोंचवील. तूं म्हणतेस त्याचप्रमाणें जर कागद बॅगेंत आहेत अशी जर माझी खात्री पटली तर ती ताबडतोब तुझ्याकडे परत पाठविण्यांत येईल.’

× × ×

त्या उंच छताच्या खोलींत वृद्ध शिल्पकार हिडीस चिन्याचें डोकें तयार करण्यात गढला असतांना त्याच्या पुढ्यांतील सात टेलिफोनपैकीं एकाची घंटी वाजली आणि तो रिसीव्हर कानाला लावून ऐकूं लागला.

'माझा नंबर बारा.' एका स्त्रीचा आवाज ऐकूं आला. 'मी आठ नंबरच्या तळावरून बोलत आहें. मी त्या मनोऱ्यांतून निसटण्यांत यश मिळविलें. पण दुर्दैवानें मला त्या एका अधिकाऱ्यानें पकडलें. मला लेफ्टनंट जॉन्सननें एका पत्त्यावर पोहोंचविलें मी त्याला तोंडांत आलें तें सांगितलें. पाठी-मागें आपली मोटार होतीच. बर्फ पडत असल्यामुळें मी जॉन्सनच्या मोटारी-तून आपली मोटार गांठली. पण पहिल्या अधिकाऱ्यानें माझ्याजवळची बॅग काढून घेतली. त्यांत भाषणाचें हस्तलिखित होतें. पुढील सूचनांची वाट पहात मी येथेंच थांबलें आहे.'

शिल्पकारानें रिसीव्हर खालीं ठेवून आपल्या कामाला सुरवात केली आणखी दोन वेळां त्याला आपलें काम थांबवावें लागलें होतें. एकदां कॅलि-फोर्निया येथून आणि दुसरा न्यूयॉर्क येथून टेलिफोन आला होता. वृद्ध शिल्प-कार कांहीं लिहून घेत नव्हता. आणि कधींच उत्तर देत नव्हता. तो आपलें काम एकतानतेनें करीत होता.

नंतर घंटी वाजली, प्रकाश बंद झाला आणि अंधारांतून अविस्मरणीय आवाज ऐकूं येऊं लागला.

'हार्वे संबंधींचा अगदी अलिकडचा रिपोर्ट काय आहे ?'

'शेवटचा रिपोर्ट एक तास आणि सतरा मिनिटांपूर्वी आला. त्यांच्या स्वागतासाठीं वीस हजार लोक जमले होते. त्यांनीं त्याच्या घोषणांचें विशेष उत्साहानें स्वागत केलें नाहीं. अमेरिकेंतील बेकारी अजिबात नष्ट होईल ही एक घोषणा मात्र लोकांना आवडली.'

'अद्याप बारा नंबरचा रिपोर्ट कसा आला नाहीं ?'

'तो रिपोर्ट दोन वाजून पांच मिनिटांनीं आला.' वृद्ध म्हणाला, आणि माहिती देऊं लागला. त्या वृद्धाची स्मरणशक्ति इतकी आश्चर्यचकित होती कीं त्यानें त्या बाईचा शब्द न शब्द सांगितला.

नंतर घंटानाद झाला. ती खोली प्रकाशित बनली आणि शिल्पकार आपलें काम करूं लागला.

+ + +

धुक्यांतून ती वेगवान खास आगगाडी धांवत होती. स्मिथ कॅप्टन हेपवर्नच्या समोर बसला होता आणि इतर सात माणसें आजूबाजूला बसलीं होती.

'हेपबर्न, ते या आगगाडीवर हल्ला करणार नाहींत. कारण आपणांजवळ फादरच्या रेडिओवरील भाषणाचें हस्तलिखित आहे. तूं खरोखरच फार चांगली कामगिरी बजाविलीस.' स्मिथ म्हणाला, 'तूं रिचेटच्या अटकेची व्यवस्था केलीस हें चांगलें झालें. डॉक्टर प्रेसकॉटना सत्य समजलें आहे तें कसें समजलें हें आपणांला समजावून घ्यायचें आहे.'

'हेपवर्न, तूं तें हस्तलिखित वाचलें आहेस. तें फादरनें आपल्या हस्ताक्षरांतच लिहिलें आहे. ऐनवेळीं ते बेशुद्ध कसे पडले हेंहि मी शोधून काढलें आहे. रिचेटनें जेव्हां टाईप केलेले कांहीं कागद त्यांच्या हातीं दिले. तेव्हां ते प्रत्येक पान उलटताना जिभेला बोट लावीत होते. त्यांना ती संवय आहे आणि ती गोष्ट मोठी सूचक आहे.'

'त्यांत सूचकता काय तें मला समजत नाहीं.'

'जरा विचार करून पहा.' स्मिथ म्हणाला, 'ती बाई तुझ्या हातांतून निसटली त्यामुळें तूं खिन्न झाला आहेस तें मला माहित आहे. पण आपणांला जें हवें होतें तें तूं मिळविलें आहेस, त्या बाईला पकडणें हा केवळ कालावधीचा प्रश्न आहे. पण हस्तलिखित मिळालें हा महत्वाचा प्रश्न आहे. एक बाहेरची संस्था या देशाचा कसा ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे ती सर्व माहिती त्यांत आहे.'

हेपबर्ननें ती माहिती वाचली होती. तो साधा माणूस फार भयंकर कारस्थानासंबंधींची माहिती वाचतांच दिङमूढ बनला होता. त्यासाठींच त्याला सर नेलँड स्मिथचा मदतनीस बनविण्यात आलें होतें.

एकाएकीं गाडीला जोराचा ब्रेक लावण्यांत आला. आणि त्या नऊहि

ज...२

इसमांना जोराचा हादरा बसला. नेलँड स्मिथ उभा राहिला आणि ओरडून म्हणाला, ' हेपबर्न, दोन माणसें बरोबर घेऊन ड्रायव्हरकडे जा आणि त्याला सांग, कांहीं झालें तरी गाडी थांबतां कामा नये आणि इथले दिवे मालवा.

हेपबर्न धांवला. दिवे मालविण्यांत आले, पुन्हां गाडी वेगानें धांवू लागली. नेलॅण्ड स्मिथ खिडकीकडे खालीं वाकून पहात होता. त्याला बरींच माणसें हातांत मशीनगन्स घेऊन अंधारांत उभीं असलेलीं दिसलीं. आगगाडी जर थांबविण्यांत आली असती तर त्या नऊहि जणांची कत्तल झाली असती.

ठराविक ठिकाणीं आणि ठराविक वेळीं ती खास आगगाडी पोहोंचली. तेथें वेगवान मोटारी तयार होत्या. ते प्रेसकॉटच्या निवासस्थानाजवळ पोहोंचले तेव्हां वादळाचा जोर ओसरला होता. पण अंधार मात्र मी म्हणत होता. दुरूनच त्यांना कांहीं माणसें मशाली आणि कंदिल हातीं घेऊन कांहीं-तरी शोधीत आहेत असें दिसलें.

नेलॅण्ड स्मिथ आणि हेपबर्न मोटारींतून उड्या घेऊनच खालीं उतरले आणि धावत त्या माणसांजवळ गेले. डॉ. प्रेसकॉट नाहींसे झाले आहेत असें त्यांना सांगण्यात आलें.

' अरे देवा ! हेपबर्न, इतकी धांवपळ करून आपणाला उशीर झाला.' नेलँड हाताच्या मुठी आंवळीत म्हणाला.

त्या प्रवासांत त्यांना आणखीहि वाईट बातमी मिळाली होती. मिसेस अडेर तर त्यांच्या हातून निसटली होतीच पण हेपबर्ननें ज्याला अटक करण्याची व्यवस्था केली होती तो रिचेटहि नाहींसा झाला होता.

डॉ. प्रेसकॉटच्या घराचें दार उघडेंच होतें. बाहेरच्या दिवाणखान्यांत एक उंच आणि अतिशय सडपातळ माणूस एका वृद्ध स्त्री–बरोबर बोलत होता. दुरून नोकर डोकावत होते. त्यांच्या मुद्रा घाबरलेल्या दिसत होत्या.

कॅ. हेपबर्ननें पुढें होऊन त्या बाईला विचारलें, ' आपणच मिस् लेकिन काय ? '

' नाहीं, मी त्यांची मैत्रीण आणि सहचरी आहें. माझें नांव एल्सी. ' ती वृद्धा म्हणाली.

' इथला टेलिफोन कुठें आहे ? ' नेलँड स्मिथनें विचारलें.

‘ कांहीं तासापूर्वीच आमचा टेलिफोन बिघडला.’ ती म्हणाली.

‘ त्यामुळें बराच खुलासा होतो. ’ नेलँड स्मिथ म्हणाला. नंतर तो त्या हडकुळ्या माणसाकडे वळून म्हणाला, ‘ आपण कोण ?’

‘ मी शेरीफ आहें. मला या जागेचें संरक्षण करण्याचा हुकूम मिळाला होता. ’

‘ हुकूम माझाच होता, पण तुम्हीं त्या हुकूमाची अंमलबजावणी मात्र खूप केलीत ! ’ स्मिथ म्हणाला.

‘ मी माझें कर्तव्य केलें आहे. ’ तो माणूस रागानें म्हणाला, ‘ अंधार पडल्यानंतर डॉ. प्रेसकॉट या घरांतून निसटले. पण त्यांना कुणीच पाहिलें नाहीं. जो माणूसच येथें नाहीं त्याचें मी संरक्षण कसें करणार ?’

‘ टेलिफोन कधीं बंद पडला ? ’ स्मिथनें विचारलें.

‘ तीन वाजून पांच मिनिटांनीं. ’

‘ डॉ. प्रेसकॉटना शेवटून असें कुणी पाहिलें ? ’

‘ मिस् लेकिननें पाहिलें, त्यावेळीं ती आपल्या बैठकीच्या खोलींत बसून पत्र लिहीत होती. मिस् लेकिन ही त्यांची चुलत बहीण आहे हें तुम्हांला माहित असेलच ? ’

‘ आणि तुम्हीं कधीं येथें आलांत ? ’ नेलँडनें शेरीफला विचारलें.

‘ डॉक्टर नाहींसे झाल्यानंतर वीस मिनिटांनीं. ’

‘ डॉक्टरांनीं जीं पत्रें लिहिलीं, त्यांना कुणी स्पर्श केला आहे काय ?’ नेलँडनें विचारलें.

‘ नाहीं मिस्टर स्मिथ, ’ ती वृद्धा म्हणाली.

‘ ठीक आहे, मी परत येइपर्यंत कुणालाहि त्यांच्या खोलींत जाऊं देऊं नका. मला डॉक्टरांची झोपण्याची जागाहि तपासावयाची आहे. ’

रागावलेल्या शेरीफनें नुसती मान डोलविली. स्मिथ बाहेर जाणार होता पण त्याच वेळीं दोन माणसें आणि एक स्त्री आंत आली. तीहि स्त्री वृद्ध होती पण तिचें शरीर ताकदवान होतें, तिच्याबरोबर असलेल्या दोघांनीं हेपबर्नला पहातांच लष्करी शिस्तीनें सलामी दिली.

नेलँड स्मिथ पुढें होऊन तिला म्हणाला, ‘ मी स्मिथ, आणि हें कॅप्टन

हेपबर्न. तुम्हीं मिस लेकिन्, डॉक्टरांचें संरक्षण करण्याची जबाबदारी माझ्या· वर सोंपविण्यात आली होती, पण मी माझें कर्तव्य करूं शकलों नाहीं, अशी भीति वाटते.'

'मलाहि भीति वाटते. त्यांनीं त्याला गांठलें असावें.' ती म्हणाली, 'अर्विन, येथें विश्रांतीसाठीं आणि सुरक्षिततेसाठीं आला होता. त्याला कांहीं-तरी समजलें होतें. त्यानें मला सांगितलें असतें तर फार बरें झालें असतें.'

'मिस् लेकिन, तुम्हीं अशा निराश होऊं नका.' नेलँड म्हणाला, 'जें डॉक्टरांना माहित होतें तें इतरांनाहि समजलें आहे.'

पण त्याच वेळीं टेलिफोनची घंटी वाजली. टेलिफोनची दुरुस्ती कर-ण्यांत आली असावी असें दिसलें. टेलिफोनवरून कुणीतरीं नेलँड स्मिथची विचारणा करीत होतें.

'मीच नेलँड' तो रिसीव्हर कानाला लावून म्हणाला, 'कोण बोलत आहे?'

क्षणभर शांतता पसरली आणि नंतर रिसीव्हरमधून आवाज ऐकूं आला, 'सर डेनीस नेलँड स्मिथ, मी कोण हें सांगण्याची आवश्यकता आहे काय?'

'नाहीं डॉ. फू-मांच्यू, पण एखाद्या डावांत आपला हात आहे हें तूं इतक्या लवकर यापूर्वीं कधींच दाखविलें नव्हतेंस.'

'डॉक्टर, आपण दोघेहि परक्या देशांत आहोंत आणि यावेळीं मी तुम्हांला चिरडण्याची प्रतिज्ञा केली आहे.'

'सर डेनिस, तुम्हांला तें यश मिळणार नाहीं, या खेपेचा प्रश्न फार मोठा आहे. या राष्ट्राच्याच नव्हे तर सर्व जगाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. कांहीं लोकांना माझा हेतु समजत नाहीं, उदाहरणार्थ, डॉक्टर प्रेसकॉट, त्यांचा अतिशय गैरसमज झाला.' डॉ. फू-मांच्यू म्हणाला.

नेलँड स्मिथनें मान हलवूनच हेपबर्नला इषारा केला, आणि तो पुन्हां डॉ. फू-मांच्यूचें बोलणें ऐकूं लागला.

'सर डेनीस, तुम्हांला एक हस्तलिखित मिळालें असल्यामुळे तें रेडिओवरील भाषण अचानक कां बंद पडलें हें समजतें असणार? त्या

धर्मोपदेशकाच्या सुरक्षिततेसाठीं आणि डॉ. प्रेसकॉटच्या सुरक्षिततेसाठी तुम्हीं पुढील हालचाल करतांना नीट विचार करा असा माझा तुम्हांला सल्ला आहे.'

नेलँडच्या चर्येवर त्याहि परिस्थितींत थोडें समाधान पसरलें. डॉक्टर प्रेसकॉट अद्याप जिवंत होते !—

'सर डेनीस, त्या फादर अॅबॉटच्या धैर्याबद्दल आणि वक्तृत्वशैली-बद्दल मलाहि आदर आहे, पण मी माझ्या ध्येयाकडे सरकत असतांना जे कुणी माझ्या मार्गांत आडवे येतील त्यांना कापून काढल्याशिवाय दुसरें गत्यं-तरच नाहीं. सर डेनीस, ही शेवटची आणि निर्णायक स्वरूपाची लढाई आहे—'

अचानक बोलणें बंद झालें आणि नेलँड ओरडून म्हणाला, 'हेपबर्न, धांवत जाऊन जवळचा टेलिफोन गांठ आणि आतां बोलणारा माणूस कुठून बोलत होता हें शोधून काढण्याची व्यवस्था कर. आज रात्रीं तुला काहीं झालें तरी फादर अॅबॉटशीं संधान जुळविलें पाहिजे. डॉ. फू-मांच्यू फक्त एकदांच सूचना देतो—'

३

न्यूयॉर्कमधील हालचाली

कॅ. हेप्बर्न एका सूक्ष्मदर्शक यंत्रांतून कागदाच्या तुकड्याप्रमाणें दिस-णाऱ्या वस्तूची पहाणी करीत होता. आणि जांभयाहि देत होता. ज्या छोट्या खोलींत तो काम करीत होता ती एखाद्या प्रयोगशाळेप्रमाणें सजविलेली होती.

हेप्बर्ननें सिगारेट पेटविली आणि तेथल्या बंद खिडकींतून पाहिलें, त्याच्यासमोर न्यूयॉर्क शहराचा बराच मोठा भाग पसरला होता. तो काम करीत होता ती खोली जगांतील अत्युच्च इमारतींतील चाळीसाव्या मजल्या-वर होती.

एकाएकीं तो दचकला आणि त्यानें मागें वळून पाहिलें, तेव्हां त्याला नेलँड स्मिथ्‌चा काळा–सांवळा पण उत्सुक चेहेरा दिसला.

' सर डेनीस, किती मी दचकलों. तुम्हीं एखाद्या मांजराप्रमाणें हाल-चाली करतां.'

' तें जाऊं दे, पण तूं तो शोध लावलास काय ?'

' होय, तो कसलातरी गोंदासारखा चिकट पण विषारी पदार्थ आहे आणि तो फादरच्या हस्तलिखिताच्या खालच्या कोपऱ्यांना लावण्यांत आला होता. पण सर डेनीस, तुम्हीं येथें आहांत हें त्यांना माहित झालें असणार ?'

' अर्थातच माहित असणार.' आपल्या अंगावरील पायघोळ कोट काढीत नेलँड म्हणाला. त्याच्या अंगावर त्यावेळीं न्यूयॉर्कच्या पोलिसाचा पेहेराव होता. ' पण मी येथें असणें त्यांच्या दृष्टीनें धोक्याचें आहे.'

' ते तुमच्यावर उघड हल्ला करतील असें तुम्हांला वाटतें काय ?'

नेलँड हंसून म्हणाला, ' आपल्या खास आगगाडीवर हल्ला करण्यासाठीं त्यांनीं मशीनगन्ससह कित्येक माणसें पाठविलीं होतीं हें तूं पाहिलेंच आहेस ? आज संध्याकाळीं मी एका टॅक्सीतून जात असतांना माझ्या पाठीमागें हत्यारबंद माणसांनीं भरलेली एक मोटार धांवत होती. माझा टॅक्सी ड्रायव्हरहि त्यांना सामील झालेला दिसला. मी मोठ्या शिताफीनें टॅक्सीबाहेर उडी घेऊन निसटलों म्हणून वाचलों. हेपबर्न, आतां तुला आणि मलाहि अदृश्य झालें पाहिजे. कारण आपला लढा सामान्य माणसाशीं नसून डॉ. फू–मांच्यूशीं आहे.

' फू–मांच्यूची संघटना जबरदस्त आहे. तुम्ही बदमाशांना पकडतां, पण त्यांचा सूत्रधार कोण हें तुम्हांला कधींच समजणार नाहीं. आतां त्या सर्वांचा सार्वभौम सम्राट येथें आला आहे. पण आधीं आपण आतांपर्यंत घडलेल्या घटनांचा आढावा घेऊं.

' फादर अॅबॉटच्या हस्तलिखिताच्या प्रत्येक पानाच्या टोंकाला कसलातरी चमत्कारिक विषारी पदार्थ लावण्यांत आला होता हें तूं शोधून काढलें आहेस, जिभेनें ओलावलेल्या बोटानें पानें उलटण्याची फादरची

संशय रिचेटकडून शत्रूला समजली होती. त्याच युक्तीनें त्यांच्यावर विष-प्रयोग करण्यांत आला. हेपबर्न, हें सर्व तुझ्या लक्षांत आलें ना ?

'होय, माझ्या लक्षांत आलें.' हेपबर्न म्हणाला.

'तशाच तऱ्हेचा विषारी पदार्थ डॉ. प्रेसकॉट वापरीत असत. त्या लिफाफ्यांना, पोष्टाच्या तिकीटांना आणि कागदांना लावण्यांत आला होता, प्रेसकॉट जेव्हां बाहेर पडले तेव्हां ते त्या विषारी औषधाच्या गुंगींत होते. आणि त्यांना तेथून मोटारीनें पळविण्यांत आलें, आपल्या माहितीप्रमाणें ती मोटार या न्यूयॉर्क शहराकडेच आली असावी असें दिसतें.'

'पण प्रेसकॉटच्या कागदपत्रांना कुणी हात लावला होता असें म्हणा-वयास आपणांजवळ कांहींच आधार नाहीं.' हेप्बर्न म्हणाला.

'सध्यांतरी नाहीं.' नेलँड खिडकीजवळ जाऊन म्हणाला, 'हेप्बर्न, बाहेर लक्षावधि दिवे चमकत आहेत आणि तेथेंच कुठेंतरी डॉक्टर प्रेसकॉटना दडविलें असावें.'

'मला वाटतें तुमचें म्हणणें बरोबर आहे.' हेप्बर्न म्हणाला.

'वॉशिंग्टन शहरापेक्षां न्यूयॉर्कलाच फू-मांच्यूनें आपला तळ ठोकला असावा. गेले कांहीं महिने तो आपल्या हस्तकांमार्फत हालचाली करीत आहे आणि इतर त्याच्याभोंवती गोळा होत आहेत. आज सकाळींच लंडनहून मला अशी बातमी मिळाली आहे कीं एक निर्ढावलेला बदमाश विसाव्या खेपेला स्कॉटलंड यार्डच्या हातून निसटला आहे आणि तो सध्यां येथें असावा असा त्यांचा अंदाज आहे. प्रेसकॉटना फू-मांच्यूनें येथेंच आपल्या मुख्य तळावर आणलें असावें. त्यांचे कोणत्याप्रकारें हाल करण्यांत येत असतील याची मला कल्पनाहि करतां येत नाहीं.'

'पहा हेप्बर्न, आतां धुकें नाहिसें झालें आहे. तो पहा स्वातंत्र्यदेवीचा पुतळा ! जर आपणांला आपल्या प्रयत्नांत अपयश मिळालें तर तो पुतळा जागेवर रहाणार नाहीं.'

'पण सर डेनीस, आपणांला अपयश मिळणारच नाहीं.'

'शाबास !' नेलँड त्याचा खांदा पकडून म्हणाला, 'डॉ. फू-मांच्यू

हा चिनी आहे, त्याला जर या शहरामधें आपला मुख्य तळ ठोकायचा असला तर तो कोणती जागा पसंत करील ?'

'चायना टाऊन.' हेप्‌बर्न म्हणाला.

× × ×

त्या उंच छताच्या छोट्या खोलींत वृद्ध शिल्पकाराचें चिनी मुंडकें तयार करण्याचें काम चालू होतें. कुठेंतरी दूर घंटानाद झाला. त्या जागेंत अंधार पसरला आणि अंधारातून चमत्कारिक आवाज ऐकूं आला.

'न्यूयॉर्कमधील छप्पन्न नंबरच्या एजंटवर नजर ठेवणाऱ्या माणसाचा मला अगदीं ताजा रिपोर्ट सांग.'

'एकच रिपोर्ट मला मिळाला आहे आणि तो आठ वाजून पंचेचाळीस मिनिटांनीं आला. कॅ. हेपबर्न आणि तो छप्पन्न नंबरचा एजंट एकच ठिकाणीं रहातात. आठ वाजल्यानंतर कांहीं मिनिटांनीं तो एजंट आमच्या माणसांना एका टॅक्सींतून जातांना आढळला होता. त्यांनीं पाठलाग केला पण तो टॅक्सींतून उडी घेऊन निसटला. अद्याप तो पोलिसांच्या मुख्य ठाण्यांतच रहात असावा असें दिसतें.'

पुन्हां घंटानाद झाला. ती खोली प्रकाशित झाली आणि वृद्ध शिल्पकाराचें काम सुरू झालें.

× × ×

एका टॅक्सीतून मलबेरी रस्त्याच्या नाक्यावर एक छोटासा पण ऐट-बाज हालचाली करणारा काळासावळा पण चपळ माणूस खालीं उतरला. क्षणभर तो ड्रायव्हरचे पैसे देण्यासाठीं थांबला व नंतर पूर्व दिशेनें झरझर पावलें टाकण्यास त्यानें सुरवात केली. ड्रायव्हरनें आपली टॅक्सी वळविली व तो वू-किंगच्या हॉटेलासमोर थांबला. तो हॉटेलांत शिरला. नंतर तीन मिनिटांनीं बाहेर आला व ती टॅक्सी घेऊन निघून गेला.

तेवढ्या अवधींत तो काळी हॅट घालणारा माणूस झरझर पावलें टाकीत चालतच होता. पाऊस झिम्‌झिम् पडत होता आणि त्या चिनी मोहल्ल्यांत अधिकच गारठा भासत होता. त्यानें आपला चालण्याचा वेग वाढविला होता. आजूबाजूच्या दुकानांतून आणि हॉटेलांतून दिव्यांचा झगझगीत

प्रकाश पसरला होता. पण गारठ्यामुळें तेथल्या लोकांनीं आपापल्या घरात दडी मारली होती. रस्त्यावरून जे लोक जात–येत होते त्यांच्याकडे तो हॅट-वाला माणूस पहात नव्हता. चिनी मोहल्ल्यांत आपणांला कुणीहि अपाय करणार नाहीं अशा आत्मविश्वासानें त्याचीं पावलें पडत होतीं.

चिनी माणूस हा कायद्याचें पालन करणारा असतो. पाश्चिमात्य जगा-पेक्षां त्याचे कायदे वेगळे असतील, पण तो आपल्या स्वतःच्या नियमांचें कठोरतेनें पालन करीत असतो. त्या भागांत संशयास्पद असें कांहीच दिसत नव्हतें. पण तो माणूस एका कोपऱ्यावर वळत असतांना त्याची एका माणसा-बरोबर अचानक टक्कर झाली.

काळी हॅट घालणाऱ्यानें त्या माणसाकडे पाहिलें मात्र तोंच तो त्वरेनें तेथून निसटला. समोरून येणारा डिटेक्टिव्ह होता. त्याला तो माणूस चेहेऱ्यावरून चिनी असावा असें वाटलें आणि त्यावेळीं तो एका चिनी माणसाचा शोध करीत होता, पण त्यानें मागें मान वळविली तेव्हां तो काळी हॅट घालणारा माणूस अदृश्य झाला होता.

डेप्युटी इन्स्पेक्टर ग्रेगरी त्या माणसाचा पाठलाग करण्याच्या भानगडींत पडला नाहीं. तो रिम्झिम् पावसांतून आपला रिपोर्ट सादर करण्यासाठीं पोलीस ठाण्याकडे चालला होता. सॅम् पॅक् नांवानें लंडनमधें ओळखला जाणारा एक वृद्ध चिनी न्यूयॉर्कमधें आला आहे आणि त्याचा शोध करावा अशी मुख्य ठाण्यावरून सर्व अधिकाऱ्यांना सूचना मिळाली होती, पण सॅम पॅक अतिशय वृद्ध होता. काळी हॅट घालणारा तो माणूस नसावा असें ग्रेगरीला वाटलें.

तो काळी हॅट घालणारा माणूस तेवढ्या अवधींत बऱ्याच अंतरावर पोहोंचला होता. त्यानें तेथल्या एका बंद दाराजवळ उभें राहून आपल्या खिशांतील एक टाईप केलेला कागद बाहेर काढला आणि आपल्या सिगारेट लायटरच्या प्रकाशांत तो वाचला. आपण आपणांला मिळालेल्या सूचनांप्रमाणे वागलों आहोंत अशी खात्री पटल्यानंतर त्यानें दाराजवळच्या भिंतीवर बसविलेलें घंटीचें बटन दाबलें.

दार उघडलें गेलें, हें त्यानें आवाजावरून ओळखलें. रस्त्यावरून कुणी

आपणांकडे पहात नाहीं अशी खात्री झाल्यानंतर तो आंत गेला आणि त्यानें डाव्या हातानें भिंत चांचपडली. त्याच्या त्या हाताला एक बटन लागलें, त्यानें तें दाबलें. त्याबरोबर तें पुढलें दार आपोआप बंद झालें. क्षणभर तो अंधारांतच थांबला. नंतर त्यानें दुसरें बटन दाबलें, त्याबरोबर ती जागा प्रकाशित झाली. तो अरुंद मार्ग होता आणि पलिकडच्या टोंकाला आणखी एक दार होतें. त्या दारावर घंटीचें बटन होतें, तें त्यानें सात वेळां सावकाश दाबलें.

× × × ×

ग्रेगरी पुढें चालला असतांना अचानक एक उंच, मिशाळ आणि चष्मा लावलेला माणूस समोरून आला आणि त्याला म्हणाला, 'मला वाटतें तुम्हीं पोलीस अधिकारी आहांत ?'

'तुमचें म्हणणें बरोबर आहे.' ग्रेगरी म्हणाला, 'मी आपणांला कोणती मदत करावी ?'

'मी एका माणसाला शोधीत आहें. तो माझें देणें लागतो, पण मला तोंड दाखवीत नाहीं. आतां पांच मिनिटांपूर्वीच मी त्याला या विभागांत शिरतांना पाहिलें. तुम्हीं समोरून आलात तेव्हां तो तुमच्या दृष्टीस पडला होता काय ?'

'तो दिसण्यांत कसा आहे ?' ग्रेगरीनें विचारलें.

'तो हडकुळा आणि दुबळाच माणूस आहे. त्याचा कोट करड्या रंगाचा असून त्यानें काळी हॅट घातली आहे. मला त्याला पोलीसांच्या स्वाधीन करावयाचा नाहीं, पण त्याला भेटावयाचें आहे.'

तो दोन मिनिटांपूर्वीच मला दिसला होता. चला, माझ्या बरोबर तो कोणत्या बाजूला गेला तें मी तुम्हांला दाखवितों.'

ग्रेगरीनें त्याला कोंपऱ्यावर नेऊन तो रस्ता दाखविला आणि तो मागें परतला. त्या मिशाळ माणसानें त्या रस्त्यावरील दोन्ही बाजूंच्या घराची पहाणी केली व नंतर त्यानें आगगाडीचें जवळचें स्टेशन गांठलें.

कांहीं वेळानें तो माणूस कॅ. हेप्बर्न ज्या इमारतींत रहात होता तेथें गेला आणि लिफ्टनें चाळीसाव्या मजल्यावर जाऊन हेप्बर्नच्या खोलींत प्रवेश

केला. तो त्या खोलींत शिरला तेव्हां कॅ. हेप्‌बर्न अस्वस्थ होऊन त्या खोलींत फेऱ्या घालीत होता, प्रथम हेप्‌बर्न त्या मिशाळ माणसाकडे पहात होता.

'सर डेनीस, तो ओळख पटतांच आश्चर्यानें म्हणाला, ' मी तुम्हाला ओळखलेंच नव्हतें. आणि मला तुमच्याबद्दलच चिंता वाटत होती, पण तुमच्या चर्येवरून तुम्हीं कांहीं चांगली बातमी आणली असावी असें दिसतें ! '

'होय, बातमी चांगली आहे. ' नेलँड आपला पाईप पेटवीत म्हणाला. 'मी चिनी मोहल्ल्यांत फिरत असतांना तेथल्या एका हॉटेलांतून रस्त्यावरून जाणाऱ्या रिचेटला पाहिलें आणि तो ज्या गल्लींत शिरला तेथल्या घरांची पहाणी केली. रिचेट सांपडला नाहीं, पण फू-मांच्यूनें चिनी मोहल्ल्यांतच तळ ठोकला आहे अशी माझी खात्री झाली आहे. '

४

रिचेटला न्याय मिळाला !

जेम्स् रिचेट हा त्या गुप्त संघटनेंत अडतीस नंबरचा माणूस म्हणून ओळखला जात असे. तो जेव्हां ओळीनें पांचव्या दारांतून बाहेर पडला तेव्हां आपण जमिनींत बऱ्याच खोल असलेल्या कोणत्यातरी ठिकाणीं पोहोंचलों आहोंत हें त्याच्या लक्षांत आलें. त्याच्या पाठीमागलें दार बंद झालें होतें.

त्यानें ज्या जागेंत प्रवेश केला होता तेथल्या भिंती दगडाच्या होत्या. वर एका हुकाला अडकविलेला कंदील जळत होता. समोरच एक दार दिसत होतें. पण त्यावर पडदा होता आणि त्या दारावर अर्ध वर्तुळाकार प्रकाश दिसत होता.

त्या जागेंत एका बाजूला एक गादी होती आणि तिच्यावर अतिशय वृद्ध चिनी मांडी घालून बसला होता. त्या माणसानें आपले दोन्ही हात गुडघ्यांवर टेकले होते आणि त्याच्या चर्येवर शेंकडों सुरकुत्या पडल्या होत्या.

त्याचे डोळे अगदींच बारीक होते. त्याच्या वयाचा अंदाज करणें अशक्य होतें तो पुतळा असावा असें प्रथम रिचेटला वाटलें. पण नंतर तो माणूस आपणांकडे पहात आहे हें त्याच्या लक्षांत आलें.

त्यानें आपल्या खिशांतून हस्तीदंत आणि सोनें यांच्या मिश्रणानें तयार केलेला एक छोटा बिल्ला काढला आणि तो त्या चिन्याला दाखविला आणि म्हणाला, ' जेम्स् रिचेट. '

त्या वृद्धानें फक्त त्या दाराकडे बोट केलें. रिचेटनें पडदा बाजूला सारला आणि आंतल्या जागेंत प्रवेश केला. हॅट हातांत घेऊन त्यानें आजुबाजूला पाहिलें. ती जागा चौकोनी होती. तेथल्याहि भिंती दगडाच्याच होत्या आणि तेथें सात दारें होतीं. दोहीं बाजूच्या आणि समोरच्या भिंतीत प्रत्येकीं दोन दारें होतीं. त्याशिवाय त्यानें प्रवेश केला तें दार होतें. प्रत्येक दारावर लोखंडी हुक होते आणि त्यावर वेगवेगळ्या रंगाचे कंदील टांगलेले होते. दारें सोडून उरलेल्या भिंतींना रेशमी लोड टेकलेले होते, त्याशिवाय तेथें कुणीच नव्हतें.

रिचेट अस्वस्थ बनला, त्यानें विचार करण्याचा प्रयत्न केला. ती जागा म्हणजे, चिनी धूर्ततेचा चमत्कार होता. त्या जागेपर्यंत पोलीस येऊं शकतच नव्हते.

त्या खोलीच्या मध्यभागीं सात हिरवे डोळे असलेल्या देवीची प्रचंड प्रतिमा होती. आणि जणूं काय ती आपल्या एकेका डोळ्यानें त्या सात दारांवर नजर ठेवीत होती.

जेम्स् रिचेट वकील होता. त्यानें कित्येक वर्षें वकीली केली होती. पण त्याची मावस आजी चिनी असल्यामुळें त्यानें आपल्या कित्येक वैयक्तिक महत्त्वाकांक्षांना मुरड घातली होती. पैसा मिळविणें हें त्यानें आपलें ध्येय ठरविलें होतें आणि वकीलीपेक्षां अधिक पैसे मिळविण्याचा दुसरा सोपा मार्ग तो शोधीत होता. आतां त्याच मार्गानें वाटचाल करीत तो या ठिकाणीं येऊन पोहोंचला होता.

फादर ॲबॉटचा सेक्रेटरी आणि कायदेशीर सल्लागार या नात्यानें त्याला बरेच पैसे मिळत होते, पण त्याहूनहि तो अधिक पैसे एका गुप्त

संघटनेकडून मिळवीत होता. लोलाच्या मध्यस्थीनें त्याचा त्या संघटनेंत प्रवेश झाला होता.

लोला! ती अतिशय सुंदर होती. ती त्याच्यापेक्षांहि धूर्त आणि ज्ञानी होती. त्या दोघांनीं मिळून सारें जग जिंकलें असतें पण ती स्वतंत्र नव्हती. सात माणसें जी गुप्त संघटना चालवीत होती तिची ती दास होती....

जरी त्या जागेंत भरपूर उष्णता होती तरी रिचेटच्या अंगावर शहारे आले. सात माणसें! आणि त्याच्याकडे पहाणाऱ्या देवीलाहि सात डोळे होते. तो आपल्या नवीन कामावर हजर झाला त्याच दिवशीं लोलानें त्याला तो बिल्ला दिला होता. त्यावेळीं तो हंसला होता. नंतर त्याचें तें हास्य नाहीसें झालें होतें. अॅरॉटच्या मनोऱ्यांतून पळ काढीपर्यंत त्या ठिकाणीं त्या सातांचे किती हेर तेथें आहेत हें त्याला माहित नव्हतें.

फक्त दोघांचीच आणि त्याची भेट झाली होती. एक मिसेस अडेर आणि दुसरा रात्रपाळीच्या पहारेकऱ्याचें काम करणारा माणूस. त्याला फरारी होण्याची सूचना मिळाल्यानंतर मदत करणारीं माणसें जागोजाग भेटलीं होतीं आणि आतां तो न्यूयॉर्क शहरामध्यें पोहोंचला होता...

एका दारावरील पडदा अचानक बाजूला सरकला आणि त्याला समोरच लोला दिसली....

× × × ×

कॅप्टन हेप्बर्न टेलिफोनजवळ बसला होता. त्याला देण्यांत येणाऱ्या माहितीचें तो टांचण करीत होता आणि त्याच्याशीं बोलणाऱ्यांना तो अधुन मधून सूचनाहि देत होता. नेलँड स्मिथ् खिडकीजवळच्या एका मोठ्या टेबलावर बसून लिहीत होता, त्याच्या समोरच्या भिंतीला मोठमोठाले नकाशे लावलेले होते. नेलँडचा विश्वासू सहाय्यक फे दाराजवळ बसला होता.

बाहेर कुठेंतरी घंटीचा आवाज झाला त्याबरोबर फे हातांत पिस्तूल घेऊनच बाहेर गेला आणि त्यानें बाहेरचें दार उघडलें. नेलँडचें पत्र घेऊन एक संदेशवाहक आला होता. फेनें तें पत्र आपल्या मालकाला दिलें, नेलँडनें तें तीन वेळां वाचलें व नंतर हेप्बर्नला दिलें.

" प्रिय सर डेनीस, चमत्कारिक प्रकार घडला आहे आणि त्याबद्दल तुम्हांला माहिती देणें आवश्यक आहे असें मला वाटतें. माझा टेलिफोन पुन्हां बिघडल्यामुळें मी एका खास माणसाबरोबर हें पत्र पाठवीत आहें. आज संध्याकाळीं एक ज्युलियन नांवाचा माणूस माझ्याकडे आला. आपण जें सांगणार आहोंत तें फक्त सर डेनीसनाच कळवावें अशी त्यानें प्रथम मला अट घातली. नंतर तो म्हणाला, डॉ. प्रेसकॉट कुठें आहेत त्यासंबंधींची माहिती आपणांला आहे असें त्यानें सांगितलें.

' तो माणूस शरिरानें नाजूक, लांब काळ्या केसांचा, बायकी वळणाचा होता. त्याचा आवाज मखमलीसारखा होता. मी त्याला हवें असलेलें वचन दिलें. तेव्हां त्याचें समाधान झालेलें दिसलें. हार्वेला अमेरिकेचा हुकूमशहा बनविण्याच्या कारस्थानांत आपण नाइलाजानें सामील झालों होतों आणि आपणांला त्या कारस्थानाची बरीच माहिती आहे असेंहि त्यानें सांगितलें.

' डॉक्टर प्रेसकॉटना न्यूयॉर्कमध्येंच कैदेंत ठेवण्यांत आलें असून जर तुम्हीं त्यांच्या संरक्षणाची हमी दिली तर तो त्यांना कुठें ठेवण्यांत आलें आहे त्यासंबंधींची माहिती देण्यास तयार आहे. त्यानें आपला पत्ता दिला आहे. मी उद्यां न्यूयॉर्कमध्यें येईन आणि तुम्हांला चार वाजतां भेटेन. आपण काय करावें असें तुम्हांला वाटतें ?

आपली
सारा लेकिन. "

हेपबर्न पत्र टेबलावर ठेवीत म्हणाला, ' वर्णनावरून तो माणूस जेम्स् रिचेट् असावा असें दिसतें. '

' तूं तसें म्हणालास याबद्दल मला आनंद होतो. ' नेलँड म्हणाला, 'तूं त्या माणसाला अटक करण्याचा प्रयत्न केलास आणि तो नाहींसा झाला. तो आतां आपली कातडी वांचविण्याचा प्रयत्न करीत आहे. जर तो रिचेटच असला तर त्याला हुकमी एक्याइतकें महत्त्व आहे. आज रात्रीं तो माझ्या हातून निसटल्यामुळें मला स्वतःचाच राग आला आहे. प्रेसकॉटच्या बहिणीनें आपणांला त्याचा पत्ता कळविला नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. त्या पत्रांतील आणखी एक गोष्ट तुझ्या लक्षांत आली आहे काय ?'

'होय, त्या पत्रावर तारीख नाहीं पण माझी बहीण ऑनर्स घेऊन बी. ए. झाली आहे तीहि आपल्या पत्रावर तारीख घालीत नाहीं, आणि दुसरी गोष्ट त्या टेलिफोनची.

'टेलिफोन हीच महत्त्वाची गोष्ट आहे.' नेलँड स्मिथ म्हणाला' 'तो टेलिफोन पुन्हां बिघडला ही गोष्ट मला सूचक वाटते. आपला ज्याच्या-बरोबर लढा आहे तो माणूस अजब आहे त्यामुळें आपण अपेक्षा करतों ती बातमी आपणांला मिळेलच अशी मला खात्री वाटत नाहीं.

× × × ×

अगदीं साधा पिवळा झगा घालून एक माणूस एका लहानशा खोलींत मोठ्या टेबलाजवळ बसला होता. त्याचे हात झग्याच्या घोळांत लपले होते. तेथें तीन खिडक्या होत्या, त्या तिन्ही किंचित् उघडया होत्या. त्यांतून जो अस्पष्ट आवाज येत होता त्यावरून ती खोली त्या कधींहि झोप न घेणाऱ्या न्यूयॉर्क शहरामध्यें फार उंचीवर असली पाहिजे हें स्पष्ट होत होतें.

त्या खोलीच्या दोन बाजूच्या भिंती पुस्तकांच्या कपाटांनीं व्यापिल्या होत्या. त्या माणसाच्या पुढच्यांतील टेबलावरहि वरींच पुस्तकें आणि कित्येक चमत्कारिक यंत्रें व उपकरणें होतीं. त्याशिवाय तेथें एक चिनी मातीचें भांडें होतें व त्या भांडयांत एक लहानसा पाईप होता. तेथली हवा गरम होती. तेथें कसला तरी विलक्षण सुगंध दरवळत होता. त्या माणसाची आकृति गौतम बुद्धाच्या कोरीव पुतळ्याप्रमाणें दिसत होती व त्याचे डोळे बंद होते.

एकाएकीं त्यानें डोळ उघडले. ते चंद्रप्रकाशांत चकाकणाऱ्या मौल्यवान पांचूप्रमाणें होते. त्यानें आपल्या डोळयांवर काळया रंगाचा चष्मा चढविला व तेथल्या एका भिंतीवर बसविलेल्या एका चौकोनी आणि प्रकाशित पडद्या-कडे पाहूं लागला. त्या पडद्यावर त्या सात डोळ्यांच्या देवीच्या खोलींतील हालतीं चित्रें दिसूं लागलीं. रिचेट् लोलाबरोबर बोलत होता.

त्या टेबलाजवळ बसलेला, मानवतेचा अभ्यासू अत्यंत कठोरतेनें न्यायाचें पालन करणारा होता. रिचेटनें पूर्वीं चांगलें काम बजाविलें होतें व आतांहि त्याच्यावर आणखी महत्त्वाची कामगिरी सोपवायची होती. पण त्या-पूर्वीं तो माणूस कसा आहे याचा त्या विलक्षण माणसाला अभ्यास करावयाचा

होता. त्याला लोला आणि रिचेटच्या हालचाली दिसत होत्या, इतकेंच नव्हे तर त्यांचें बोलणेंहि ऐकूं येत होतें.

'लोला, सर्व डाव माझ्या हातांत आहे.' रिचर्ड तिच्या खांद्यावर हात ठेवून तिला जवळ ओढीत म्हणाला. 'बतावणी करूं नकोस, आपण दोघेंहि यांत आहोंत.'

तो तिचें चुंबन घेण्याचा प्रयत्न करूं लागतांच ती त्याच्या हातांतून निसटली आणि म्हणाली, 'तूं अगदींच वेडा आहेस. एकदां मी थोडी गंमत केली म्हणून मी मूर्ख आहें असें का तुला वाटतें? मी खेळतें पण कामाच्या वेळीं खेळ बंद असतो. जर आपल्या हातीं सर्व सत्ता येईल असें तुला वाटत असलें तर तें तुझें स्वप्न ठरेल.

'पण मी सांगतों तें खरें आहे.' तो हाताच्या मुठी आवळीत म्हणाला. 'फक्त तुझा होकार पाहिजे आपण दोघें असतांना एका नव्याच माणसाला कां अधिकार देण्यांत यावा?

'मूर्खा! तुला तरुणपणींच मरावयाचें आहे काय?'

'लोला, मी मूर्ख नाहीं. न्यूयॉर्क शहरांतील प्रसिद्ध वकील कर्न अॅडलर यांत भाग घेत आहे हें मला माहित आहे. तो माझें ऐकेल. मला ब्लॉन्डी माहित आहे. त्याच्या हाताखालीं बरींच माणसें आहेत व तो माझा मित्र आहे. मला राष्ट्रीय–ऐक्य मंडळाची सर्व माहिती आहे. मला कुठून मदत मिळवायची तें माहित आहे, त्यासाठीं मला हार्वेची गरज नाहीं लोला...'

त्या वरच्या खोलींत बसलेल्या माणसाचा नाजूक व लांब नखें असलेला हात टेबलाकडे सरकला आणि त्या तळघरांतील सातांपैकीं सहा दारांवरील दिवे मालवले गेले.

'हें काय? आपण काय करावयाचें?' बुचकळ्यांत पडलेल्या रिचेटनें विचारलें.

'तूं आतां उरलेल्या प्रकाशित खोलींत जा. अध्यक्ष तुझी मुलाखत घेणार आहेत.'

हाताच्या मुठी आंवळूनच रिचेट त्या दाराजवळ गेला. त्यानें मान वळविली, लोला अदृश्य झाली होती. आतां देवीचा फक्त एकच हिरवा डोळा

त्याच्याकडे पहात होता. त्यानें त्या प्रकाशित दारावरील पडदा बाजूला सारला. आणि आंत पाऊल टाकलें. त्याबरोबर तो पडदा आपोआप सरकला आंतली खोली छोटी होती. चारी बाजूंना दगडी भिंती होत्या. आंत सामान नव्हतें आणि कुणीं माणूसहि नव्हता. त्यानें आजुबाजूला पाहिलें तेव्हां त्याच्या आत्मविश्वासाला ओहोटी लागली होती. नंतर अचानक त्याला बोलणें ऐकूं येऊं लागलें.

' जेम्स रिचेट, मी तुझ्यावर नाराज झालों आहें. '

रिचेटनें उजव्या–डाव्या बाजूला, वर–खालीं सर्वत्र पाहिलें. नंतर त्यानें रागानें विचारलें, ' कोण बोलत आहे ? या नाटकाचा माझ्यावर विशेष परिणाम होत नाहीं. जें कांहीं घडलें तो काय दोष माझा ? मला तुम्हांला प्रत्यक्ष भेटावयाचें आहे आणि तुमच्याबरोबर बोलावयाचें आहे. '

' रिचेट, तुझी इच्छा शहाणपणाची नाहीं, फक्त एकपासून बारापर्यंतच्या माणसांनाच तो मान मिळतो. '

रिचेटच्या कपाळावरून घामाच्या धारा वाहूं लागल्या होत्या तरीहि तो उसन्या धैर्यानें म्हणाला, ' मला न्याय मिळाला पाहिजे. '

' तुला जरूर न्याय मिळेल. तीन नंबरच्या तळाचा प्रमुख तुला एक सीलबंद लखोटा देईल, त्या लखोटयांत असलेल्या सूचना तूं तंतोतंत अमलांत आणल्या पाहिजेत. '

× × ×

नेलँडने कॅ. हेप्बर्नला झोंपेंतून उठविलें आणि तो म्हणाला, ' मित्रा माफ कर, पण आपणांला एक काम करावयाचें आहे. '

नेलँडच्या गंभीर मुद्रेकडे पहात हेप्बर्न म्हणाला, ' ठीक आहे सांगा. '

' मलाहि अद्याप तें बरोबर समजलें नाहीं, नेलँड म्हणाला, ' पांच मिनिटांपूर्वी मला उठविण्यात आलें, एक टॅक्सी प्रवेशद्वारासमोर उभी राहिली आहे आणि आंत बसलेल्या उतारूनें ड्रायव्हरला मला बोलाविण्यास

ज...३

सांगितलें. ड्रायव्हरनें माझ्या नांवाचा उल्लेख करतांना स्कॉटलंड यार्डचे स्पेशल कमिशनर सर डेनीस नेलँड स्मिथ असें म्हटलें आणि त्या गोष्टीचें मला नवल वाटलें.'

'पण तुम्हांला त्या नांवानें मी किंवा फे याखेरीज कुणीच ओळखत नाहीं.' हेप्बर्न म्हणाला.

'अगदीं बरोबर, म्हणून तर मला फू-मांच्यूची आठवण होते. चल, आपण खालीं जाऊं, तो ड्रायव्हर आणि त्याचा पॅसेंजर आपली वाट पहात असतील.'

ते दोघे लिफ्टनें खालीं उतरले. तळमजल्यावर रात्रपाळीच्या मॅनेजराच्या खोलींत प्रकाश दिसत होता. पायजम्यावर कोट चढविलेला एक माणूस तेथल्या कोचावर झोपविण्यांत आलेल्या कुणालातरी तपाशीत होता, त्याशिवाय तीन माणसें तेथें होतीं, त्यांपैकीं एक टॅक्सी-ड्रायव्हर होता.

नेलँड आणि हेप्बर्न यांना विलक्षण दृश्य पहावयास मिळालें. कोचावर झोपविण्यांत आलेल्या माणसाच्या तोंडावर आणि मानेवर बरेच शेंदरी डाग दिसत होते. त्या माणसाचा वर्ण गोरा असल्यामुळें ते डाग रक्ताच्या थेंबाप्रमाणें दिसत होते.

तपासणारे डॉक्टर होते. ते नेलँडकडे वळून म्हणाले, 'तुम्हीं जर डॉक्टर असलां तर चांगलें होईल. कारण ही केस माझ्या अनुभवाबाहेरची आहे.'

'हा माणूस मेला कशानें ?' नेलँडनें विचारलें.

'मी येथें येण्यापूर्वीच त्यानें प्राण सोडला होता.' डॉक्टर म्हणाले, 'मी दहा मिनिटें मेहनत केली.....'

'शेंदरी ठिपके !' घाबरलेला ड्रायव्हर म्हणाला, 'हा माणूस तसेंच ओरडला आणि टॅक्सीतून खालीं उतरून गडबडा लोळत किंचाळूं लागला !'

हेप्बर्ननें नेलँडकडे पाहिलें आणि तो म्हणाला, 'तुमचें म्हणणें बरोबर ठरलें, आपणांला हवी असलेली माहिती आतां कधींच मिळणार नाहीं.'

तो मृत माणूस जेम्स रिचेट होता !

‘पण साहेब, हा काय प्रकार आहे ?’ आश्चर्यानें ड्रायव्हरनें विचारलें. ‘हा नवीन प्रकारचा ताप आहे काय ?’

‘नाहीं. हा नवीन प्रकारचा खून आहे !’ नेलँड म्हणाला.

‘असें तुम्हीं कां म्हणतां ?’ ड्रायव्हरनें आश्चर्यानें विचारलें.

पण नेलँड उत्तर न देतां रात्रपाळीच्या मॅनेजरला म्हणाला, ‘सध्यां कुणालाहि माझ्या हुकुमाशिवाय हॉटेलाबाहेर जाऊं देऊं नका. हेप्बर्न, तूं बाहेर उभ्या असलेल्या टॅक्सीवर पहारा करण्याची व्यवस्था कर. कुणीहि त्या टॅक्सीला स्पर्श करतां कामा नये. आणि लवकर परत ये. मला तुझी गरज आहे.’

हेप्बर्न बाहेर निघून गेल्यानंतर नेलँडनें टॅक्सी ड्रायव्हरला प्रश्न विचारला, तेव्हां तो म्हणाला, ‘मला हें गिऱ्हाईक वाटेंत भेटलें आणि त्यानें हा पत्ता सांगितला. येथें आल्यानंतर त्यानें एका कागदावर लिहून तो माझ्याजवळ दिला आणि म्हणाला, या नांवाचा माणूस हॉटेलांत आहे कीं नाहीं याची चौकशी कर. मी हॉटेलांत शिरणार तोंच त्या माणसानें आपल्या खिशांतून डायरीसारखें कांहीं बाहेर काढलें तें अद्याप बाहेर पडलें असावें. दुसऱ्याच क्षणीं त्यानें पहिली आरोळी ठोकली. महाराज, ती फार भयंकर होती! एका क्षणांत त्यानें टॅक्सीचें दार उघडलें आणि तो किंचाळत रस्त्यावर गडबडां लोळूं लागला, जणू काय तो कुणाशीं तरी झगडत होता.

बाहेर हेपबर्न टॉर्चच्या प्रकाशांत जमीन तपाशीत होता. ती टॅक्सी एका रिकाम्या गॅरेजमधें नेण्यांत आली होती आणि दोन तज्ञ ती तपाशीत होते. रिचेटचें शव आणि कपडे यांची कसून तपासणी चालली होती. हॉटलचे डॉक्टर हेप्बर्नला मदत करीत होते. पहांटेची वेळ झाली होती.

डॉक्टर हेप्बर्नला म्हणाले, ‘हा माणूस कांहीं जहरी प्लेगला बळी पडला असावा असें तुम्हांला वाटतें कीं काय ?’

हेप्बर्ननें थकलेल्या नजरेनें त्यांच्याकडे पाहिलें आणि तो म्हणाला, ‘डॉक्टर, सत्य सांगायचें तर हा माणूस कशानें मेला तें मला माहित नाहीं...’

+ + +

५

नेलँडच्या खुनाचा प्रयत्न !

त्या उंच छताच्या खोलींत वृद्ध शिल्पकार सारख्या सिगारेट ओढीत आपलें काम संपवीत होता. समोरच्या एका लाकडी फलकाला एक लहानसें रंगीत चित्र लावलें होतें आणि त्या चित्राबरहुकूम तें मुंडकें तयार करण्याचें त्याचें काम चालू होतें. अस्पष्ट घंटानाद झाला, दिवे मालवले गेले आणि त्याला बोलणें ऐकूं आलें.

' त्या हॉटेलांत काय घडलें याबद्दलचा मला रिपोर्ट हवा आहे. '

' पहांटेस पांच वाजून दहा मिनिटांनीं हॉटेलाच्या तळमजल्यावरील पुढील बाजू पोलिसांच्या हुकुमाप्रमाणें इतरांना बंद झाली आहे. रात्र-पाळीच्या मॅनेजरचें ऑफिस सील करण्यांत आलें आहे. टॅक्सी एका गॅरेज-मध्यें ठेवण्यांत आली आहे. मृत माणूस जेम्स् रिचेट होता हें ओळखण्यांत आलें आहे. पांच वाजतां त्याचें प्रेत तेथून हालविण्यांत आलें. मृत्यूचें कारण अज्ञात आहे. स्मिथ आणि हेप्बर्न त्यांच्या जागेंत आहेत इतकेंच. '

कांहीं क्षण शांतता पसरली, नंतर पुन्हां आवाज ऐकूं आला. ' नंबर एक्याऐंशी, तुला आतां चार तासांची सुटी आहे. टेलिफोनवरून येणारे संदेश रेकॉर्ड करण्याची व्यवस्था कर. '

ती खोली पुन्हां प्रकाशित झाली. एक्याऐंशी नंबर उभा राहिला, त्यानें टेलिफोनच्या टेबलाखालचा एक खण उघडला आणि तीन तारा जोडल्या, त्यामुळें टेलिफोनवरून येणाऱ्या संदेशांची आतां ध्वनिमुद्रिका तयार होणार होती.

वृद्ध शिल्पकार खण बंद करणार होता त्याच वेळीं एका टेलिफोनवरून संदेश आला होता आणि त्याची ध्वनिमुद्रिका तयार होत होती.

'तीन नंबरच्या तळावरून बोलत आहें. फादर अॅबॉट नाहींसा झाल्याची बातमी आहे. तो रात्रीच्या वेळीं मनोऱ्यांतून निसटला असावा आणि कार्नेगी हॉलमधील चर्चेला हजर रहाण्यासाठीं तो न्यूयॉर्कमध्यें जात असावा असा तर्क आहे.'

तें यंत्र बरोबर काम देत आहे अशी नंबर एक्याऐंशींची खात्री झाली, त्यानें तो खण बंद केला. एक सिगारेटचा डबा आपल्या झग्याच्या खिशांत घातला, नंतर काळजीपूर्वक त्यानें तयार करावयास घेतलेला पुतळा उचलून तो एका भिंतीजवळ गेला, त्या खोलीला दारच नव्हतें, पण त्यानें भिंतीला कुठेंतरी पायानें स्पर्श केला आणि त्याबरोबर ती भिंतच बाजूला सरकून खालीं उतरण्याचा जिना दिसूं लागला.

एखादी आई आपल्या तान्हुल्याला सांभाळते त्याप्रमाणें या पुतळ्याला जपत वृद्ध खालच्या मजल्यावर गेला आणि त्यानें एका लहानशा जागेंत प्रवेश केला. तेथें एक खाट होती, तेथल्या एका अर्धवट उघड्या दारांतून पलिकडचें स्नानगृह दिसत होतें. एका खिडकीजवळ एक मोठें टेबल होतें. शिल्पकारानें हातांतला पुतळा अगदीं जपून त्या टेबलावर ठेवला आणि त्याचे टेबलाचा खण उघडून टेलिफोन बाहेर काढला.

टेलिफोनवरून त्यानें त्याला हवीं असलेलीं खाद्यपेयें पाठविण्याची सूचना दिली आणि तो टेबलाजवळ बसून लिहूं लागला. त्यानें लिहावयास घेतलेला तो ग्रंथ शास्त्रीय विषयावर होता आणि त्या वहीच्या पहिल्या पानांवर त्यानें आपलें नांव प्रोफेसर आलबर्ट असें लिहिलें होतें. तो युरोपमधील एक महान् गणिती होता आणि तो नाझींच्या विरुद्ध असल्यामुळें त्याला एका वर्षापूर्वी जर्मनी देश सोडावा लागला होता व नंतर तो मरण पावला अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झाली होती.

नंबर एक्याऐंशींनें कांहीं वेळ आपलें लेखन केलें, नंतर खट्ट असा आवाज होऊन भिंतींतला एक चौकोन उघडला गेला आणि खाद्यपेयांनीं भरलेली एक छोटी आगगाडी बाहेर आली.

वृद्धानें आपलें काम थांबविलें, त्यानें खाद्यपदार्थांचा व्यवस्थित समा-

चार घेतला, नंतर ती हातगाडी त्या चौकोनी पोकळींत ढकलली त्याबरोबर तेथली भिंत पूर्ववत् बनली, वृद्धानें मद्यपानास सुरवात केली.

× × ×

पहांटेच्या प्रकाशांत टेबलावरील कित्येक चमत्कारिक वस्तूंची नेलँड आणि हेपबर्न पहाणी करीत होते. त्या सर्व वस्तू त्यांना रिचेट जवळ सापडल्या होत्या. त्यांत एक सोनें आणि हस्तिदंत यांच्या मिश्रणानें तयार केलेला एक छोटा बिल्ला होता. त्यावर अडतीस नंबर कोरला होता.

'टॅक्सी ड्रायव्हरच्या मतें हा बिल्ला हार्वेनें काढलेल्या चांगल्या अमेरिकनांच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना देण्यांत येतो.' नेलँड म्हणाला, न्यूयॉर्क शहरामधें लोटस कंपनीच्या ज्या शेंकडो टॅक्सी फिरत असतात त्या सर्वांचेच ड्रायव्हर या गुप्त संघटनेंत सामील असावेत असे दिसतें. हा बिल्ला दाखविणाऱ्या माणसाला तो सांगेल त्या ठिकाणीं पैसें न घेतां पोहोंचविण्याचा आमचा रिवाज आहे असें त्या ड्रायव्हरनें कबूल केलें आहे. आतां हें पहा...'

नेलँड बोटानें दाखवीत होता ती वस्तू पत्त्याचीं पानें ठेवण्याची एक कागदी पेटी होती. त्यांत पत्ते नव्हतें, पण त्या पेटींत घडी करून ठेवण्यांत आलेल्या कोऱ्या कागदाचे तुकडे सांपडले होते.

'तीच पेटी हातांत घेतल्यानंतर रिचेटची तशी अवस्था झाली होती' नेलँड म्हणाला.

'पण नेलँड तूं डुलक्या देत आहेस. तूं आतां थोडी झोप घे. चार वाजतां मिस् लेकिन येथें येणार आहे. हें विसरूं नकोस. पण तिला रिचेट-संबंधीं कांहीं कळूं द्यावयाचें नाहीं.'

बरोबर चार वाजतां मिस् लेकिन तेथें आली. फेनें तिला आंत घेतलें. नंतर नेलँडनें तिचें स्वागत केलें. गेल्या अठ्ठेचाळीस तासांत त्याला फक्त सहा तास झोंप मिळाली होती. तरीहि तो तरतरीत दिसत होता.

'मिस् लेकिन, तुम्हीं ज्या पत्राचा उल्लेख केला होता तें आपलें आहे काय?' नेलँडनें विचारलें.

तिनें तें पत्र त्याच्या हातीं दिलें आणि ती म्हणाली, 'काल मला भेटावयास आलेल्या माणसाला आपण कुठें उत्तर धाडावयाचें तो पत्ताहि माझ्याजवळ आहे.'

'त्या पत्त्याची आपणांला विशेष मदत होणार नाहीं.' नेलँड गंभीर मुद्रेनें म्हणाला, 'इथें डॉ. प्रेसकॉट्नें नाहींसें होण्यापूर्वीं लिहिलेलीं तीन पत्रें आहेत. हें हस्ताक्षर तुमच्या बंधूंचेंच आहे अशी तुमची खात्री आहे काय ?'

'होय, आतां मी तुम्हांला दिलें तें पत्र त्यानेंच मला पाठविलें आहे. तें पाहिल्यास तुमचीहि हस्ताक्षराबद्दल खात्री पटेल.'

नेलँडनें त्या पत्राचें शांतपणें निरीक्षण केलें. एक–दोन वेळां त्यानें मनांत वाचलें. नंतर मोठ्यानें वाचण्यास सुरवात केली.

"प्रिय सारा–तुझी चिंता दूर व्हावी या हेतूनें लिहीत आहें. मी एका कारस्थानाला बळी पडलों आहें. हें आतांपर्यंत तुला समजलेंच असेल, पण मी शत्रूबरोबर तडजोड केली आहे. माझ्या तात्पुरतें नाहींसें होण्याबद्दल वर्तमानपत्रांत कांहीं येऊं दिलें नाहींस, याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों. माझ्याबद्दल चिंता करूं नकोस. मी कॉर्नेगि हॉलमधें चर्चेला हजर रहाणार आहे. तोंपर्यंत तूं माझा शोध करण्याचा प्रयत्न करूं नकोस. तुला धैर्य धर असें सांगण्याची कांहीं आवश्यकताच नाहीं...

'या पत्रावर तारीख नाहीं. आणि पत्ताहि नाहीं.' नेलँड म्हणाला, 'कागद आणि लिफाफा अगदीं सामान्य आहे. न्यूयॉर्क असा पोष्टाचा शिक्का आहे. माफ करा मिस् लेकिन, माझ्या आयुष्यांतील अतिशय महान आणि कदाचित् अगदीं शेवटचें कोडें सोडविण्याचा मी प्रयत्न करीत आहें.'

'सर डेनीस, मला तें समजतें, पण मला तुमच्या सल्ल्याची आवश्यकता आहे. माझ्या बंधूंनीं जें लिहीलें आहे-तें खरें असावें काय ?'

'तें खरें असावें असें माझें मत आहे. तुम्हीं त्या पत्रांतील सूचनेप्रमाणें वागावें असाच माझा सल्ला आहे.'

'मला तो मान्य नाहीं.' ती जोरांत म्हणाली, 'माझ्या बंधूना जबरदस्तीनें पळविण्यांत आलें आहे. तें जिवंत आहेत त्याबद्दल मी ईश्वराचे

आभार मानतें. पण पळविणाऱ्यांनीं हें पत्र लिहिण्यास त्यांना भाग पाडलें आहे. वेळ काढण्याचा शत्रूचा प्रयत्न आहे ! '

\+ \+ \+

त्या न्यूयॉर्क शहरातील अत्यंत उंच ठिकाणीं असलेल्या सुगंध परिपूर्ण वातावरणांतील छोटचा खोलींत पिवळा झगा घातलेला डॉ. फू-मांच्यू मोठ्या टेबलाजवळ बसला होता आणि जरी त्या ठिकाणीं त्याच्याखेरीज कुणीहि नव्हतें तरी अगदीं जवळच उभा राहिल्याप्रमाणें एक माणूस त्याच्याशीं बोलत होता.

डॉ. फू-मांच्यूनें टेबलावरील एक बटन दाबतांच तो बोलण्याचा आवाज बंद पडला. त्यानंतर दोन-तीन मिनिटें फू-मांच्यू डोळे मिटून बसला होता आणि त्या जागेंत संपूर्ण शांतता पसरली होती.

' मालक, मी येथें आलों आहे.' कुणीतरी हळूंच चिनी भाषेंत म्हणालें.

' लक्षपूर्वक ऐक, फार महत्त्वाची गोष्ट आहे. ' डॉ. फू-मांच्यू त्याच भाषेंत म्हणाला, ' न्यूझीलंडहून आलेल्या शेंदरी राण्यांपैकीं तुझ्याजवळ किती शिल्लक आहेत ? '

' पंधरा. त्या रिचेट्साठीं मला पांचजणींचा उपयोग करावा लागला, कारण बेयुमार थंडीमुळें त्यांतील कांहीं जिवंत रहाणार नाहींत अशी मला भीति वाटली होती.

' ठीक, आतां ज्याच्यापासून आपणांला अतिशय धोका आहे असा माणूस खिडक्या उघडचा ठेवून झोपत असतो. त्याच्यासाठीं आपल्या आणखी दहा मैत्रिणींचा बळी दे. आपला नंबर एकचा शत्रू आज रात्रीं एकटाच झोंपणार नाहीं अशी व्यवस्था कर. '

' पण महाराज, ही कामगिरी अंगावर घेण्यासारखा माझ्याजवळ माणूस नाहीं, जर अलिखान किंवा इतर जुन्या नोकरांपैकीं कुणी असतें तर ठीक झालें असतें. देवा, तुम्हीं मला रानटी देशांत अडकविल्यामुळें माझा नाइलाज झाला आहे.'

कांहीं मिनिटें फू-मांच्यू बोलला नाहीं, नंतर तो म्हणाला, 'पुढील सूचनांची वाट पहा !'

त्यानें आणखी एक बटन दाबलें आणि त्याबरोबर त्याला एका यंत्रांत लाल प्रकाश दिसू लागला. 'न्यूयॉर्क ? ' त्यानें विचारलें.

'मी कर्न अॅडलर येथें आहें.' त्याला उत्तर मिळालें.

'तूं कुणाशीं बोलत आहेस हें तुझ्या लक्षांत आलें ? '

'होय प्रेसिडेंट, मी काय करूं तें सांगा,' त्याला किंचित् थरथरणाऱ्या आवाजांतून उत्तर मिळालें.

'आपली अद्याप भेट झाली नाहीं, पण तरीहि न्यूयॉर्क येथील सर्व संघटनेचीं सूत्रें मी तुझ्या हातीं सोंपविलीं आहेत. मला पिटर कार्लो हवा आहे. माझ्यासाठीं तूं त्याचा शोध कर, नंतर मी तुला पुढील सूचना देईन.'

'मी त्या माणसाला शोधून काढीन. पण त्या कामीं मला ब्लॉन्डीची मदत घ्यावी लागेल.'

'मला त्या माणसाबद्दल अविश्वास वाटतो. तूं जरी त्या माणसाबद्दल शिफारस केली असलीस तरी मी त्याला अद्याप जवळ केलेलें नाहीं, त्याला तशींच कारणें आहेत. पण आतां तुला त्याची मदत घ्यायला कांहींच हरकत नाहीं. काम झाल्यानंतर माझ्याकडे रिपोर्ट पाठव.'

तो लाल प्रकाश अद्याप प्रकाशितच होता. फू–मांच्यूनें आणखी एक बटन दाबलें आणि त्याबरोबर त्याला समोरच्या पडद्यावर अॅडलरच्या ऑफिसची सर्व खोली स्पष्ट दिसूं लागली. अॅडलर टेलिफोनचा नंबर फिरवीत होता, शेवटीं त्याला तें कनेक्शन मिळालें.

फू–मांच्यूचें तें यंत्र इतकें अजब होतें कीं त्याला अॅडलरबरोबर टेलिफोनवरून बोलणाऱ्याचा आवाज स्पष्ट ऐकूं येत होता.

'काय अॅडलर काय नवीन आहे ? '

'ऐक ब्लॉन्डी, तुला जर शांततेनें जगायचें असलें तर तुला माझें काम केलें पाहिजे. तुला ताबडतोब येथें आलें पाहिजे. आज रात्रींच तें काम झालें पाहिजे.

' ऐक अॅडलर, तूं बोलण्यांत फार हुशार आहेस पण तुला एक गोष्ट माहित नाहीं कीं तुला बाजारांत कसलीहि किंमत नाहीं. तुला काय सांगायचें असेल तें आतांच सांग, मला तुझ्या संरक्षणाची गरज नाहीं.'

' मला कार्लो हवा आहे, त्याला मी आज रात्रीं कांहीं काम सांगणार आहें आणि त्याबद्दल पैसेहि देणार आहें. प्रेसिडेंटचा हुकूम आहे–'

' त्या प्रेसिडेंटला कोण विचारतो ? पैसे किती देणार तें बोल म्हणजे तुला कार्लो मिळेल. तुझ्या त्या प्रेसिडेंटला त्यासाठीं दोन हजार डॉलर्स खर्च करावे लागतील, माझ्या मदतीशिवाय तुम्हांला कार्लो मिळणार नाहीं.'

' ब्लॉन्डी, तूं कांहींतरीं बोलतोस, जरा विचार करून बोल.'

' मी विचार करूनच बोलत आहें, मी तुलाहि एक गोष्ट सांगतों. गेल्या रात्रीं मी बाहेर गेलों असतांना कुणीतरी माझीं कागदपत्रें तपासलीं होतीं, जर तुझें तें काम असलें तर माझ्याशीं गांठ आहे हें लक्षांत ठेव.'

त्याच वेळीं टेलिफोनशीं असलेलें अॅडलरचें संधान तुटलें आणि ब्लॉन्डीला एक वेगळाच आवाज ऐकावयास मिळाला.

' ब्लॉन्डी, मी प्रेसिडेंट तुझ्याबरोबर बोलत आहें, तुझ्यात बरीच राक्षसी ताकद आहे आणि त्यामुळेंच मला तुझ्याबद्दल आकर्षण वाटतें. तुझ्यांत फारशी अक्कल नाहीं, पण मला तुझा उपयोग करतां येईल.'

' उपयोग करतां येईल ?' ब्लॉन्डी ओरडून म्हणाला, ' ऐका–'

' जेव्हां मी बोलत असतों तेव्हां तूं तें ऐकलें पाहिजेस. जो माणूस तुझीं कागदपत्रें तपासण्यासाठीं तुझ्या जागेंत शिरला होता तो माझा एजंट होता आणि त्याचा अॅडलरशीं कांहींच संबंध नव्हता. तुझ्याबद्दल मी बरीच माहिती मिळविली आहे.'

' खरें कीं काय ?' बैलाप्रमाणें डरकाळी फोडून ब्लॉन्डीनें विचारलें, ' ऐक चिन्या–तूं चिनी आहेस असें मी ऐकलें आहे. मीहि तुझ्याबद्दल माहिती मिळविली आहे. पोलिसांजवळ तुझ्या बोटांचे ठसे आहेत आणि तूं चिनी मोहल्ल्यामध्यें तुझा अड्डा ठोकला आहेस. तुला जर तुझी मान वांचवायची

असली तर तूं माझ्याकडे आलें पाहिजें आणि माझ्या अटी मान्य केल्या पाहिजेत.'

फू-मांच्यूचे डोळे मिटले होते. तो म्हणाला, 'तुझ्या बोलण्याचा माझ्यावर बराच परिणाम झाला आहे. मला तुझी गरज आहे आणि तुझ्या बरोबर अटीसंबंधीं बोलावयास मी तयार आहें. काम तांतडीचें आहे...'

× × ×

हेप्बर्ननें खूप प्रयत्न करूनहि त्याला झोंप लागेना. त्याच्या डोळ्यां-समोर एका तरुणीची आकृति सारखी दिसत होती, त्याच्या मतें त्यानें तिच्या संबंधींची बहुतेक माहिती मिळविली होती.

अमेरिकेच्या नौ-दलांतील एका अधिकाऱ्याशीं तिचें लग्न झालें होतें. पण तिचा नवरा फिलिपाईन बेटामधें तीन वर्षांपूर्वी ठार झाला होता. तिला एक मुलगा होता. फादर ॲबॉटकडे ती योग्य शिफारसपत्रें घेऊन नोकरीला आली. दिवसा-रात्रीं मिळून कमींत कमी हजार वेळां ती त्याच्या नजरेसमोर उभी रहात होती. आणि जरी तिच्याविरुद्ध पुरावा होता तरी ती तरुणी बदमाश असेल असें मानावयास तो तयार नव्हता. त्याला तिची बाजू ऐकावयाची होती. तपासणी करतांना तिची आणि आपली भेट होईल अशी त्याला सारखी भीति वाटत होती आणि आपण त्या स्त्रीच्या प्रेमांत फसलों तर नाहीं ना? असा तो विचार करीत होता.

मनोऱ्यांतून पळ काढतांना तिला त्यानें त्या हस्तलिखितासह पकडलें होतें आणि त्या गोष्टीचा खुलासा होणें आवश्यक होतें. पण अधिकृतरीत्या त्याला जी माहिती मिळाली होती त्यावरून ती सभ्य तरुणी होती असें दिसत होतें. ती आयर्लंडमधून आली होती. तिचा बाप अद्याप ब्रिटिश नौ-दलांत काम करीत होता. तो अमेरिकन अधिकारी इंग्लंडला कामगिरीसाठीं गेला असतांना तिची आणि त्याची गांठ पडली होती आणि तिच्याशीं लग्न करूनच त्यानें तिला आपल्या जहाजांतूनच अमेरिकेला आणलें होतें.

हेप्बर्न एकाएकीं उडी घेऊन उभा राहिला. त्याच्या खोलीचें दार हळुहळु उघडलें जात होतें. त्यानें चपळाईनें आपलें पिस्तुल हातीं घेतलें आणि तो म्हणाला, 'खबरदार! तुझे दोन्ही हात वर कर!'

‘हेप्बर्न, इतक्या मोठ्यानें बोलूं नकोस. फे जागा व्हावा अशी माझी इच्छा नाहीं. तूं पिस्तूल घेऊन हळुंच माझ्या खोलींत चल.’

नेलॅन्ड बरोबर हेप्बर्न त्याच्या खोलींत गेला. खोलीचें दार बंद केल्यानंतर नेलॅंड म्हणाला, ‘आपल्या शत्रूची एक नेहमींची रीत आहे.त्याचे जे मृत्यू–दूत असतात त्यांच्याकडून तो आधीं इतरांवर प्रयोग करीत असतो आणि परिणाम जर समाधानकारक झाला तर त्यांना तो माझ्याकडे पाठवितो.’

‘मला हें तुमचें बोलणें समजलें नाहीं.’ हेप्बर्न म्हणाला.

‘माझा असा तर्क आहे कीं, डॉ. फू–मांच्यू आज रात्रीं माझा प्राण घेण्याचा प्रयत्न करील.’ नेलॅंड म्हणाला.

‘पण तो या चाळीसाव्या मजल्यापर्यंत पोहोंचेल ?’

‘तेंच आपण पाहूं, आतां तूं त्या दोन ट्रॅंकांआड दडी मारून बैस, तेथें मी तुझ्यासाठीं खुर्ची ठेवली आहे. कुणालाहि न दिसतां खिडक्यांवर नजर ठेवणें हें तुझें काम आहे.’

‘अरे बापरे ! तुमच्या पलंगावर कुणी तरीं झोपलें आहे’ हेप्बर्न घाबरून म्हणाला. ‘माझ्या पलंगावर कुणी नाहीं, पण तूं आतां बोलण्यांत वेळ घालवूं नकोस, पण तूं आतां जागेवर जा. मी दुसऱ्या ठिकाणीं दडी मारणार आहें.’

हेप्बर्न त्या दोन मोठ्या ट्रॅंकांआड खुर्चीवर बसला आणि कानोसा घेऊं लागला. त्याला प्रथम रस्त्यावरील रहदारीचे अस्पष्ट आवाज ऐकूं येत होते. नंतर एखादा पक्षी किंवा पाकोळी बाहेरच्या दगडी भिंतीवर आदळल्यासारखा आवाज झाला आणि हेप्बर्न अधिकच सावधगिरीनें खिडक्यांकडे पाहूं लागला.

त्याला खिडकींतून न्यूयॉर्क शहरांतील अत्युच्च इमारत दिसत होती. त्या इमारतीच्या फक्त तीन खिडक्या प्रकाशित होत्या. एक अगदीं वरच्या मजल्यावर होती. दुसरी त्याच्या खालच्या मजल्यावर होती आणि तिसरी

अगदीं वरच्या घुमटींत होती. हेप्बर्न विचार करूं लागला, इतक्या उंचावर कोण रहात असेल आणि तो अशा अवेळीं जागा कां ?

अचानक त्याला त्या खिडकीबाहेर कुणाची तरी आकृति दिसली. त्या आकृतीच्या हातांत एक लांब नळी होती आणि त्या नळीवर एक चौकोनी पेटी डुलत होती. खिडकीबाहेरच्या माणसानें नळी लांबवून ती छोटी पेटी नेलँडच्या पलंगावर टाकली व नंतर ती मागें खेंचली.

आणि त्याच वेळीं नेलँडचा हुकमी आवाज ऐकूं आला, 'हेप्बर्न त्या माणसावर गोळी झाड !'

त्या खिडकीवरील ती आकृति हालली नव्हती, हेप्बर्ननें जेव्हां दोन वेळां गोळ्या झाडल्या तेव्हां त्या आकृतीचे दोन्ही हात खिडकीच्या कांठावर होते. नंतर ती आकृति दिसेनाशी झाली, कांहीं वेळानें खालच्या जमिनीवर कांहीं आदळल्याचा आवाज झाला.

'हेप्बर्न, मी सांगितल्याशिवाय जागेवरून हलूं नकोस !' नेलँडचा हुकूमी आवाज ऐकूं आला.

बाहेरून कुणीतरी हांक मारली, 'सर डेनीस !'

'फे, आत येऊं नकोस आणि दार उघडूं नकोस ! नेलँड ओरडून म्हणाला.

मोटारीच्या ट्यूबमधून हवा बाहेर निघावी असा आवाज होत होता, नंतर तो आवाज थांबला. 'हेप्बर्न, तुझ्या उजव्या हाताला दिव्याचें बटन आहे, पण जागेवरून न हलताच दिवा लाव.'

हेप्बर्ननें तसें केलें आणि ती खोली लागलींच प्रकाशित बनली. त्याबरोबर त्याला पलंगावर पडलेली एक लांब नळीची सिरींज दिसली. खोलींत आयडीन, आणि क्लोरोफॉर्मसारखा वास सुटला होता. पलंगावर ज्या ठिकाणीं झोपलेल्या माणसाचें डोकें असावें तेथें ती लहानशी पेटी पडली होती तिच्या एका बाजूचें झांकण उघडें होतें आणि उशीवर अनेक काळे ठिपके पडले होते.

‘ हेप्बर्न, तुझा नेम चुकला नाहीं त्याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों. त्या माणसाला योग्य प्रायश्चित्त मिळालें आहे, आतां तूं कपडे करून बैठकीच्या खोलींत ये आपणांला कोणत्याहि क्षणीं खालीं जावें लागेल. ’

तीन मिनिटांनीं ते बैठकीच्या खोलींतील टेबलावर एका पांढऱ्या कागदावर मांडलेले कित्येक किडे पहात होते आणि ते जिवंत नव्हते.

‘ हेप्बर्न, हे अत्यंत विषारी किडे आहेत. डॉ. पेट्रींनीं पूर्वीं माझ्या-करितां तयार केलेलें खास मिश्रण मी त्यांच्यावर फवाऱ्यानें सोडलें म्हणूनच ते मेले. त्यांचा दंश अतिशय विषारी असतो. त्यामुळें तीन मिनिटांत माणूस मरतो आणि त्याच्या अंगावर शेंदरी ठिपके उमटतात. माणसाला दंश कर-तांच ते मरतात. या खेपेला पलंगावर कुणी माणूस नसल्यामुळें त्यांना औषधानें मारावें लागलें. ’

‘ अरे देवा ! हेप्बर्न घाबरून म्हणाला, ‘ तो माणूस सैतान–बेडा असला पाहिजे ! ’

तो असामान्य बुद्धिमान आहे. हेपबर्न, आतां या विषारी जंतूंची भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. एक अत्यंत वृद्ध चिनी आहे आणि तो या न्यूयॉर्क शहरांत आला आहे.’

‘ म्हणजे सॅम्प पॅक् ना ? ’

‘ होय, तो माणूस तूं पाहिलास तर तुला आश्चर्य वाटेल. तो किती वर्षांचा असावा याचा अंदाज करणें कठीण आहे जेव्हां चीन देशावर राणीचें राज्य होतें तेव्हां तो एका मोठ्या प्रांताचा गव्हर्नर होता. राजकीय क्षेत्रांत तो फू-मांच्यूपेक्षांहि जुना आहे. केंब्रीज युनिव्हर्सिटीची पदवी घेणारा तो पहिला चिनी आहे. तो या देशांत कोणत्या युक्तीनें आला हें आपणांला माहित नाहीं, पण त्यानेंच फू-मांच्यूसाठीं हीं विलक्षण प्रकारचीं विषारी साधनें आणलीं असावींत. पण चल आतां, चाळीसाव्या मजल्यावैर चढून येणारा तो माणूस कोण हें आपण पाहूं.’

६

हार्वेची सेक्रेटरी

वृद्ध सॅम्प्पॅक् तीन नंबरच्या तळावरून रात्रीची फेरी घेत होता आणि त्याच्या बरोबर दोन चिनी तरुण होते. तो तीन नंबरचा तळ त्याच्याच ताब्यांत देण्यांत आला होता. मधमाशांच्या पोळ्याप्रमाणें ती जागा तयार करण्यांत आली होती.

त्या तळाच्या अगदीं खालच्या भागांत सात डोळ्यांच्या देवीची खोली होती आणि त्याहि खोलीच्या खालीं तयार करण्यांत आलेल्या जागेंत भिंतीला टेकून सहा रंगीत शवपेट्या ठेवण्यांत आल्या होत्या. सॅम्प्पॅक् आतां त्या पेट्या तपाशीत होता. त्याला त्या पेट्यांना बसविण्यांत आलेल्या कांचेच्या झांकणांतून आंतली हालचाल दिसत होती. त्या पेट्यांत नेलँड म्हणाला होता तशाप्रकारचे विषारी जीवजंतू होते.

ती पहाणी आटोपल्यानंतर सॅम्पॅक् वरच्या मजल्यावर गेला आणि त्यानें तेथल्या एका खोलींत डोकावलें. आंतल्या खाटेवर डॉक्टर प्रेसकॉट झोंपले होते आणि त्यांची चर्या अतिशय फिकट दिसत होती.

पहाणीचें काम संपल्यानंतर सॅम्प्पॅक्नें आपल्या जवळच्या चाव्या त्या दोघांपैकीं एका चिनी तरुणाकडे दिल्या आणि तो जवळच्या जिन्यानें वरच्या मजल्यावर असलेल्या त्या सात डोळ्यांच्या देवीकडे गेला, त्यावेळीं ती जागा जवळ जवळ अंधारांतच होती. फक्त दारावरील रेशमी पडद्यांतून प्रकाश दिसत होता.

सॅम्पपॅक्नें तो पडदा बाजूला सरकविला आणि तो चिनी भाषेंत म्हणाला, ' मालक, मी येथें आलों आहें. '

' माझ्या मित्रा, तूं आतां म्हातारा लागला आहेस ' फू–मांच्यू म्हणाला, ' मला तूं फार वेळ तिष्ठत ठेवलेंस, तुझ्यावर सोंपविलेल्या कामगिरीचा मला रिपोर्ट हवा आहे. '

'कार्लो अपयशी ठरला हें तुम्हांला माहीत आहेच? त्यानें कोणता पुरावा मागें ठेवला असावा याची मला कल्पना नाहीं, पण त्या ब्लॉन्डी-बद्दलचा तुमचा हुकूम अंमलांत आणण्यांत आला आहे.' सॅम्प्पॅक् म्हणाला, 'तो कार्लोला घेऊन आला, मी त्या दोघांची मुलाखत घेतली. कार्लोला सूचना दिल्या आणि तो निघून गेल्यानंतर ब्लॉन्डीला पैसे दिले. नंतर बाकीचें काम माझ्या दोघां जोडीदारांनीं पूर्ण केलें... आतां फक्त तीन शेंदरी राण्या आपणांकडे शिल्लक आहेत.'

× × × ×

एका तासानंतर नेलॅंडनें हेपबर्नसह दोन प्रेतें पाहिलीं. दोघांचीहि पोलिसांना माहिती होती. चाळिसाव्या मजल्यावरून खालीं कोसळलेल्या माणसाचें नांव पेटर कार्लो असें होतें. तो न्यूयॉर्कमधील उंच इमारतींवर चढण्यांत वस्ताद होता. त्याच्याजवळ अगदीं हलकीच घडी करतां येईल अशी लांब टेलिस्कोपिक नळी असे. ज्या खोलींत त्याला प्रवेश करता येत नसे तेथल्या वस्तु तो खिडकीबाहेर राहून त्या नळीनें उचलीत असे.

जर फायदा होण्याची शक्यता असली तर कार्लो न्यूयार्कमधील स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्यावरहि चढेल असें कार्लोबद्दल म्हटलें जात असे. हेपबर्नची एक गोळी त्याच्या उजव्या हातावर बसली होतीं व दुसरी उजव्या खांद्यांत घुसली होतीं. त्या गोळीबारानें तो मरण पावला नव्हता. पण त्यामुळेंच त्याचा तोल जाऊन तो जमिनीवर आदळला होता.

दुसऱ्या माणसाचें नांव ब्लॉन्डी होतें. तो न्यूयॉर्क मवाल्यांचा एक प्रख्यात दादा म्हणून ओळखला जात होता. त्याचें प्रेत नदींतून बाहेर काढण्यांत आलें होतें. त्याला बुडून मृत्यु आला नव्हता. त्याच्या अंगावर व तोंडावर शेंदरी ठिपके होते. आणि त्याच्या खिशांत एक पत्त्यांचा जोड ठेवण्याची पेटी होती. पण त्या पेटींत पत्त्यांऐवजीं पैसे होते.

'आतां याच्या मृत्यूचें रहस्य उलगडलें,' नेलॅंड त्या कागदी पेटीकडे पहात म्हणाला. 'पैसे मोजण्यासाठीं पेटी उघडली व त्याबरोबर त्याला मृत्यूनें गांठलें. या दोन हजार डॉलर्सच्या नोटा आहेत. डॉ. फू-मांच्यू नेहमीं आपलें कर्ज सव्याज फेडीत असतो.'

× × × ×

ते पाचूप्रमाणें तेजस्वी हिरवे डोळे उघडले जातांच मोया अडेरनें आपले डोळें बंद केले. फू-मांच्यू बोलत होता.

‘ मला तुझा खुलासा मान्य आहे. आपणांपैकीं सर्वांच्याच हातून चुका घडतात. पण, तूं माझें काम उत्तम प्रकारें केलें आहेस. तूं अतिशय सुंदर आहेस व त्यामुळेंच मी तुला जवळ केलें आहे. माणूस कितीहि हुषार किंवा कावेबाज असला तरी त्याला सुंदर चेहऱ्याचा मोह टाळतां येत नाहीं. पण मोया, माझी इच्छा तीच तुझी असली पाहिजे नाहींतर आपणांला एकमेकांचा निरोप घ्यावा लागेल.

‘मीं वृद्ध आहें. तुला कल्पना करतां येणार नाहीं इतका वृद्ध आहें.माझी पूजा करण्यांत येते.माझा आत्यंतिक तिरस्कारहि करण्यांत येतो.माझी खुषामत करण्यांत येते, चेष्टा करण्यांत येतें. विश्वासघात करण्यांत येतो, मला अत्यंत नीच गुन्हेगारहि मानण्यांत येतें. तीन युरोपियन राष्ट्रांमध्यें मला पकडण्यासाठीं वॉरंटें सुटलीं आहेत. पण मला स्वतःचा असा कांहींच स्वार्थ साधायचा नाहीं.

‘ माझ्या वाटेंत जे आडवे येतात. त्यांना मी नाहींसें करतों हाच माझा गुन्हा आहे. सर्व जग सुखीसमाधानी व शहाणें असावें असें माझें स्वप्न आहे पण लोक मलाच वेडा समजतात. जगांत लढाई करणें अशक्य व्हावें, सर्व रोगराई नष्ट व्हावी. भलत्याच प्रजावाढीला आळा बसावा. काम करणाऱ्यांना रोजगार मिळाला. सर्व जगांत शांतता आणि स्नेहभाव नांदावा असें माझें ध्येय आहे. या ध्येयासाठीं काम करणारीं फक्त तीनच माणसें आढळलीं आहेत. आणि आतां माझा कट्टर शत्रू माझ्यामागें लागला. ईश्वरा, माझें ध्येय हें केवळ स्वप्न ठरून एखाद्या बदमाशांप्रमाणें मला तुरुंगांत मृत्यू येणार काय ?

मोया आतां डोळे उघडून पहात होती. कारण तो डोळे मिटून बोलत होता. अचानक तो उभा राहिला आणि कर्कश स्वरांत म्हणाला, ‘ अमेरिकेंत मला हवी तशी पण बरीच ओबडधोबड संघटना आहे असें मला आढळलें.

ज...४

दारूबंदीच्या सरकारी धोरणामुळें जगांतील कायदे मोडणारे, या देशांत एकत्र झाले आहेत. सूज्ञाकडून मला पाठिंबा मिळत नाहीं. त्यामुळेंच मला चोर दरवडेखोरांचा उपयोग करावा लागतो. अर्थातच बरेच कोळी सरकारी हालचालीमुळें नाहिंसे झाले आहेत पण त्यांचीं जाळीं दुरुस्त करतां येतील.

'मोया, बायकांना समजत नाहीं, त्यांना तें समजूं नये अशीच ईश्वरानें त्यांची घडण बनविली आहे. पण पुरुषांना समजूतदारपणासाठीं बायकांचाच धांवा करावा लागतो.'

तो आतां तिच्यावर आपली भेदक नजर रोखून बोलत होता. तिला आपली नजर दुसरीकडे वळविणें शक्य नव्हतें. त्यानें जणुं काय तिच्या शरिराचा, बुद्धीचा ताबा घेतला होता. त्या हिरव्या डोळ्यांत जादू होती. भयानक शक्ति होती. पण त्या नजरेंत आणखीहि कांहीं होतें त्यामुळें ती त्याच्या आज्ञेंत रहाण्यास तयार झाली होती.

'माझा तुझ्यावर विश्वास नाहीं. जगांत पुरुषानें कोणत्याहि स्त्रीवर विश्वास ठेवूं नये. पण तरीहि मी माणूसच आहें. पाश्चिमात्य जग जिला सुधारलेली मानवता म्हणते तिचा चुराडा करण्यांसाठीं हें शेवटचें युद्ध लढतांना मला एकाकी वाटत आहे. म्हणून मी तुला अधिक विश्वासांत घेत आहें. जे माझी सेवा करतात असें भासवितात, त्यांच्यावर नजर ठेवण्याचें साधन माझ्याजवळ आहे. कुणावर विश्वास ठेवावा तें मला समजतें...'

मिसेस अडेरला त्याच्या त्या डोळ्यांकडे पहात असतांना आपण कुठल्या तरी हिरव्यागार सरोवरांत डुंबत आहोंत असें वाटत होतें. तो कितीतरी अंतरावरून बोलत आहे असा तिला भास होत होता.

'माझ्या इच्छेविरुद्ध वागणें याला मी गुन्हा समजतों. मीहि कित्येक बाबतींत इतर माणसांप्रमाणेंच आहें. मी माझें ध्येय साधीन तेव्हां मी जगावर हुकमत गाजवितांना जे माझ्याशीं एकनिष्ठतेनें वागले त्यांना माझे जरूर भागीदार बनवीन या एवढ्या मोठ्या प्रचंड देशांत मी फक्त एकाच व्यक्तीला माझी म्हणूं शकतो... लोला, मी आतां तुला हार्वेकडे पाठविणार आहें. माझ्या सूचनांप्रमाणें तुला वागावें लागेल.'

\+ \+ \+

' हार्वेनें ड्युमासच्या प्रासादतुल्य जागेंत प्रचंड मेजवानीचा बेत आंखला होता. असल्या मेजवान्यांमुळेंच त्याला खूप प्रसिद्धी आणि लोकप्रियता लाभली होती. न्यूयॉर्कवर त्याची लोभी दृष्टी खिळली होती आणि आपण तें शहर पिळून काढूं असें त्याला वाटत होतें. या कामीं लोला ड्युमासची चांगली मदत होत होती. तिच्या वडिलांच्याच घरांत त्यानें तो मेजवानीचा बेत आखला होता आणि आपली इच्छा हाच कायदा अशा अरेरावी सम्राटाच्या थाटांत तो वागत होता.

लोलानें दोन वेळां विवाह केला होता आणि दोन वेळां घटस्फोट घेतला होता. घटस्फोट घेतल्यानंतर ती पुन्हा ड्युमास घराण्याचें नांव धारण करीत होती. तिच्या बापानें खूप पैसा कमाविला होता. आणि मंदीच्या काळांत बहुतेक गमाविला होता. त्यांचें घराणें फार प्रसिद्ध होतें. तें घराणें इतक्या थाटांत कसें राहूं शकतें याचें अनेकांना आश्चर्य वाटे पण कांहीं धूर्त लोक जो माणूस अमेरिकेचा हुकूमशहा बनण्याच्या मार्गांत होता तो व ड्युमासची सुंदर मुलगी यांच्या मैत्रीशीं त्या गोष्टीचा संबंध जोडीत असत.

लोला ड्युमासनें त्या मेजवानीसाठीं हिरव्या पांचूच्या रंगाचा पेहेराव केला होता; पण लक्षपूर्वक पहाणाऱ्याला त्या तलम कापडयांतून तिचा नाजूक देह पहातां येत होता.

मेजवानीची जागा माणसांनीं फुलून निघाली होती. समाजांतील प्रमुख माणसें आणि निरनिराळ्या मतांचें राजकारण तेथें होतें, तंबाखूच्या धुरानें सर्व वातावरण भरलें होतें, अनेकजण बोलत होते. दारू तर नायगाराच्या धबधब्याप्रमाणें वहात होती. बहुतेक लोक, यजमानीण आणि तिचे वडिल यांच्याकडे पहात होते.

हार्वे अचानक तेथें आला आणि त्याबरोबर सर्वांच्या नजरा त्याच्याकडे वळल्या. अनेक छायाचित्रकार पुढें सरसावले. वार्ताहरांनीं आपल्या वह्या उघडल्या. तो माणूस दिसण्यांत आकर्षक होता.

' मित्रहो, मला उशीर झाला याबद्दल मी तुमची क्षमा मागतों, पण माझी खात्री आहे कीं, ड्युमास पिता-पुत्रीनें तुमचें योग्य स्वागत केलें असणार, ' तो हंसून म्हणाला.

छायाचित्रकारांचें काम चालू होतें. वार्ताहर त्याचा प्रत्येक शब्द लिहून घेत होते. हार्वे आपला एक हात उंचावून म्हणाला, ' काय ऐकण्याची तुमची इच्छा आहे तें मला माहित आहे. कार्नेगि हॉलमधें मी डॉ. प्रेसकॉट्ना काय सांगणार आहे तें तुम्हांला ऐकावयाचे आहे. '

आतां एकदम शांतता पसरली, फक्त वार्ताहरांच्या हातांतील झरण्यांचाच आवाज येत होता.

' मी त्यांना फक्त एकच गोष्ट सांगणार आहें, ज्यावर आपण सर्व अतिशय प्रेम करतों तो आपला हा देश असमाधानी आहे–सुखी नाहीं. आपण वाईट दिवस अनुभविले आहेत, संकटाशीं झगडलों आहोंत पण अद्याप जिवंत आहोंत. मला डॉ. प्रेसकॉट्ना विचारायचें आहे कीं, तुम्हीं फादर ॲबॉट्चा जुनापुराणा माल विकणार कीं स्वतःच्या मालाची विक्री करणार ?'

टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्या कामीं ड्युमासनें पुढाकार घेतला होता.

' मित्र हो, मला असें म्हणावयाचें नाहीं कीं, फादर ॲबॉट्चा सर्व माल टाकाऊ आहे, पण नवीन माल योग्य भावांत मिळत असतांना जुना माल अधिक भावांत खरेदी करण्यांत काय अर्थ आहे ? मला एकच गोष्ट ऐकावयाची आहे कीं, प्रेसकॉटनें किती वचनें दिलीं आणि त्यांतील किती पाळलीं? मी कधींच वचन देत नाहीं, मी करून दाखवितों. जी आमची चांगल्या अमेरिकनांची संस्था या नांवाची संघटना आहे त्यामधील एकही माणूस बेकार आहे असें तुम्हांला दाखवितां येणार नाहीं. '

पुन्हां टाळ्यांचा कडकडाट झाला.

' आपणांला असा माणूस हवा आहे कीं जो बोलल्याऐवजीं करून दाखवितो. आतां लढाईची सुरवात झाली आहे. एका बाजूला फादर ॲबॉटला उभे करून डॉ. प्रेसकॉट् उभे आहेत आणि दुसऱ्या बाजूला मी उभा आहें ! अमेरिका प्रत्येकाची आहे आणि प्रत्येक माणूस अमेरिकेचा आहे ! '

पुन्हां टाळ्यांचा कडकडाट झाला. एक हात उंचावून उभ्या असलेल्या हार्वेचीं अनेक छायाचित्रें घेण्यांत आलीं. त्याच्या प्रभावी वक्तृत्वाचा सर्वांवरच परिणाम झाला होता.

एकाएकीं त्याचा खाजगी सेक्रेटरी गर्दीतून वाट काढीत पुढें आला आणि हार्वेनें हळूंच विचारलें, कांहीं महत्त्वाचें आहे ? '

' नंबर बारा दिसण्यांत अतिशय सुंदर आहे. ' सेक्रेटरी म्हणाला.

' मित्र हो, क्षमा करा, मी दोन मिनिटांत परत येतों. ' हार्वे म्हणाला.

त्यांचें तें संभाषण जवळ उभ्या असलेल्या लोलानें ऐकलें. तिनें आपला ओंठ चावला आणि ती जो हार्वेचा मित्र नव्हता अशा एका राजकारणी माणसाकडे वळली. एक वार्ताहर तिच्यामागें गेला आणि त्यानें तिला बोलण्यांत गुंतविलें.

पांच मिनिटांनीं हार्वे एका सुंदर तरुणीचा हात धरून तेथें परत आला आणि मोठ्यानें म्हणाला, ' मित्र हो, ही पहा माझी नवीन सेक्रेटरी, या छोट्या मुलीला राजकारणाचें जितकें ज्ञान आहे तितकें मलाहि नाहीं...'

× × × ×

नेलँड स्मिथ आपल्या बैठकीच्या खोलींत फेऱ्या घालीत होता. दार ठोठावण्याचा आवाज झाला आणि नेलँड एका बाजूला सरकला. फेनें हातांत पिस्तूल लपवूनच दार उघडलें, आतां आलेला माणूस उंच, फिकट चर्येचा दाढीवाला होता.

नेलँड घाईघाईनें पुढें सरकून म्हणाला, 'हेप्बर्न तूं सुखरूप परत आलास याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतों. काय बातमी आहे ? '

कॅ. हेप्बर्न हा वेषांतर करण्यांत कुशल होता. तो आपल्या डोळ्यां-वरील चष्मा दूर करून म्हणाला, ' मी नुकताच हार्वेच्या मेजवानीला हजर राहून परतलों आहें. रिपोर्ट देण्यासारखें कांहीं महत्त्वाचें नाहीं, पण त्याचा जो सेक्रेटरी आहे तो फू-मांच्यूचा माणूस असावा.

' तर मग फू-मांच्यूची त्याच्यावर दुहेरी नजर आहे.' नेलँड म्हणाला, ' लोला डच्मास ही खात्रीनें फू-मांच्यूची हस्तक असणार ! '

' हो, पण तिचा आणि त्याचा थोडा बेबनाव झाला असावा असें दिसतें. ' हेप्बर्न म्हणाला, ' मी तेथून निघण्यापूर्वी हार्वेला भेटण्यासाठीं एक बाई आली होती, त्यावेळीं त्याचें व त्याचा सेक्रेटरी साल्व्हेटी यांचें जें संभाषण झालें तें लोला ऐकत होती आणि तें ऐकून ती नाराज बनली होती.

‘ मला त्या साल्व्हेटीचें वर्णन ऐकूं दे.’ नेलँड म्हणाला.

‘ तो मध्यम उंचीचा, फिकट चर्येचा थोडें पोंक काढून चालणारा, निळसर डोळ्यांचा, काळ्या केसांचा, बारीक आवाजाचा आणि सदा हस्यमुख असा माणूस आहे, मी त्याला पूर्वीं कधींच पाहिलें नव्हतें.’

‘ तो खात्रीनें अमेरिकन गुंडांपैकीं असावा, वर्णनावरून तो माझ्याहि ओळखीचा नसावा असें दिसतें, पण हार्वेला भेटावयास आलेल्या त्या तरुणीचें काय झालें ? ’

‘ तिला हार्वेनें आंत आणलें आणि ती आपली नवीन सेक्रेटरी म्हणून तिची जाहिरात केली.’ हेप्बर्न म्हणाला, ‘ त्या तरुणीबद्दलच मला तुमच्याशीं बोलावयाचें आहे आणि तुमचा सल्ला हवा आहे. काय करावें तें मला समजत नाहीं. माझ्या निष्काळजीपणामुळेंच फादर ॲबॉट्च्या मनोऱ्यांतून निसटलेली मिसेस् अडेर हीच हार्वेची नवीन सेक्रेटरी बनली आहे ! ’

७

फू–मांच्यूची हालचाल

ज्या उंच छताच्या खोलींत तो विलक्षण स्मरणशक्तीचा वृद्ध शिल्पकार आपलें बहुतेक आयुष्य घालवीत होता तेथले दिवे अचानक मालवले आणि नंतर नेहमीचा आवाज ऐकूं आला.

‘ नेलँड स्मिथबद्दलचा रिपोर्ट सांगा.’

‘ गेल्या बारा तासांत तो आपल्या जागेंतून बाहेर पडला असा पुरावा नाहीं, तो प्रेतें पहावयास गेला होता असें चवेचाळीस नंबरनें सुचविलें पण त्या बातमीला दुजोरा मिळाला नाहीं. आपलीं दहा माणसें आणि दोन मोटारी त्या जागेबाहेर आहेत. कॅ. हेप्बर्नहि बाहेर पडला नाहीं.’

'आतां फादर ॲबॉटबद्दल माहिती दे.'

'तीस मिनिटांपूर्वी शेवटचा रिपोर्ट आला. ॲबॉट्सारखा दिसणारा एक माणूस अलमिरा येथें भाड्यानें मोटार ठरवीत होता, तो विमानानें तेथें आला आणि आपण ब्रिटिश आहोंत असें भासवीत होता. त्यानें फक्त एकाच डोळ्याला चष्म्याची कांच बसविली आहे.'

न्यूयॉर्क शहरांतील अत्युच्च ठिकाणीं असलेल्या आपल्या खोलींत डॉक्टर फू–मांच्यू आपल्या मोठ्या टेबलाजवळ एकटाच बसला होता. ज्या माणसाची सर्व जगभर आपलें साम्राज्य प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा होती, आणि हजारों लोक ज्याचे हुकूम तत्परतेनें पाळीत होते, अशा त्या माणसाचें आयुष्य अगदीं एकलकोंडें होतें. पण एकांतवास ही अनेक कल्पनांची जननी आहे. तो आतां डोळे मिटूनच एका यंत्रांतून बोलत होता.

'बरींच माणसें मोटारींतून पाठवा आणि मी सांगितलेल्या मार्गावरील सर्व हॉटेलांची आणि घरांची तपासणी करा. फादर ॲबॉट वेगळें नांव धारण करून आणि आपण ब्रिटिश प्रवासी आहोंत असा बहाणा करीत प्रवास करीत आहेत. तो सांपडला तर त्याला त्रास द्यावयाचा नाहीं. पण अडकवून ठेवायचा आणि वेळोवेळीं त्याच्या संबंधींचें रिपोर्ट पाठवायचेही खुद्द प्रेसिडेंटची खास आज्ञा आहे.'

फू–मांच्यूनें तें यंत्र बंद केलें. नंतर तो आपला खास पाईप ओढूं लागला. अठ्ठेचाळीस तासांत तो झोपला नव्हता...

अगदीं त्यावेळीं नेलँड स्मिथ आपल्या खोलींत झोपला होता आणि दुसऱ्या खोलींत हेप्बर्न टेलिफोनवरून हुकूम सोडीत होता.

'जो ब्रिटीश माणूस अलमिरा येथें विमानानें आला. त्याच माणसाचा आपण शोध करीत आहोंत असें दिसतें. जर तो अलमिराहून पुढें निघाला असें तुम्हांला वाटलें तर त्याचा पाठलाग करा. एक वायरलेस मोटार बरोबर घ्या आणि त्याच्या हालचालीसंबंधींची वेळोवेळीं माहिती पाठवा. जरी तो फादर ॲबॉट आहे अशी तुमची खात्री पटली तरी माझ्या सूचना मिळाल्याशिवाय पुढलें पाऊल टाकूं नका. आपण वर्तमानपत्रांतून त्याच्या संबंधींची कांहीं माहिती प्रसिद्ध होऊं नये अशी व्यवस्था केली आहे. पण तो बहुधा

न्यूयॉर्क येथें येत असावा आणि कार्नेगि हॉलमधील चर्चेला प्रेसकॉट हजर राहूं शकले नाहींत तर तो त्यांचीच जागा घेणार होता. तसें झालें तर आपली सर्व योजना ढांसळून पडेल.' हेप्बर्ननें आपलें बोलणें थांबविलें.

+ + +

एका वाटेवरील हॉटेलांत दोन माणसें कॉफीपान करीत होतीं. ती जोडी विचित्र होती. त्यांच्यांतील एक गुळगुळीत दाढी केलेला लांबट चेहेऱ्याचा आणि करडचा केसांचा माणूस होता. त्यानें आपल्या एकाच डोळयावर मोनोकल जातीचा चष्मा बसविला होता आणि तो पाईप ओढीत होता, त्याचा जोडीदार शरिरानें त्याच्याच बांध्याचा होता. तो अधु दृष्टीच्या माणसाप्रमाणें आपल्या डोळयांची सारखी उघडझाप करीत होता, त्या दोघांकडे निरखून पहाणाऱ्यांना त्यांच्यांत बरेंच साम्य दिसलें असतें.

ते दोघेहि वाटसरू एकमेकांशीं गप्पागोष्टी करीत असतांना तीन माणसें दार उघडून आंत आलीं, ते तिघेहि शरिरानें धिप्पाड होते आणि त्यांच्या मुद्रा कठोर दिसत होत्या.

'शेवटीं सुदैवानें हात दिला!' त्या तिघांतील एक म्हणाला.

ते तिघेहि मोनोकल लावणाऱ्या माणसाकडे पहात होते. नंतर त्यां तिघांचा पुढारी पुढें झाला आणि त्या माणसाच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, 'एका मिनिटाकरितां आंत चला मी तुम्हांला एक-दोन प्रश्न विचारणार आहें'

'याचा अर्थ काय?' त्या माणसानें जोरांत विचारलें.

'मी सरकारी माणूस आहें आणि माझें कर्तव्य म्हणून तुम्हांला प्रश्न विचारणार आहें.'

तो माणूस रागानें बोलणार होता. पण त्याच वेळीं त्याचा अधु डोळयांचा जोडीदार म्हणाला, 'सरकारी अधिकाऱ्यांना मदत केलीत तर तुमचा बराच त्रास वाचेल.'

त्या मोनोकल लावणाऱ्या माणसानें तो सल्ला मान्य केला आणि तो त्या तिघांबरोबर हॉटेलाच्या आंतल्या खोलींत गेला.

‘ आतां पुढें जाण्याची आवश्यकता नाहीं.’ त्या तिघांचा प्रमुख म्हणाला, ‘ फादर अबॉट, या वेषांतराचा अर्थ काय ? ’

‘ अॅबॉट ? माझें नांव अॅबॉट नाहीं, ’ तो माणूस रागानें म्हणाला, ‘ तुमची चूक होत आहे. ’

त्यानें खिशांत हात घातला, त्याबरोबर त्याच्यावर तीन पिस्तुलें रोख-ण्यांत आलीं. त्या माणसानें त्याकडे दुर्लक्ष करून खिशांतील ब्रिटिश पासपोर्ट काढून दाखविला, पुढाऱ्यानें त्या पासपोर्टवरील फोटो त्या गृहस्थाच्या चेहेऱ्याशीं ताडून पाहिला आणि तितका वेळ त्या ठिकाणीं चमत्कारिक शांतता पसरली.

‘ मित्रांनो, खरोखरच आपली चूक झाली असें दिसतें, ’ तो प्रमुख म्हणाला, ‘ हे ब्रिटिश सैन्यांतले कॅप्टन जॉर्ज आहेत. तुम्हीं तळावर टेलि-फोन करा आणि प्रेसिडेंटच्या सूचना विचारा. ’

आणखी दहा मिनिटांनीं कॅप्टन जॉर्ज त्या हॉटेलच्या पुढल्या खोलींत एकटाच बसला होता. ते तिघे अधिकारी निघून गेले होते. त्याला सल्ला देणारा तो अधु डोळ्याचा पाद्री तेथें नव्हता. कॅप्टन जॉर्ज बुचकळ्यांत पडला होता आणि रागावलाहि होता.

पुन्हां मोटार थांबण्याचा आवाज झाला. या खेपेला दार उघडून दोन माणसें आंत आलीं. त्यांच्यापैकीं एकजण हंसून म्हणाला, ‘ साहेब, हेच ते !

साहेब हंसत पुढें सरकले. त्यानें जॉर्जला आपला बिल्ला दाखविला आणि तो म्हणाला, ‘ नमस्ते फादर अॅबॉट ! तुम्ही आमची बरीच धांवपळ उडविलीत ! ’

कॅ. जॉर्ज रागानें म्हणाला, ‘ आतां ही मर्कटचेष्टा पुरे झाली. ’ आणि एका जुनाट पण वेगवान फोर्ड मोटारींतून फादर अॅबॉट न्यूयॉर्कच्या दिशेनें वेगानें प्रवास करीत होता. त्यानें त्याला शोधणाऱ्यांना व्यवस्थित झुकांडी दिली होती !

× × ×

मोया अडेर हिच्यावर सोंपविण्यांत आलेल्या नव्या कामगिरीनें ती घाबरली होती. लोला डयुमासला शह देण्यासाटीं त्या भयंकर चिनी माण-सानें तिची व्यवस्था केली होती. पण मोयाला लोलाची भीति वाटत होती.

ती ज्या हॉटेलांत तिची राहण्याची व्यवस्था करण्यांत आली होती तेथें बसली होती, अमेरिकेच्या भावी हुकूमशहानें आपणाला एखादी गुलाम तरुणी भेट म्हणून मिळाली आहे अशाप्रकारें तिचा स्वीकार केला होता आणि वेळींप्रसंगीं तिला सहाय्य करण्यास कुणीहि नव्हतें. पण कां कुणाला ठाऊक तिचा त्या प्रेसिडेंटवर विश्वास होता.

त्या दिवसाच्या वर्तमानपत्रांत रिचेटच्या रहस्यमय मृत्यूच्या बातमीला लगेच प्राधान्य देण्यांत आलें होतें, पण प्रेसिडेंटच्याच हुकुमानें त्याला ठार करण्यांत आलें हें मोया मनांत समजून होती, त्या भयंकर चिनी माणसाची शक्ति अमर्याद होती, पण आतांपर्यंत त्यानें तिला कोणतेंहि घाणेरडें कृत्य करण्यास भाग पाडलें, नव्हतें.

तिला मिळालेल्या पहिल्या सूचनेप्रमाणें कार्नेगि हॉलमधील चर्चेत भाग घेणाऱ्या हार्वेला त्यानें काय बोलावें यासंबंधींचीं टाईप केलेलीं टिपणें तिनें त्याला दिलीं होतीं आणि कित्येक मुद्यांबाबत हार्वेनें आपली नापसंति व्यक्त केली होती. हार्वेची आणि प्रेसिडेंटची अद्याप प्रत्यक्ष भेट झालेली नाहीं हें तिनें त्यावरून ओळखलें होतें.

'तूं तुझ्या त्या प्रेसिडेंटला सांग, मला त्याचे पैसे हवे आहेत, हुकूम नको.' हार्वे जोरांत म्हणाला.

त्या सूचना पाळल्यामुळें यश अधिक जवळ येईल असें तिनें सांगितलें तेव्हां हार्वे तिच्याबरोबर चर्चा करूं लागला, त्यांत त्याला यश आलें नाहीं. तेव्हां तो तिच्याबरोबर प्रेमाचे चाळे करूं लागला, पण साल्व्हेटी अचानक मधें पडल्यामुळें अतिप्रसंग टळला होता. पण साल्व्हेटीची तिला हार्वेपेक्षांहि अधिक भीति वाटत होती.

फादर अॅबॉटच्या मनोऱ्यांतून पळ काढल्यापासून पोलीस आपणांला पकडतील अशी तिला सारखी भीति वाटत होती. हार्वेच्या पकडींतून निसटून

ती आपल्या हॉटेलांत पोहोंचली आणि त्याच वेळीं एक काळा चष्मा लावलेला माणूस तिला भेटावयास आला, त्यानें आपला बिल्ला तिला दाखविला आणि तो सरकारी अधिकारी आहे हें तिनें ओळखलें.

त्याचा आवाज तिला ओळखीचा वाटत होता. जेव्हां त्यानें आपल्या डोळयावरील काळा चष्मा दूर केला तेव्हां तिला ओळख पटली आणि कां कुणाला ठाऊक तिला त्याबद्दल आनंद झाला. जरी त्या माणसानें दाढी वाढविली होती तरी आपण मनोऱ्यांतून निसटतांना ज्यानें आपणांला पकडलें होतें, तोच तो अधिकारी आहे हें तिनें ओळखलें.

' मला अटक करण्यांत आली आहे काय ? तसें असल्यास आतां मी तुमच्या हातून निसटणार नाहीं. ' ती म्हणाली.

हेप्बर्ननें तिच्याकडे रोखून पाहिलें, नंतर तो मनाची चलबिचल लप-विण्यासाठीं कठोर स्वरांत म्हणाला, ' मिसेस अडेर, तांत्रिक दृष्टया तुम्हांला अटक करणें हें माझें कर्तव्य आहे; पण तुम्हीं त्या रात्रीं मनोऱ्यांतून निसटल्या-पासून मी तुमच्याशीं बोलण्याची संधि पहात आहें. ' फादर ॲबॉट यांच्या येथें तुमचा सहकारी या नात्यानें काम करणाऱ्या एका माणसाचा रिगल हॉटेलासमोर नुकताच खून झाला हें तुम्हीं ऐकलेंच असेल ?'

' होय, मी त्याच्या मृत्यूची बातमी वाचली पण त्याचा खून झाला असें तुम्हीं कां म्हणतां ?' तिनें विचारलें.

' कारण ज्यानें तो खून केला त्याला तुमच्याप्रमाणें मीहि ओळखतों. तो फू–मांच्यू होता. '

त्यानें त्या नांवावर जोर दिला होता, तो प्रेसिडेंटबद्दल बोलत आहे हें तिनें तर्कानें ओळखलें होतें पण त्या संघटनेंतील कुणालाहि प्रेसिडेंटचें नांव माहित नव्हतें.

' माझ्या माहितीप्रमाणें मी कधींच फू–मांच्यू नांवाच्या माणसाला भेटले नाहीं. ' ती म्हणाली.

नेलॅंडनें जरी तें काम त्यानें त्याच्या पद्धतीप्रमाणें करावें अशी मान्यता दिली होती तरी आपण हातीं घेतलेलें काम आपल्या शक्तीबाहेरचें आहे

असें त्याला आढळून आलें होतें. ती बाई आपल्या स्वातंत्र्यासाठीं झगडत होती आणि तो तिचा छळ करूं शकत नव्हता.

'मिसेस अडेर, तुम्हांला त्रास देणें मला आवडत नाहीं. पण या देशाचा ताबा मिळविण्यासाठीं कट रचण्यांत आला आहे हें तुम्हांला माहित असेल तुम्हीं त्या कटांत आहांत. पण मी तुमच्या सुरक्षिततेची हमी देतों, तुमचें गांव कोणतें ? तुमचे वडील सध्यां कोठें आहेत हें मला माहित आहे....'

त्यानें जेन्हां तिच्याबद्दलची सर्व माहिती सांगितली तेव्हां तिला आश्चर्य वाटलें, तो माणूस प्रामाणिक होता, तिला त्यानें स्वातंत्र्य देऊं केलें होतें, तिला तिचें पूर्वीचें जीवन जगण्याची संधि मिळणार होती. पण त्यानें जें देऊं केलें होतें तें स्वीकारण्याची तिच्यांत हिंमत नव्हती.

'मिसेस् अडेर, खुनी टोळीमध्यें तुम्हांला जागा नाहीं, तुमचें जग अगदीं वेगळें आहे. माझी अशी इच्छा आहे कीं, तुम्हीं सत्याच्या बाजूला असलें पाहिजे, असत्याच्या नाहीं. माझ्यावर विश्वास ठेवलात तर तुम्हांला पश्चा-त्ताप करण्याची पाळी येणार नाहीं. पण जर कांहीं लबाडी करण्याचा प्रयत्न केलात तर मला माझ्या अधिकाराचा उपयोग करावा लागेल.'

मोयाच्या चर्येचें निरीक्षण करीत त्यानें आपलें बोलणें थांबविलें, ती दुसरीकडे पहात होती. तिला आपलें बोलणें समजलें आहे. पण त्याला माहित नसलेलें कोणतें तरी दुसरेंच कोडें सोडविण्याचा ती प्रयत्न करीत आहे हेंहि त्यानें ओळखलें.

'मी तुमच्यावर विश्वास ठेवणार आहें.' ती बऱ्याच वेळानें म्हणाली. 'आपली भेट झाली याबद्दल मला आनंद होतो. मी आतां जें कांहीं सुचवि-णार आहें त्याप्रमाणें वागेन असें शपथेवर सांगितलें तर तुमचा माझ्यावर विश्वास बसेल काय ?'

त्यानंतर दोन मिनिटांनीं त्याच्याकडे दुरून पहाणारा इसम टेलिफोन-कडे धांवला आणि म्हणाला, 'मोया एका दाढीवाल्या आणि काळा चष्मा लावलेल्या माणसाबरोबर हॉटेलांतील खोलींत बोलत बसली आहे, आतां दोन वाजून पंचावन्न मिनिटें झालीं आहेत. माझा नंबर एकूण पन्नास.'

+ + +

डॉक्टर प्रेसकॉटनें आपले डोळे उघडले. तेव्हां त्यांना एक छोटी खोली दिसली, त्या खोलींतील दोन टेबलांवर कांचा बसविण्यांत आल्या होत्या आणि जवळच्या एका आरामखुर्चीवर एक सुंदर नर्स त्यांच्याकडे टक लावून पहात होती. ते ताबडतोब बोलले नाहींत. त्या नर्सकडे पहात ते विचार करीत होते.

कार्नेगि हॉलमधें कांहींतरी घडलें होतें आणि तें त्यांची हार्वेबरोबर चर्चा चालली असतांना घडलें होतें. पण काय घडलें होतें तें त्यांना आठवत नव्हतें. त्या नर्सच्या सुंदर चेहेऱ्याचें त्यांना अतिशय आकर्षण वाटलें, तिला त्यांनीं पूर्वीं कुठेंतरी पाहिलें होतें.

'नर्स, मी भांबावलों आहे. मी कुठें आहे तें मला सांगा.'

'डॉ. प्रेसकॉट, तुम्हीं हॉस्पिटलांत आहां, तुमची प्रकृति सुधारली याबद्दल मला आनंद होतो.'

'मी चर्चा चालली असतांना बेशुद्ध झालों काय ?'

'नाहीं, तुम्हीं तुमच्या बहिणीच्या घरांतून बाहेर पडलांत आणि बर्फामुळें पाय घसरून खालीं पडलांत, तुम्ही बेशुद्ध झाल्यामुळें तुम्हांला येथें आणण्यांत आलें पण आतां तुम्ही अगदीं बरे आहांत. तुम्हीं म्हणतां ती चर्चा झाली नाहीं, आज रात्रीं होणार आहे आणि तुम्ही त्यांत भाग घेऊं शकाल, तुमचे सेक्रेटरी बाहेर उभे आहेत.'

डॉ. प्रेसकॉट बुचकळयांत पडून तिच्याकडे पहात होता. तो म्हणाला, 'खरोखरच ती चर्चा झाली नाहीं ?'

'नाहीं, तुम्ही त्याबद्दल सारखे विचार करीत असल्यामुळें तुम्हांला तसें वाटतें. थांबा मी तुमच्या सेक्रेटरीलाच आंत पाठवितें.'

थोडचा वेळांतच त्यांचा सेक्रेटरी आंत आला आणि त्यानें मोठचा आनंदानें त्यांच्याबरोबर हस्तांदोलन केलें.

'नॉरबर्ट, तूं आलास हें फार चांगलें झाले,' प्रेसकॉट म्हणाले, 'माझ्या डोक्यात गोंधळ माजला आहे.'

‘ डॉक्टर, सध्यांतरी तें विसरा, ’ सेक्रेटरी म्हणाला, “ तुमची प्रकृति सुधारली आहे आणि तुम्हीं आज रात्रीच्या चर्चेत भाग घेऊं शकाल असें मला सांगण्यांत आलें आहे. ’

‘ पण चर्चा आज रात्रीं आहे हें खरें काय ?

‘ अर्थातच, हार्वेनें जीं वेळोवेळीं वक्तव्यें केलीं आहेत, त्यांची मी तुमच्याकरितां टांचणें तयार केलीं आहेत, तीं तुम्ही आतां पहाणार काय? ’

‘ एखाद्या दिवशीं याचा उलगडा होईल.’ डॉ. प्रेसकॉट म्हणाले, ‘आतां मला तीं टांचणें दाखव... ’

\+ \+ \+

एका छोटया खोलींत फू-मांच्यू बसला होता आणि त्याच्यासमोर सॅम्प् पॅक् उभा होता.

‘ आज रात्रीं डॉ. प्रेसकॉट चर्चेला हजर राहील अशी तूं हमी दिली आहेस, तो तेथें जावयास निघाला कीं त्याला टिंक्चरचे तीन ठिपके दिले पाहिजेत. ’

‘ ते देण्यांत येतील. ’ सॅम्प् पॅक म्हणाला.

‘ माझ्या मित्रा, आपणांला भलतींच माणसें हाताशीं धरावीं लागत आहेत आणि त्यांच्या हातून चुका होत आहेत. फादर ॲबॉट आपल्या जाळयांतून निसटला आहे आणि तो आपल्या एक नंबरच्या शत्रूच्या हातीं सांपडला आहे अशीहि खात्री नाहीं. पण आज रात्रीच्या चर्चेला तूं हजर रहाणें माझ्या योजनेच्या दृष्टीनें घातक आहे. सर्व कांहीं अनिश्चित आहे...

‘ मालक, युद्धामधें नेहमीच अनिश्चितता असते. ’ सॅम्पॅक म्हणाला.

‘ अनिश्चितता हा अयोग्य योजनेचा एक भाग असतो, फक्त मूर्खच अनिश्चित असतो. ’ फू–मांच्यू म्हणाला, ‘ माझ्या मित्रा, आपल्या मार्गांत बरींच संकटें आहेत, आतां आज रात्रीं तूं ज्याच्यावर कामगिरी सोंपविली आहेस त्या हर्मनला माझ्यासमोर उभा कर. ’

सॅम्पॅक्नें भिंतींतलें एक बटन दाबलें आणि त्याबरोबर तेथल्या दारावरील पडदा बाजूला सारून एक अतिशय धिप्पाड माणूस आंत आला,

कुणीहि त्या माणसाची कुरापत काढण्यास स्वखुषीनें तयार झालें नसतें, त्या माणसाच्या चर्येवर बेफिकीरी आणि अरेरावी झळकत होती.

हर्मननें सॅम् पॅक्‌कडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. आणि तो फू-मांच्यूकडे पहात म्हणाला, ‘ तूंच प्रेसिडेंट तर ? प्रेसिडेंट, तुझी-माझी भेट झाली हें फार चांगलें झालें. ’

‘ तशीच परिस्थिति असल्यामुळें ही भेट झाली आहे. आणि जर मी नाखूष झालों तर तुला या जागेंतून बाहेर पडणेंहि फार कठीण जाईल. ’ फू-मांच्यू म्हणाला.

‘ असल्या धमक्यांना मी भीक घालीत नाहीं, ’ आपलें पिस्तूल बाहेर काढून आणि तें फू-मांच्यूवर रोखून तो म्हणाला, ‘ कोणताहि धोका पत्क-रण्याची माझी तयारी असते. कारण मी स्वतःचें संरक्षण करूं शकतों. तूं हार्वेच्या बाजूचा आहेस म्हणून मी तुझ्या बाजूचा आहें, जर तूं त्याचा विश्वासघात करीत आहेस असें मला वाटलें तर मी क्षणांत तुझी तुझ्या चिनी स्वर्गांत रवानगी करीन !

‘ हार्वे हा अमेरिकेचा प्रेसिडेंट होणार आहे, हुकूमशहा बनणार आहे. दुसरा कुणीहि या देशाचें संरक्षणच करूं शकणार नाहीं. म्हणून जो माणूस हार्वेच्या मार्गांत आडवा येईल त्याला ठार करण्यास मी कचरणार नाहीं त्यानें मला त्याचा मुख्य शरीर-संरक्षक बनविलें आहे आणि तें योग्यच केलें आहे. ’

डॉ. फू-मांच्यू अगदीं स्तब्ध बसला होता. तो हलक्या आवाजांत म्हणाला, ‘ हार्वेवर तुझी निष्ठा आहे याबद्दल मुळींच शंका नाहीं. तो वादाचा मुद्दा नाहीं. तुझें हार्वेवर प्रेम आहे ही गोष्ट जाहीर आहे. ’

‘ मी त्याच्याकरितां प्राण देईन ’ हर्मन म्हणाला.

त्याच्या हातांतलें पिस्तूल अचानक अदृश्य झालें, दोघां माणसांनीं इतक्या शांततेनें तेथें प्रवेश केला होता कीं पडद्याच्या हालचालींचाहि आवाज झाला नव्हता, त्यांनीं जुळ्या चित्त्यांप्रमाणें हर्मनच्या अंगावर पाठीमागून उड्या घेतल्या होत्या.

'पाजी पिवळ्या विश्वासघातक्या ! ' हर्मन रागानें म्हणाला.

पण तेवढ्यांत पाठीमागून त्याच्या तोंडांत बोळा घालण्यांत आला. त्याचें हातपाय बांधण्यांत आले. तरीहि त्याला त्याच्यावर हल्ला करणारे दिसले नव्हते. नंतर त्याला उचलून नेण्यात आलें.

'माझ्या मित्रा, कांहीं तरबेज नोकरांना तू येथें आणूं शकलास हें फार चांगलें झालें' फू-मांच्यू म्हणाला, ' आज रात्रीं आपण आपलें सुदैव कसाला लावणार आहोंत. हार्वेला पढविण्याची कामगिरी जिच्यावर सोंपविण्यांत आली आहे त्या अडेरबाईवर माझा विश्वास आहे, ती माझ्या मुठींत आहे. पण तो माणूस कमालीचा उद्धट आहे आणि ऐनवेळीं तो कदाचित् धोका देईल. जर नंबर एकच्या हातीं फादर अॅबॉट असला तर कार्नेगि हॉलमध्यें त्याचा प्रवेश होतां कामा नये. मी व्यवस्था करूं शकतों. पण आणखीहि थोडीशी भीति आहे. म्हणून तू तेथें हजर असावास अशी माझी इच्छा आहे. '

फू-मांच्यू सॅम्प् पॅक सह त्या सात डोळ्यांच्या देवीच्या देवळांत गेला. नंतर तेथल्या एका खोलींत असलेल्या दगडी जिन्यानें त्या सहा रंगीत शव पेट्या असलेल्या जागेंत गेला आणि त्या ठिकाणीं असलेलें एक लोखंडी दार उघडून त्यानें एक छोट्या तुरुंगवजा खोलींत प्रवेश केला.

त्या खोलींत एक लहानसा दिवा जळत होता. तेथल्या एका बांकावर हर्मनला झोपवून बांधण्यांत आलें होतें. त्या दोघां चिनी सेवकांनीं तें काम नुकतेंच पु रेंकेलें होतें. फू-मांच्यूनें त्यांना तेथून जावयास सांगितलें. ते दोघेहि घामानें न्हाले होते. हर्मनचें शरीर कमरेपर्यंत उघडें होतें. तोहि घामानें भिजला होता आणि डोळे वटारून पहात होता.

' माझ्या मित्रा, त्याच्या तोंडांतून बोळा काढ.' फू-मांच्यू म्हणाला, आणि सॅम्प् पॅक्नें त्याप्रमाणें केलें.

'पाजी पिवळ्या ठगा, जर तूं हार्वेला दगा दिलास तर प्रेसकॉटला संधि मिळेल आणि या देशांत तुला हवा असलेला हुकूमशहा निर्माण होणार नाहीं. हार्वेइतका श्रेष्ठ माणूस या दुनियेंत नाहीं.'

'तूं हें तुझें मत बदलणार नाहींस ?' फू-मांच्यूनें विचारलें.

मला फितूर बनविण्याचा तूं प्रयत्न करशील हें मी ओळखलेंच होतें. पण दुनियेंतील सारें सोनें देऊनहि कुणी मला विकत घेऊं शकणार नाहीं. मी हार्वेकरता मरेन!'

'फार चांगलें.' फू-मांच्यू हातांत इंजेक्शनची सिरिंज घेऊन पुढें सरकतांना म्हणाला.

'तूं आतां माझें काय करणार आहेस?' हर्मननें घाबरूनच विचारलें. 'जर माझे हात मोकळे असते–'

'माझ्या मित्रा, मी तुला ठार करणार आहें! कारण यापुढें मला तुझी गरज नाहीं!' फू–मांच्यू म्हणाला.

'तर मग माझ्यावर गोळी झाड किंवा माझ्या छातींत सुरा खुपस पण तें इंजेक्शन–'

त्याच्या दंडांत ती सुई खुपसली जातांच त्यानें मोठ्यानें किंकाळी फोडली. त्यानें खूप धडपड केली होती, पण कांहीं उपयोग झाला नव्हता. नंतर त्याची हालचाल बंद पडली. डॉ. फू–मांच्यूनें खालीं वांकून त्या बेशुद्ध माणसाचा श्वासोच्छ्वासाचा आवाज ऐकला. नंतर तो सरळ उभा राहिला.

'आपणांला गरज लागेल त्याच्या दोन तास आधीं याला दुसरें इंजेक्शन द्यावयाचें आहे. हर्मन, त्या हार्वेचें संरक्षण करण्यासाठीं तूं अनेकांना ठार केलें आहेस. आतांपर्यंत मला सातजणांचीं नांवें मिळालीं आहेत आणखीहि असतील तेव्हां खून करतांना तुझा शेवट होणें उचित ठरेल!'

८

भयानक प्रकार!

कार्नेगि हॉलमध्यें तुफान गर्दी झाली होती. हार्वेच्या नागरिक संघाच्या सभासदांची संख्या पंधरा लाखांपेक्षां जास्त होती त्यांतील हजारों बेघर आणि

ज...'

बेकार लोकांना हार्वेनें रोजगार मिळवून दिला होता ही गोष्ट खोटी नव्हती. त्यामुळें सर्वसामान्य जनतेचा बराच मोठा भाग तो आपला रक्षणकर्ता आहे अशा भावनेनें त्याच्याकडे पहात होता.

पण शहाणे आणि विचारवंत लोक त्या माणसामुळें घटनेला धोका आहे हें ओळखून होते. या दोन प्रकारच्या लोकांमध्यें बुद्धिमान डॉ. प्रेस-कॉटनीं पाचर ठोकण्यांत यश मिळविलें होतें. त्यामुळें त्या दोहोंतील अंतर वाढत होतें. प्रेसकॉटचा युक्तिवाद शहाण्या नागरिकांना पटत होता. हार्वेची हुकूमशाही उलथून पाडणें हें डॉ. प्रेसकॉटचें ध्येय होतें पण त्यांचा डोळा अध्यक्षपदावर आहे असें मानणारेहि अनेक होते आणि डॉ. प्रेसकॉट आज आपली उमेदवारी जाहीर करतील अशा अफवा पसरल्या होत्या.

डॉ. प्रेसकॉटना अनेकांचा पाठिंबा होता आणि ऐन वेळीं जर फादर अँबॉटसारख्या लोकप्रिय आणि विद्वान् गृहस्थानें आपलें बळ जर प्रेसकॉटच्या तागडयांत ओतलें तर हार्वेलाहि टक्कर देण्यास ते समर्थ होतील असा जाण-कारांचा अंदाज होता.

ती अवाढव्य इमारत पोलिसांच्या संपूर्णपणें ताब्यांत होती. डयुमा-सच्या जागेपासून त्या हॉलपर्यंत ज्या रस्त्यानें हार्वे येणार होता तेथें जागो-जाग गुप्तचर पहाऱ्यावर होते. सभेच्या ठरलेल्या वेळाच्या एका तासा आधीं प्रेसकॉट कुठें आहे तें कुणालाहि माहित नव्हतें. तीन हजार निवडक लोकांना त्या हॉलमधें प्रवेश मिळाला होता आणि त्यांपैकीं प्रत्येकाच्या हालचालींकडे पोलिसांचें बारकाईनें लक्ष होतें.

नेलँड स्मिथ, तेथून कांहीं अंतरावर असलेल्या इमारतींतील आपल्या तात्पुरत्या ऑफिसांत बसला होता. फे टेलिफोन जवळ बसला होता. दाढी-वाला आणि काळा चष्मेवाला हेप्बर्न त्या इमारतीच्या मजल्या मजल्या-वरून फिरत होता. आणि नेलँडला बातम्या पुरवीत होता. ज्यांना प्रवेश मिळाला नव्हता असे हजारों लोक त्या हॉलबाहेर जमा झाले होते.

कांहीं वेळानें हेप्बर्न नेलँडच्या ऑफिसांत गेला तेव्हां प्रेसकॉटची बहीण मिस लेकिन तेथें बसली होती. आणि ती नेलँडशीं बोलत होती.

'माझ्या भावानें आपण आज रात्रीं तेथें हजर रहाणार असें मला लेखीं कळविलें आहे. मला वाटतें तुम्ही चुकीचें पाऊल टाकलें आहे.' लेकिन म्हणाली.

'आज सकाळीं मला टेलिफोनवरून नॉरबॅटनें जो संदेश पाठविला त्यावरून आम्हीं जें केलें तें योग्य ठरतें.' हेप्बर्न म्हणाला.

'नॉरबॅटनें तुम्हांला किंवा मला कां भेटू नये तें मला समजत नाहीं.' ती म्हणाली, 'एखादें महत्त्वाचें भाषण करावयाचें असलें तर त्यापूर्वीं दर्डी मारण्याची माझ्या बंधूंची फार जुनी खोड आहे. सर डेनीस, मला भीति वाटूं लागली आहे.

त्याच वेळीं हॉलजवळ लोकांनीं प्रचंड जयघोष केला, त्याचा अस्पष्ट आवाज ऐकूं आला, काय घडलें हें पहाण्यासाठीं हेप्बर्न धांवतच बाहेर गेला.

'मिस् लेकिन् माझा अंदाज चुकीचा ठरो वा न ठरो, पण डॉ. प्रेसकॉट आज रात्रीं येथें येतील अशी माझी खात्री आहे.' नेलॅंड म्हणाला.

हेप्बर्न परत आला आणि म्हणाला, 'आतां न्यूयॉर्कचे नगराध्यक्ष सभेला आले आणि त्यांचा लोकांनीं जयजयकार केला, आतां बडी मंडळी येऊं लागली आहेत. पण अद्याप सभेला बराच वेळ आहे.'

'तर मग सध्यांतरी आपण वाट पहाण्यापलिकडे दुसरें कांहींच करूं शकत नाहीं.' नेलॅंड म्हणाला.

× × × ×

डॉ. प्रेसकॉटनें नेहमीप्रमाणें काळजीपूर्वक पेहेराव केला, त्यांच्या सेक्रेटरीनें त्यांची कपड्यांची बॅग आणली होती. कपडे केल्यानंतर त्यांनीं आरशांत आपलें स्वरूप न्याहाळिलें, आणि घंटी वाजविली. त्याबरोबर नॉरबॅट आंत आला.

'डॉक्टर, वीस मिनिटांत आपली मोटार येईल.' तो म्हणाला, 'मी मुद्दाम त्या मोटारीच्या खिडक्यांना पडदे लावण्याची सोय केली आहे. उत्साहातिरेकानें लोक रस्त्यांत गडबड करतील आणि त्यामुळें तुम्हांला त्रास होईल. मी पुढें जातों आणि तुमची प्रवेशद्वाराजवळ वाट पहातों.'

नॉरबॅट निघून गेल्यानंतर प्रेसकॉटनें नर्सचे आभार मानले आणि ते म्हणाले. 'पुन्हां आपली भेट होइल अशी मला आशा आहे'

'नाहीं, मला तशी आशा वाटत नाहीं.' ती म्हणाली, 'सध्यांतरी मी सामाजिक क्षेत्राचा त्याग केला आहे, कदाचित् एखाद्या दिवशीं मी त्या

गोष्टीचा उलगडा करीन, पण आतां मला डॉक्टरांच्या हुकूमाप्रमाणें माझें शेवटचें कर्तव्य बजाविलें पाहिजे.'

ती तेथल्या कांचेच्या कपाटाकडे गेली आणि एक लहानशी बाटली बाहेर काढली, त्यांतल्या रंगविहीन औषधाचे नेमकेच थेंब तिनें एका छोट्या ग्लासमधें सोडले, व त्यांत पाणी घालून तें ग्लास डॉ. प्रेसकॉटच्या हातीं दिलें, 'हा औषधाचा शेवटचा डोस,' ती म्हणाली, 'आतां तुम्हांला हॉस्पिटल सोडण्याची परवानगी आहे.'

तिचें तें हास्य इतकें आकर्षक होतें कीं तिला जवळ ओढण्याचा मोह त्यांना आवरतां आला नाहीं. त्यांनीं तें पेय घेतलें, कांहींशा उन्मादक अवस्थेंत त्यांनीं तिचें चुंबन घेतलें आणि ते तेथून बाहेर पडले. ती सुंदर नर्स त्यांच्याकडे सभय नजरेनें पहात होती. प्रेसकॉट बंद मोटारींत बसले आणि तेथून निघाले.

× × × ×

डॉ. फू-मांच्यू आपल्या खोलींत टेबलाजवळ बसला होता, त्यानें आपले डोळे बंद केले होते आणि सॅम्प पॅक त्याला माहिती देत होता.

'प्रेसकॉट आतां कॉर्नेगि हॉलकडे निघाला आहे. त्या बाईनें आपलें काम केलें पण तें चांगलें केलें नाहीं, तिनें त्याला औषधाचे तीन ऐवजीं चार थेंब दिले असावेत अशी मला भीति वाटते.'

'ती तुटलेली फांदी आहे. फार चांगल्या माणसानें तिची शिफारस केली होती. पण तिचा स्वभाव चंचल आहे.' फू-मांच्यू म्हणाला 'पुरुषांना जर ती आपलीं खेळणीं समजत असली तर तिनें खुशाल खेळ खेळावा, पण जर तिनें माझा विश्वासघात केला तर तिला मृत्यूचें चुंबन घ्यावें लागेल, यासाठीं तिला मी हार्वेपासून दूर करून तेथें तिच्याऐवजीं त्या अडेरची नेमणूक केली. त्या थेंबाबद्दल तुझी खात्री नाहीं ?'

'मी तिच्यावर नजर ठेवली होती त्यावेळीं तिचा हात थरथरत होता.' सॅम्प पॅक म्हणाला.

'जर तिनें माझें काम बिघडविलें असलें तर तिला त्याबद्दल प्रायश्चित्त भोगावें लागेल.' फू-मांच्यू कठोर स्वरांत म्हणाला, 'आतां त्या अॅबॉटबद्दलची ताजी माहिती काय?'

'नंबर पंचवीस कॉर्नेगी हॉलमधें आहे. फादर अॅबॉट अद्याप तेथें आला नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे.'

'तर मग दोहोंतील एक गोष्ट असावी. तो वेषांतर करून हॉलमधें बसला असावा किंवा आपल्या शत्रूंच्या हातीं सांपडला असावा. आपल्या देवानेंहि मला सोडलें कीं काय अशी शंका वाटूं लागली आहे. मी माझ्या शक्तीचा दिमाख मिरवीत होतों, जगाच्या पाठीवर हजारों लोक माझ्या आज्ञा तत्परतेनें पाळतात असें मानीत होतों, पण पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें माझा अभिमान कोसळून पडणार अशी मला भीति वाटूं लागली आहे. देवा, माझा शेवट अपयशानें व्हावा अशी तुझी योजना आहे काय?'

'मालक, निराशावादाला आपल्या धर्मांत स्थान नाहीं.' सॅम्प् पॅक् म्हणाला.

डॉ. फू–मांच्यू म्हणाला, 'मित्रा, तूं जर माझ्या बरोबर नसतास तर मला माझ्या आयुष्यांतील ही शेवटची लढाई एकटयानेंच खेळावी लागली असती. चल, आपण आतां आपल्या महान् प्रयोगाला सुरवात करूं. तो फसला तर आपणांला पुन्हां पहिल्यापासून सुरवात करावी लागेल.'

'शहाणा माणूस अपयशाच्याच पायावर उंच मनोरा रचूं शकतो!' सॅम्प् पॅक् म्हणाला.

ते दोघे हर्मनला ठेवण्यांत आलें होतें त्या खोलींत गेले. फू-मांच्यूनें एका लहानश्या सिरींजनें त्याला इंजेक्शन दिलें आणि दोन मिनिटें थांबून त्याच्या सर्व शरीरावर कोणत्यातरी औषधाचा फवारा उडविला आणि दहा सेकंदांच्या आंत हर्मन उठून उभा राहिला.

'खुणेचा शब्द आशिया आहे हें लक्षांत ठेव, तो शब्द ऐकेपर्यंत काय करावयाचें तें विसरून जा.'

'मालक, मी तें विसरलों.'

'आतां झोप आणि विसर, पण आशिया शब्द लक्षांत ठेव.

हर्मन एकदांच ओशया असं म्हणाला आणि नंतर झोपला तावडताव त्याला गाढ झोंप लागली होती.

फू-मांच्यू सॅम्प् पॅक्कडे वळून म्हणाला, ' माझ्या मित्रा, बाकीचें सर्व तुझ्यावर अवलंबून आहे. '

\+ \+ \+

त्या ऐतिहासिक महत्त्वाच्या सभेला जाण्याची हार्वेनें तयारी केली होती. तो उठून म्हणाला, ' ऐक बेबी, मी आतां माझ्या मनाप्रमाणें वागणार आहें. माझ्याजवळ पैसे आहेत आणि मला कुणी बनवूं शकणार नाहीं. हा स्वतःला प्रेसिडेंट म्हणविणारा अदृष्य माणूस कोण हें मी शोधून काढणार आहें. '

' तो तुमचा मूर्खपणा ठरेल. ' मोया म्हणाली, ' ज्या माणसानें तुमच्यावर संपूर्ण विश्वास ठेवला, जो तुम्हांला कोटचवधि डॉलर्सची मदत करण्यास तयार आहे त्याच्याशीं भांडणें मूर्खपणाचें आहे. त्याचा हेतु तुम्हांला अमेरिकेचा प्रेसिडेंट बनविण्याचा आहे आणि त्यानें तुमची सेक्रेटरी म्हणून माझी नेमणूक केली आहे. तुम्हांला त्याच्याशीं भांडण्याचें कांहीं कारण आहे असें मला तरी वाटत नाहीं. '

' पण खेळांतील प्याद्यप्रमाणें कुणीतरी मला हलवावें हें माझ्या स्वभावाला पटत नाहीं. आणखी एक गोष्ट आहे, हर्मनचें काय झालें? त्याच्याशिवाय मी कुठेंहि जात नाहीं. '

हार्वेनें आपलें बोलणें थांबवून मोयाचा खांदा पकडला आणि तिला आपल्याजवळ खेचलें. ' सुंदरी, तूं दिसतेस त्यापेक्षांहि शहाणी असावीस, माझें स्थान कुठें आहे तें मला माहित आहे. आतां कोणताहि नांवाचा प्रेसिडेंट माझ्या मार्गांत आडवा येऊं शकत नाहीं. तूं त्याला विसर आणि माझ्याकडे पहा, मी तुला कांही खास गोष्ट सांगणार आहें- '

त्याच वेळीं दार ठोठावण्याचा आवाज झाला. हार्वेनें कपाळावर आठ्या चढवूनच तिचा खांदा सोडला. दार उघडून त्याचा सेक्रेटरी आंत आला होता

' कानगि हॉलमध्ये आण्याची वेळ झाली. ' तो म्हणाला.

‘ पण हर्मन कुठें आहे ? ’ हार्वेनें विचारलें.

‘ तो बाहेर उभा आहे. आतांच तो येथें आला आहे, तो दारू प्याला असावा असें दिसतें. ’

‘ अशा वेळीं तो दारू पिऊन आला आहे ? ’ हार्वे म्हणाला, ‘ त्याला आंत पाठव. ’

दार उघडून हर्मनच आंत आला. त्याचे डोळे बावरल्यासारखे दिसत होतें. तो घोगऱ्या आवाजांत म्हणाला, ‘ हार्वे, मी दारू प्यालों नाहीं, इतरपांत बोलूं नकोस, मला फक्त तो शब्द सांग. ’

‘तूं दारू प्याला आहेस. जा बाहेर जाऊन मोटारींत बैस. मला आधींच उशीर झाला आहे. ’ हार्वे म्हणाला,

‘ मला हें तुमचें बोलणें आवडत नाहीं. ’

‘ तुला काय आवडतें याची मला पर्वा नाहीं. ’ हार्वे रागानें म्हणाला, ‘ तूं जा आणि मोटारींत बैस. ’

दोन मिनिटांनीं तीन मोटारी तेथून निघाल्या. पहिल्या मोटारींत चार हत्यारबंद माणसें होतीं, दुसऱ्या मोटारींत हार्वे आणि त्याचा सेक्रेटरी बसला होता, पाठीमागल्या मोटारींत आणखी तीन संरक्षक आणि हर्मन होता, हार्वेनें आपल्या संरक्षणाचा योग्य बंदोबस्त केला होता.

× × × ×

सभेच्या वेळीं नेलँड स्मिथ कॉर्नेगि हॉलच्या प्रवेशद्वाराजवळ उभा होता. आणि त्याच्या बरोबर मिस् लेकिन् होती. त्यांनीं प्रेसकॉटचा सेक्रेटरी नॉरबर्ट याला तेथें पाहिलें. तो आपल्या भावाजवळ एका वर्षाहून अधिक काळ आहे असें लेकिननें त्याला सांगितलें.

नेलँड बाजूच्या दारानें त्याच्यासाठीं राखून ठेवलेल्या मोठ्या खोलींत गेला आणि त्याच वेळीं हेप्बर्न फादर ॲबॉटला घेऊन तेथें आला.

‘ आमच्या एका मोटारीनें वीस मिनिटांपूर्वीं यांना पाहिलें आणि येथें आणलें. ’ हेप्बर्न म्हणाला, ‘ पण ते इकडेच यावयास निघाले होते. ’

‘ तें अगदीं खरें आहे. ’ फादर म्हणाला, ‘ मि. स्मिथ, जर तुम्ही त्याला अटक करण्याचा प्रयत्न कराल तर मला त्याविरुद्ध तुमच्याशीं झगडावें

लागेल. मी कोणताहि गुन्हा केलेला नाहीं. जर माझे मित्र डॉ. प्रेसकॉट येथ हजर राहूं शकले नाहींत तर मी हावला सामना देणार आहे.

त्याच वेळी बाहेर जमावानें आरोळचा ठोकण्यास सुरवात केली. काय घडलें हें पहाण्यासाठीं हेप्बर्न धांवतच बाहेर गेला आणि कांहीं क्षणांतच तो दुप्पट वेगानें धांवत आला. तो ओरडूनच म्हणाला, ' डॉ.प्रेसकॉट व्यासपीठा-वर उभे आहेत आणि हार्वे दाराशीं पोहोंचला आहे. '

हार्वे आणि प्रेसकॉट या दोघांची जाहीर चर्चा सुरू झाली होती आणि नेहमी उत्स्फूर्त बोलणारा हार्वे या खेपेला हातांतील टांचणांवरून वेळोवेळां नजर फिरवीत होता. प्रेसकॉटचा त्या वादविवादांत सपशेल पराभव होणार हें सर्व श्रोत्यांच्या लक्षांत आलें होतें. जमावाला दिसणार नाहीं अशाप्रकारें एका बाजूला उभ्या असलेल्या फादर ॲबॉटना त्यामुळें अतिशय दुःख होत होतें. पण ते आपल्या मित्राच्या सहाय्यास जाण्यास असमर्थ होते.

× × ×

डॉ. फू–मांच्यू आपल्या खोलींत त्या लांब टेबलाजवळ बसला होता आणि रेडिओवरून ती चर्चा ऐकत होता. सर्व अमेरिका ती चर्चा ऐकत होती.

डॉ. फू–मांच्यूनें रेडिओ बंद केला आणि समाधानानेंच अफूची गोळी तोंडांत घातली.

इकडे हार्वे बोलत होता, ' मित्रहो, स्वतंत्र अमेरिकेच्या प्रगतीच्या मार्गातील एक मोठा अडथळा दूर झाला आहे. आतां आपण आपल्या सुराज्याच्या कल्पनेजवळ सरकलों आहोंत, आतां ती कल्पना साकार होण्याच्या मार्गा-वर आहे. '

' तसलें सुराज्य जगाच्या पाठीवरील कोणत्याहि देशानें पाहिलें नसेल. हावचा सेक्रेटरी सालव्हेटी मोठ्यानें म्हणाला, ' अमेरिका, आफ्रिका, युरोप किंवा आशिया–'

त्याच्या तोंडून आशिया शब्द निघतांच हार्मन एकदम चवताळून पुढे झाला, त्यानें आपलें पिस्तूल काढलें आणि लागोपाठ दोन गोळ्या हार्वेच्या हृदयावर झाडल्या.

त्या प्रचंड कॉनॅगि हॉलमध्यें क्षणभर भयानक शांतता पसरली. नंतर हार्वेच्या इतर शरीरसंरक्षकांनीं लागोपाठ गोळ्या झाडून हर्मनच्या शरीराची चाळण उडविली. हार्वेच्या शरीरांतून प्राण जाण्यापूर्वी हर्मन ठार झाला होता.

'अरे देवा ! हर्मन !' हार्वे म्हणाला आणि नंतर त्यानें प्राण सोडला.

९

रॉबी

'हेप्बर्न, या प्रकाराचा मला अर्थच समजत नाहीं.' आपल्या खोलींत फेऱ्या घालीत नेलॅंड म्हणाला. 'डॉ. प्रेसकॉट यांची स्मरणशक्तिच नाहींशी झाली होती. फू-मांच्यूनें त्यांच्यावर कांहींतरी प्रयोग केला असावा.'

'पूर्वी माझा या गोष्टीवर विश्वास बसत नसता, पण तो जादूगार आहे हें आतां मला पटलें आहे.' हेप्बर्न म्हणाला, 'ज्याचें शास्त्रीय ज्ञान आपणांपेक्षां एका शतकानें पुढें आहे अशा माणसाबरोबर आपणांला लढावयाचें आहे.'

'मी आतां प्रेसकॉटबद्दल विचार करीत नाहीं. त्यांना राजकारणाच्या क्षेत्रांत स्थान उरलें नाहीं, पण त्यांचा सेक्रेटरी नॉरबर्ट आपल्या हातांतून निसटला त्यामुळें माझी निराशा झाली आहे.' नेलॅंड म्हणाला.

'पण आपण त्याला पकडूंच.' हेप्बर्न म्हणाला, 'त्याला तेथून बाहेर काढण्याची योजना मोठ्या धूर्ततेनें आणि पूर्वीच आंखण्यांत आली होती. डॉ. फू-मांच्यू या देशांत स्वतः येण्यापूर्वी त्यानें आपल्या हस्तकाकरवीं जाळें पसरविलें असणार.'

'तें मला माहित आहे. पण हार्वेच्या मृत्यूनें त्याचें काय साधणार आहे ? हर्मन हा दारूडा होता आणि तो हार्वेचा सावत्र भाऊ होता, तो खुनी होता, पण त्याचें हार्वेवर अतिशय प्रेम होतें.'

'मलाहि तें समजत नाहीं.' हेप्बर्न म्हणाला, 'पण सॉल्व्हेटीनें मधेंच वक्तव्य कां करावें? हार्वे बोलत असतांना हार्मननें मुळींच हालचाल केली नव्हती, तो एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें उभा होता. सॉल्व्हेटी कित्येक वर्षांपासून हार्वेजवळ होता. दुसरी एक गोष्ट आहे. मिसेस् अडेरसारखी स्त्री फू–मांच्यूच्या गोटांत कशी गेली?'

'मी तिला तुझ्यावरच सोंपविली आहे.' नेलँड म्हणाला, 'तूं तिच्याबद्दल माहिती मिळविण्याचा प्रयत्न कर. मी आतां माझें सारें लक्ष फू-मांच्यूचा तळ शोधण्याकडे देणार आहें. आणि मला वाटतें, त्याच्या तळाकडे जाणारा नदीकांठचा मार्ग मी शोधून काढला आहे. चिनी सेनापती ली–ऊ–चँग आज सकाळींच या शहरांत आला आहे ही गोष्ट मला सूचक वाटते. तो सातांपैकीं एक आहे असा मला नेहमीच संशय वाटतो.'

'ते सात कोण?' हेप्बर्ननें विचारलें.

'आतां त्याबद्दल बोलावयास वेळ नाहीं.' नेलँड म्हणाला, 'आज रात्रीं हालचाल करण्यापूर्वीं बऱ्याच गोष्टी करावयाच्या आहेत. माझी तुझी प्रत्यक्ष भेट झाली नाहीं तरी माझ्या सूचना तुला टेबलावर मिळतील आणि मी फे शी सतत संबंध ठेवण्याचा प्रयत्न करीन.'

× × ×

ठरल्याप्रमाणें त्या तळ्याजवळ हेप्बर्न उभा होता. लवकरच त्यानें मोयाला येतांना पाहिलें आणि त्याबरोबर त्याचें हृदय उडया मारूं लागलें. ती तरुणी आपल्या स्वातंत्र्यासाठीं झगडत होती आणि त्यासाठींच ती त्याला भेटणार होती.

तो तिला भेटावयास पुढें सरकला तेव्हां ती हंसली, कित्येक वर्षांचा आपला प्रेमसंबंध आहे, तिला जवळ घेऊन तिचें चुंबन घ्यावें असें त्याला वाटत होतें. तिच्यासह तो पोवळ्या बाकावर बसला.

'हार्वेंच्या मृत्यूमुळें तुझ्या कार्यक्रमांत बदल झाला असणार?' त्यानें विचारलें.

'नाहीं, हार्वेची नागरिक संघटना चालूं रहाणार आहे. आतां सालव्हेटी त्या संघटनेचा प्रमुख बनला आहे.'

'हार्वेच्या मृत्यूबद्दल तुला वाईट वाटण्याचें कांहीं कारण आहे काय ?' हेप्बर्ननें विचारलें.

त्याला आकस्मिक मृत्यूनें गांठण्याइतका तो वाईट नव्हता. पण तो जर जगला असता तर त्यानें माझें आयुष्य दुःखमय बनविलें असतें, मी त्याला साडून जाऊं शकले नसतें.'

'पण कां ?'

'तुम्हांला तें समजणार नाहीं, हार्वेलाहि तें समजत नव्हतें, तरी तो एका मोठ्या यंत्रांतील लहानसा दिवा होता आणि मीहि त्याच यंत्राचा दुसरा भाग आहे. त्या नागरिक संघटनेचा आणि इतरहि प्रत्येक संघटनांचा तो केवळ नामधारी प्रमुख होता, यापेक्षां मी तुम्हांला कांहीं अधिक माहिती देऊं शकणार नाहीं.'

'हार्वेचा मृत्यु तुम्हीं म्हणतां त्या चक्राच्या गतीशीं जुळणारा होता काय ?'

'तें मला सांगतां येणार नाहीं, आणि मी त्यासाठीं तुम्हांला भेटावयास आले नाहीं.' मोया म्हणाली, 'तुम्हीं आपणांसाठीं एक टॅक्सी पहा, पण ती लोटस कंपनीची नाहीं अशी खात्री करा.'

तिच्या बरोबर टॅक्सींत बसल्यानंतर लोटस कंपनीचा हार्वे हा डायरेक्टर होता हें हेप्बर्नच्या लक्षांत आलें आणि त्यावरून त्या कारस्थानाचें जाळें किती दूरवर पसरलें होतें याची तो कल्पना करूं शकला. लोटस कंपनीच्या गाड्या सर्व अमेरिकेभर धांवत होत्या. हेप्बर्न तिच्यासह तिचा मुलगा रॉबी याला भेटावयास गेला.

रॉबी चार वर्षांचा होता. हेप्बर्नची आणि त्याची ओळख करून देण्यांत आली तेव्हां तो म्हणाला, 'मला फक्त तुमची दाढी आवडत नाहीं, बाकी तुम्ही चांगले आहांत. ज्याचे केस आणि दाढी वाऱ्यानें उडत असते असा एक माणूस मला माहित आहे. तो सारखा हातवारे करीत असतो, हाताच्या मुठी आंवळीत असतो, खात्रीनें तो वेडा असला पाहिजे.'

'रॉबी, आम्हांला हें तुझें बोलणें समजलें नाहीं.' ती म्हणाली.

'एक वेडा माणूस त्या पलिकडच्या इमारतींच्या अगदीं वरच्या मजल्यावर रहातो.' खिडकीतून बोटानें दाखवीत रॉबी म्हणाला.

हेप्बर्ननें त्या दिशेकडे पाहिलें. न्यूयॉर्क शहरांतील अत्युच्च इमारतींपैकीं ती एक होती आणि नेमकी तीच इमारत ते रहात होते त्या इमारतीच्या चाळीसाव्या मजल्यावरील खिडकींतून त्यांना दिसत होती.

'तो रात्रीच्या वेळीं बाहेर येतो,' रॉबी बोलला होता. 'कधीं कधीं मी झोपतो आणि तो मला दिसत नाहीं.'

'बाळ, तुझें बोलणें आम्हांला समजत नाहीं.' मोया त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाली, 'तू आतां बाहेर जाऊन खेळ.'

'काका, मला भेटल्याशिवाय जाऊं नका.' रॉबी म्हणाला, आणि तो धांवतच बाहेर गेला.

रॉबी निघून गेल्यानंतर दीर्घ निश्वास सोडीत मोया म्हणाली, 'केवळ या मुलाकरितां मी जगते. नाहींतर मी येथें आलेंहि नसते.'

'पण तरीहि तू त्या प्रेसिडेंटचें काम कां करोस तें मला समजत नाहीं.'

'तो खुलासा करणें अगदीं सोपें आहे. जरी तुम्हांला दिसत नसलें तरी या इमारतीच्या दोन्ही दारांवर रात्रंदिवस पहारा असतो. रॉबीला इमारतीच्या बाहेर सहसा जाऊं देण्यांत येत नाहीं.'

'तरीहि मला तें समजत नाहीं.' तो म्हणाला,

'ही जागा प्रेसिडेंटची आहे.' ती म्हणाली, 'पण तो क्वचितच येथें येत असतो, रॉबीची दाई ही माझ्याकडे त्याच्या जन्मापासून काम करीत आहे. दोन महिने माझा रॉबी अचानक नाहींसा झाला होता.'

'म्हणजे, त्याला पळविण्यांत आलें होतें असेंच ना?'

'होय, त्याला पळविण्यांत आलें होतें. मी धास्तीनें मृत्यूच्या पंथाला लागलें होते आणि त्यावेळीं मला प्रेसिडेंटचें बोलावणें आलें. त्यानें मला अशी अट घातली की ती कोणत्याहि आईनें मान्य केली असती. मी माझ्यावर सोंपविण्यांत आलेलें काम चोख बजावीत असलें कीं, मला येथें येण्याची इतकेंच नव्हे तर माझ्या मित्रांनाहि येथें आणण्याची मला परवानगी आहे. पण जर मी त्याच्या इच्छेप्रमाणें वागलें नाहीं तर मला रॉबी पुन्हां कधींहि दिसणार नाहीं असें मला सांगण्यांत आलें आहे.'

'पण या देशांत कायदा आहे.' हेप्बर्न रागानें म्हणाला.

'तुम्हीं प्रेसिडेंटला ओळखत नाहीं. जर त्यानें माझ्या मुलाला पळविण्याचें ठरविलें तर कोणताहि कायदा त्याला अडवूं शकणार नाहीं. तुम्हीं मला वचन दिलें आहे याची आठवण ठेवा. तुम्हीं माझ्या संमतीशिवाय रॉबीच्या बाबतींत कोणतीच हालचाल करूं नका.'

'ठीक, पण मी तुला भलत्याच संकटात लोटलें आहे.' चिंतायुक्त स्वरांत तो म्हणाला, 'मी येथें आलों हें प्रेसिडेंटला समजणार.'

'खात्रीनें समजेल, पण रॉबीला आपल्या जुन्या मित्रांना भेटण्याची परवानगी आहे आणि तुम्हीं आमचा इतका जुना इतिहास गोळा केला आहे की तुम्हांला आमचे मित्र म्हणावयास हरकत नाहीं.'

'तूं मला मित्र म्हणावेंस अशी माझी इच्छा आहे.'

'हेप्बर्न तेथून बाहेर पडला तेव्हां आपल्या हालचालीवर पाळत जेनण्यांत आली आहे हें त्याला पटलें. मोयाचा मुलगा त्या इमारतींत कैदेंतच होता.

त्या घराच्या पायऱ्या उतरतांनाच त्यानें त्या दोघांना पाहिलें होतें. आपण कोण आहोंत हें शत्रूला न समजण्यावरच मोयाचें भवितव्य आणि कदाचित रॉबीचे प्राण अवलंबून आहेत हें त्याला समजत होतें. कांहीं झालें तरी तो पोलीस अधिकारी आहे हें त्या दोघां बदमाशांना समजतां कामा नये. डॉ. फू–मांच्यू किती भयंकर होता याची त्याला चांगली कल्पना होती.

हेप्बर्न अतिशय हुशार होता आणि त्यांत तो सावध असल्यामुळें त्यानें त्या दोघां पाठलाग करणाऱ्यांना सहजीं चकविलें. नंतर तो ठराविक ठिकाणीं त्याच्यासाठीं उभ्या असलेल्या बंद लॉरीजवळ पोहोंचला आणि त्यानें तेथें तयार असलेला वेटरचा पेहेराव चढविला आणि तेथें ठेवलेली एक फळाची टोपली उचलून तो रिगल हॉटेलांत पाठीमागल्या दारानें शिरला.

ब्लॉन्डीसारख्या प्रख्यात दादाच्या आणि कार्लोसारख्या कुविख्यात बदमाशाच्या मृत्यूच्या बातमीनें न्यूयॉर्क शहरांत खळबळ माजली होती. त्यांत हार्वेच्या खुनानें अधिकच भर पडली होती. त्या माणसाला मृत्यूनें 'न भूतो न भविष्यति' असें महत्त्व प्राप्त करून दिलें होतें.

हेप्‌बर्न नेलँडच्या खोलींत जातांच त्याला तेथल्या टेबलावर लेखी सूचना मिळाल्या. सर्व चिनी मोहल्यावर नजर ठेवावी आणि विशेषत: तेथें असलेल्या वू–त्रँगच्या हॉटेलाला वेढा द्यावा अशा सूचना देण्यांत आल्या.

पाठीमागल्या नदी मार्गानें खुद्द नेलँडनें त्या जागेवर चढाई केली होती. त्याच्याबरोबर चाळीस पोलीस आणि कित्येक अधिकारी होते. फू–मांच्यूच्या मंत्री मंडळाचे बहुतेक सभासद न्यूयॉर्क शहरामधें आले असावेत असा नेलँडचा अंदाज होता. त्यांतील एक नदींतून मोटारबोटीनें त्या ठिकाणीं गेला अशी त्याला माहिती मिळाली होती.

त्या ठिकाणीं पोहोंचल्यानंतर नेलँडनें अधिकाऱ्याला सूचना दिली. आपणाला हव्या असलेल्या माणसानें सात वेळां घंटीचें बटन दाबलें अशी आपणाला खात्रीलायक बातमी मिळाली आहे. तुम्हीं तें घंटीचें बटन शोधून काढा.

पण तें बटन नेलँडनेंच शोधून काढलें. आंत अंधारा बोळ होता. त्या बोळांतून बऱ्याच अंतरावर गेल्यानंतर त्यांना प्रथमच अंधुक प्रकाश दिसला. नेलँड अतिशय चपलतेनें पुढें गेला आणि अधिकारयुक्त स्वरांत म्हणाला, ' तुम्हीं तुमचे हात वर करा !'

तेथें दोन माणसें होतीं. एक चिनी होता आणि दुसरा ज्यांचा त्यानें शोध चालविला होता तो इजिप्शीअन होता. नेलँडनें चिनी माणसाला तेथून हलविण्याची सूचना दिली आणि तो त्या दुसऱ्याकडे वळला.

'तुझें नांव काय ?' त्यानें विचारलें.

'हा प्रश्न विचारण्याचा तुम्हांला अधिकार काय ?' त्या माणसानें उलट विचारलें.

'मी सरकारी अधिकारी आहें. तुझें नांव काय ?'

'माझें नांव अहंमद फायुम.'

'तूं न्यूयॉर्कमधें कधीं आलास ?'

'गेल्या रात्रीं आलों, मी येथून वॉशिंग्टनला जाणार आहें. मी इजीप्तच्या राजाच्या वतीनें कांहीं कामाकरितां या देशांत आलों आहें.'

'तर मग तुम्हीं येथें काय करीत आहां ?' नेलँडनें विचारलें.

'सहज जीवाची मौज करण्यासाठीं आलों होतों. या ठिकाणीं पोलीस धाड घालतील अशी मला कल्पना नव्हती.'

'आम्हांला या तुमच्या हकीकतीची चौकशी करावी लागेल.' नेलँड म्हणाला, आणि तोंपर्यंत तुम्हांला आमच्या अटकेंत रहावें लागेल.'

'तुम्ही कोण आहांत तें मला माहित नाहीं.' तो माणूस बेदरकारीनें म्हणाला, 'पण या तुमच्या अविचाराचा चांगला परिणाम होणार नाहीं.'

नेलँडनें त्याच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं आणि पोलिसांना त्या माणसाला तेथून हलविण्यास सांगितलें. तो इजिप्शिअन फू-मांच्यूच्या सप्तमंडळाचा सभासद आहे अशी त्याची खात्री होती. अर्थातच त्याच्याजवळ पुरावा नव्हता.

नेलँडनें त्या जागेची तपासणी करण्यास सुरवात केली, त्या ठिकाणचीं भुयारें, तळघरें आणि इतर गुप्त मार्ग पाहून तो थक्क झाला, पण त्याला तेथें कुणीच सांपडलें नव्हतें. त्या सात डोळ्यांच्या देवीचें देऊळहि रिकामें होतें.

इकडे हेप्बर्ननेंहि त्याच्यावर सोंपविण्यांत आलेली कामगिरी पार पाडली होती. फक्त एक चिनी त्याच्या हातांतून निसटला होता आणि तो फू-मांच्यू असावा असा त्याचा तर्क होता.

१०

मंत्रविद्येचा प्रयोग

त्या उंच बुरुजांतील आपल्या खोलींत बसून, फू-मांच्यू सूचना देत होता. 'माझ्या मित्रा, आतां फक्त वेळेचाच प्रश्न आहे. तीन नंबरचा तळ आपण खालीं केला पाहिजे. आपल्या इजिप्तच्या प्रतिनिधीला अटक करण्यांत आली हें वाईट झालें. पण त्याला सोडविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. वू-चँग तोंड उघडणार नाहीं अशी खात्री आहे. आणि त्यामुळें आपले

इतर प्रतिनिधी सुरक्षित आहेत. तीन नंबरच्या तळाचा यापुढें उपयोग करावयाचा आहे. इतर सूचना मी नंतर देईन.'

फू–मांच्यूनें सॅम्प्पॅक्बरोबरचें बोलणें थांबवून दुसरें बटन दाबलें आणि तो म्हणाला, 'मला सर्व रिपोर्ट दे.'

तो अजब स्मरणशक्तीचा वृद्ध शिल्पकार म्हणाला, 'अकरा वाजून पांच मिनिटांनी वू–चँगच्या हॉटेलावर पोलिसांनीं छापा घातला. एकंदर चाळीस माणसांना अटक झाली. छापा घालण्याचें कॅ. हेप्बर्ननें केलें. फक्त इजिप्शिअन प्रतिनिधीखेरीज बाकीचीं सर्व माणसें निरनिराळ्या ठिकाणीं सुरक्षित आहेत.'

फू–मांच्यूनें यंत्र बंद करून आपली चांदीची पेटी उघडली आणि अफूचा पाईप बाहेर काढला.

× × ×

हेप्बर्न आणि नेलँड बोलत बसले होते. हेप्बर्ननें आतां आपली दाढी काढून टाकली होती. नेलँड बोलतच होता.

'आपणांला बहुतेक कैद्यांना सोडावें लागेल, कारण त्यांच्याविरुद्ध आमच्याजवळ कांहींच पुरावा नाहीं. चिनी मोहल्ल्यांत फू–मांच्यूचा तळ आहे हा माझा तर्क खरा ठरला, पण छापा घालून कांहीं फायदा झाला नाहीं. हेप्बर्न, या देशांत जें कांहीं घडत आहे त्याला जर आपण प्रतिबंध केला नाहीं तर सर्व जगाचा नकाशाच बदलणार आहे. एका रात्रींत सॉल्व्हेटीला किती महत्त्व आलें आहे हें तुझ्या लक्षात आलें आहे काय ?'

'होय, पण तुम्हीं मधेंच त्याचा उल्लेख कां करावा ?'

'लोला ड्युमास आतां सॉल्व्हेटीबरोबर असते आणि तिच्याबद्दल नेहमी वर्तमानपत्रांत उल्लेख येत असतो.'

'पण त्यांत आश्चर्य तें काय ?' हेप्बर्ननें विचारलें. 'तिचा त्या संघटनेशीं जुना संबंध आहे.'

'ती संघटना डॉ. फू–मांच्यूची आहे आणि आतां फू–मांच्यू सॉल्व्हेटीला पाठिंबा देत आहे. मला तर असें वाटतें कीं सॉल्व्हेटींसाठीं ती जागा मुद्दाम तयार करण्यांत आली असावी. फादर ॲबॉट सुरक्षित आहेत याबद्दल

मी ईश्वराचे आभार मानतों. अद्याप ते या देशाला ऐनवेळीं बहुमोल मदत करूं शकतील. वर्तमानपत्रें हार्वेच्या खालोखाल सॉलव्हेटीला मान देत आहेत. '

हेप्बर्नला अचानक आठवण झाली आणि तो म्हणाला, ' तुम्हांला खिडकींतून ती उंच इमारत दिसते ना ? त्या इमारतीच्या अगदीं वरच्या घुमटींत एक चमत्कारिक माणूस रहातो असें रॉबी म्हणाला होता. गेल्या रात्रीं त्या संबंधीं चौकशी करावयास सांगितलें होतें. त्याचा रिपोर्ट मला आतांच मिळाला आहे. '

' त्या रिपोर्टींत काय आहे ? '

' त्या इमारतींत हार्वेच्या निरनिराळ्या संस्थांचीं आणि कंपन्यांचीं ऑफिसें आहेत. त्याच इमारतींत त्याच्या नागरिक संघटनेचें मुख्य केंद्र आहे. लोटस टॅक्सी कंपनीची मुख्य कचेरी तेथें आहे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे, हार्वेच ती सर्व इमारत वापरीत होता. ' हेप्बर्न म्हणाला.

' ही तुझी माहिती महत्त्वाची आहे. ' नेलँड खिडकींतून त्या इमारतीकडे पहात म्हणाला, ' ती इमारत म्हणजे डॉ. फू मांच्यूच्या सर्व हालचालीचें मुख्य केंद्र दिसतें. तूं त्या मिसेस् अडेरसंबंधीं काय ठरविलें आहेस ? '

' मी कांहींच ठरविलें नाहीं. ' हेप्बर्न दुसरीकडे पहात म्हणाला, ' तिच्यासंबंधीं मला जें माहीत होतें तें सर्व मी तुम्हांला सांगितलें आहे. '

नेलँड विचार करीत म्हणाला, ' हेप्बर्न ती अडेर हा आपला हुकमी पत्ता ठरूं शकेल, पण तिचा कसा उपयोग करावयाचा तें मला समजत नाहीं. '

\+ + + +

' गुफी, तूं गेल्या रात्रीं माझ्या त्या चमत्कारिक माणसाला पाहिलेंस काय ? ' रॉबीनें आपल्या नर्सला विचारलें.

' मुला, तुझें तें स्वप्न असणार ? मी त्याला कधींच पाहिलें नाहीं. ' नर्स म्हणाली.

पण रॉबीचा तेवढ्यानें उत्साहभंग झाला नाहीं. त्याच्या मतें तो रहस्यमय वेडा मातीचीं मुंडकीं त्याच्या खिडकींतून खालीं फेकत होता. तो आज

ज...६

फार उशीरा उठला होता आणि जेव्हां तो खिडकीजवळ गेला तेव्हां त्याला तो वेडा एक मुंडकें खालीं फेंकतांना दिसला होता.

'गुफी, आज आई येईल काय ?'

'मला माहीत नाहीं. पण येईलसें वाटतें.'

'आणि मार्क काका येतील ?'

'मला तसें वाटत नाहीं.'

'कां नाहीं ?' रॉबीनें विचारलें, 'मला ते काका आवडतात. फक्त त्यांची ती दाढी आवडत नाहीं, मला पिवळे काकाहि आवडतात पण ते कधींच येत नाहींत.'

नर्सच्या अंगावर शहारे आले, तिला पिवळ्या काकाची अतिशय भीति वाटत होती. मिसेस अडेरचा तो संरक्षक असावा असें दिमत होतें, पण तिच्यासारख्या एका बाईनें एका भयंकर माणसाशीं मैत्री जोडावी याचा तिला अर्थच समजत नव्हता.

इकडे मार्क हेप्बर्न त्या उंच इमारतीच्या खालीं त्या मातींच्या मुंडक्याचे तुकडे गोळा करीत होता, रॉबीनें सांगितलें होतें तें खरें दिसत होतें. हेप्बर्नच्या डोळ्यांसमोर डॉ. फू-मांच्यू दिसूं लागला.

तपासणी करीत तो सत्तेसाळीसाव्या मजल्यावर पोहोंचला, त्याच्याबरोबर दोन माणसें होतीं, एक त्याचा मदतनीस होता आणि दुसरा इलेक्ट्रीक कंपनीचा माणूस होता. त्या सत्तेचाळीसाव्या मजल्यावर इमारतीच्या मालकाचा प्रतिनिधी त्याची वाट पहात होता. तेथल्या विजेच्या तारांची तपासणी करण्याचा बहाणा हेप्बर्न करीत होता.

'या मजल्यापर्यंत सर्व ठीक आहे, पण आम्हीं वरच्या घुमटींत कसें जावयाचें ?' त्यानें व्यवस्थापकाला विचारलें, 'तेथेंच कांहींतरी दोष असला पाहिजे.'

'तेथें जाण्याचा मार्गच नाहीं.' व्यवस्थापक म्हणाला, 'या मजल्यापर्यंतच लिफ्ट आहे, घुमटींत जाण्यासाठीं जिना आहे, पण फायर ब्रिगेडच्या सूचनेवरून जिन्याचें दार फळ्या ठोकून बंद करण्यांत आलें आहे वर पहाण्यासारखें कांहींच नाहीं. ती घुमटी म्हणजे केवळ शोभा आहे.'

'तर मग आम्हीं आमचें काम कसें करावयाचें ?' हेप्बर्न म्हणाला, त्याच्या अंगावर मेकॅनिकचा पेहराव होता, 'शिडया बांधायच्या म्हणजे खर्च होईल, त्यापेक्षां जिन्याच्या दारावरील फळया हलविणें सोपें नाहीं काय ?'

'तो अधिकार मला नाहीं.' घाईघाईनें व्यवस्थापक म्हणाला, 'मला त्यासाठीं डायरेक्टरांबरोबर चर्चा करावी लागेल.'

हेप्बर्ननें चिमटा घेतांच इलेक्ट्रीक कंपनीचा माणूस म्हणाला, 'तुम्हीं आम्हाला कधीं कळविणार ? आम्हांला रिपोर्ट तयार करावयाचा आहे.'

'मी उद्यां सकाळीं तुम्हांला बोलावणें पाठवीन.' व्यवस्थापक म्हणाला.

हेप्बर्नचें समाधान झालें होतें. रॉबीनें सांगितलें होतें, पण त्यालाहि त्या घुमटीच्या प्रकाशित खिडक्या दिसल्या होत्या, तेथें कुणीतरी रहात आहे याचा तो पुरावा होता.

× × × ×

लोला डयुमास पडद्याआड उभी राहून खालच्या जमावाकडे खिडकींतून पहात होती. जीवनानें रसरसलेली मानवता रस्त्यावर उभी होती. आणि सॉल्व्हेटीच्या नांवाचा जयघोष करीत होती.

'सॉल्व्हेटी ! ही नुसती सुरवात होती, तो अमेरिकेच्या अध्यक्षपदापर्यंत खात्रीनें आपली प्रगति करीत होता. जनता आतां हॉर्वेला विसरली होती. तिला तितकाच कणखर पुढारी लाभला होता. जनता मोठ्यानें सॉल्व्हेटीला हांका मारीत होती. पाठीमागें दार उघडल्याचा आवाज झाला आणि लोलानें मागें मान वळविली, सॉल्व्हेटीच आंत आला होता.

लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झालेल्या त्या माणसांत आतां विलक्षण बदल झाला होता. त्याच्या चर्येवरील फिकटपणा नाहींसा होऊन ती चर्या आतां तरतरीत आणि तेजस्वी दिसत होती. किंचित् पोक काढून चालण्याची त्याची जन्माची संवय एका रात्रींत नाहिंशी झाली होती. आतां तो हार्वेचा सेक्रेटरी नव्हता, अमेरिकेचा अव्वल दर्जाचा अत्यंत लोकप्रिय असा पुढारी होता.

'पॉल, हा तुझा विजय आहे !' लोला उत्सुकतेनें पुढें होऊन म्हणाली 'आतां तुला कुणीच अडवूं शकणार नाहीं.'

'तें खरें आहे.' तो हंसत म्हणाला.

बाहेर जमाव ओरडत होता, 'सॉल्व्हेटी ! सॉल्व्हेटी !'

तो हंसून म्हणाला, 'लोला, हा क्षण अपूर्व आहे !'

ती त्याच्यापुढें सरकली आणि त्यानें तिला आपल्या बाहुपाशांत पकडलें. सर्व जग त्याच्या पायाशीं लोळण घेत होतें. प्रसिद्धी, श्रीमंती, सौंदर्य! त्यानें तिला घट्ट पकडलें होतें. बाहेर त्याच्या दर्शनासाठीं उत्सुक बनलेला जमाव अधीरतेनें ओरडत होता.

'सॉलव्हेटी ! सॉलव्हेटी ! अमेरिका प्रत्येकाची, आणि प्रत्येक माणूस अमेरिकेचा !'

टेलिफोनची घंटी वाजली, सॉलव्हेटी ऐटीनें म्हणाला, 'लोला, कोण आहे तें पहा, आज रात्री मी तुझ्याशिवाय इतर कुणाबरोबर बोलणार नाहीं.'

लोलानें त्याच्याकडे रोखून पाहिलें, विजयाच्या मदिरेनें तो माणूस धुंद बनला होता आणि आतांपर्यंत त्यानें मोठ्या धूर्ततेनें छपविलेली त्याची अरेरावी वृत्ति उफाळून बाहेर आली होती. तीहि राजहंसीच्या ऐटीनें टेबला-जवळ सरकली आणि तिनें रिसीव्हर उचलून तो कानाला लावला. एक क्षणभरच तिनें ऐकलें आणि ती दचकली. बाहेर जमाव ओरडतच होता. तिनें रिसीव्हर खालीं ठेवला आणि ती त्याच्याकडे वळून म्हणाली, 'प्रेसिडेंट,'

एकाच शब्दानें त्याच्यांत बदल झाला, तो अगदीं हालक्या आवाजांत म्हणाला, 'काय !'

क्षणभर तो घुटमळला नंतर मुळींच पावलें न वाजवितां तो टेलिफोन जवळ गेला आणि म्हणाला, 'मी पॉल सॉलव्हेटी.'

'मी तुझ्याकडे अगदीं बारकाईनें पहात आहें,' फू–मांच्यूचा आवाज ऐकूं आला, 'वेळ अशी आहे कीं, तुझ्या हातून मुळींच चूक होतां कामा नये, आतां तू ज्या खोलींत उभा आहेस तेथून बाहेर पडून गच्चीवर जा, कांहीं बोलू नकोस, नुसतें जनतेला दर्शन दे, नंतर लोलाला पुढें ओढ. सर्वांनीं तिलाहि पाहिलें पाहिजे.'

फू–मांच्यूचा आवाज बंद झाला, पांच–सात क्षण सॉलव्हेटी स्तब्ध उभा होता. जणूं काय त्याच्यावर चाबकाचाच आघात झाला होता. आणि त्याला तें आवडलें नव्हतें.

'काय झालें ?' लोलानें विचारलें.

'हुकूम सुटला आहे आणि मला तो अंमलांत आणला पाहिजे.' तो म्हणाला.

त्यानें पडदा बाजूला सरकविला आणि तो चंद्रप्रकाशांत गच्चीवर उभा राहिला, तो उभा असतांना जमाव प्रचंड जयघोष करीत होता आणि तो आपला हात हालवीत होता. नंतर त्यानें इषाऱ्यानेंच लोलाला पुढें बोलाविलें आणि ती जवळ येतांच त्यानें तिचा हात धरून तिला आपल्या-जवळ उभी केलें. जमावानें पूर्वीपेक्षांहि दुप्पट उत्साहानें तिचें स्वागत केलें.

आंतल्या खोलींत परतल्यानंतर तिनेंहि त्याचा हात धरून त्याला आपल्या शेजारीं बसविलें. तो गालिचाकडे पहात होता.

'पॉल, प्रेसिडेंटनेंच तशी सूचना दिली होती ना ?'

'होय.' तो म्हणाला.

'हें बघ पॉल, त्यानें तुझी–माझी जोडी जुळविली आहे.' ती हलक्या स्वरांत म्हणाली, 'पण तुझें समाधान झालें आहे ना ?'

× × ×

मार्क हेप्बर्न धडपडून जागा झाला. त्याला एक भयंकर स्वप्न पडलें होतें. तो एका भयानक, अंधःकारमय भुयारांतून धांवत होता. त्याच्या हातांत मेणबत्ती होती. ती पकडणारीं बोटें मेणानें माखलीं होतीं, त्या भुयाराला अंतच दिसत नव्हता. मेणबत्ती विझण्याच्या बेतात होती आणि तेथून आपली कधींच सुटका होणार नाहीं. अशी त्याला भीति वाटत होती. मेणबत्ती विझली आणि तो धडपडत जागा झाला.

त्यानें पलंगाखालीं असलेलीं पादत्राणें चढविलीं, त्या खोलींत सिगारेटस नव्हत्या. बाहेरच्या खोलींत जाऊन सिगारेट ओढावी आणि कांहीं पेय घ्यावें असें त्यानें ठरविलें, नेलॅंडची झोपमोड होऊं नये म्हणून त्यानें दिवा लावला नाहीं, तो बैठकीच्या खोलींत गेला आणि त्यानें टेबलावरील सिगारेट उच-लली पण ती पेटविण्याचें त्याच्याजवळ साधन नव्हतें.

तो आजुबाजूला पाहूं लागला तेव्हां त्याला एका उघड्या दारांतून चंद्रप्रकाशानें स्नान करीत असलेली ती खोली दिसली. तो खोली त्यानें

आपली तात्पुरती प्रयोगशाळाच बनविली होती. तेथल्या खिडकींतून मोया रहात होती त्या इमारतीचें छप्पर दिसत होतें. आपण आपली आगपेटी त्या खिडकीतून पहात असतांनाच तेथल्या टेबलावर ठेवली होती. याची त्याला आठवण झाली आणि तो त्या खोलींत प्रवेश करून खिडकीजवळ गेला.

त्याला त्या आगपेटीचें आतां अजीबात विस्मरण झालें होतें. तो त्या खिडकीजवळ उभा राहून सारखा टक लावून पहात होता. त्याच्यापासून सुमारें वीस यार्डांवर समोरच्या खिडकींत फू–मांच्यू उभा होता.

प्रथम त्याला वाटलें कीं, आपण स्वप्न पहात आहोंत, फू–मांच्यू तेथें असणें शक्यच नव्हतें. आपण नेलँडला जागें करून त्याला त्या इमारतीला वेढा देण्यास सांगावें असेंहि त्याच्या मनांत आलें, पण ते हिरवे डोळे त्याला कांहीं सुचूं देत नव्हते. त्याला त्या पांचूसारख्या हिरव्या डोळ्यांखेरीज दुसरें कांहीं दिसतच नव्हतें.

त्या स्वप्नमय अवस्थेंतच तो प्रयोगशाळेंत एक औषध तयार करीत होता. अतिशय मेहनतीनें तें औषध तयार झालें. नंतर त्यानें तें त्या इंजेक्शनच्या सिरिंजमध्यें भरलें. तें इंजेक्शन नेलँडला द्यावयाचें होतें, पण तो त्यावेळीं जागा न होणें अतिशय महत्त्वाचें होतें.

ती सिरिंज हातांत घेऊन तो नेलँडच्या खोलींत गेला. नेलँड शांतपणें झोपला होता आणि त्याचा एक हात बाहेर पडला होता, स्वप्नांतल्या हेपबर्नला ती परिस्थिति सोयीस्कर वाटली. इंजेक्शनची सुई टोंचतांच नेलँड जागा होणार होता. पण तो उठून बसण्यापूर्वी बरेंचसें औषध त्याच्या रक्तांत मिसळणार होतें अगदीं जपून तो खालीं वांकला आणि त्यानें ती सुई खुपसली....

हेप्बर्नला अचानक कुणीतरी पाठीमागून पकडलें आणि दूर फेंकलें, तो पलिकडच्या कोपऱ्यांत आदळला आणि त्याबरोबर त्याच्या हातांतील सुई खालीं पडली, त्याच वेळीं नेलँड स्मिथ् उठून बसला आणि हेप्बर्नला त्याच्यावर पिस्तूल रोंखून समोर उभा असलेला फे दिसला.

'हेप्बर्न, हा काय प्रकार आहे ?' पलंगावरून खालीं उडी घेऊन नलँडनें विचारलें.

‘मोठाच चमत्कार आहे.’ हेप्‌बर्न उभा रहात म्हणाला, ‘थोड्या-वेळापूर्वी मी प्रयोगशाळेंत गेलों होतों. त्यानंतर मी काय करीत होतों हें मला आठवत नाहीं.’

‘मी त्यांच्याकडे पहात होतों.’ तो म्हणाला, ‘हे प्रयोगशाळेंत गेले तेव्हां माझी त्यांच्यावर नजर होती, कांहीं वेळानें ते तेथून बाहेर पडले आणि जणूं काय झोपेंत चालावें त्याप्रमाणें तुमच्या खोलींत शिरले. ते तुमच्याजवळ वाकले आणि मी त्यांना पाठीमागून पकडलें आणि दूर ढकललें.’

‘सिरींज!’ हेप्‌बर्न ओरडून म्हणाला, ‘सर डेनीस, मी तुम्हांला इंजेक्शन दिलें कीं काय ?’

‘इंजेक्शन ?’ आजूबाजूला पहात नेलँड ओरडला आणि त्यानें जमिनी-वर पडलेलें फाऊंटनपेन उचललें, ‘मला वाटतें तूं या पेनचेंच निब् माझ्या दंडांत खुपसलेंस !’

हेप्‌बर्न हाताच्या मुठी आवळून त्या फाऊंटनपेनकडे पहातच राहिला. ती त्यानें आदल्या दिवशींच विकत घेतली होती, पण तींत त्यानें शाई भरली नव्हती. . . .नंतर त्याला आठवलें, आपण औषध तयार केलें होतें, तें एका सिरींजमध्यें भरलें होतें, नाहीं; त्यानें तें मिश्रण त्या फाऊंटनमध्येंच भरलें असावें, कारण त्याच्याजवळ सिरींज नव्हती.

‘सर डेनीस, मी अद्याप स्वप्नांत आहें कीं माझ्यावर मोहिनी मंत्राचा प्रयोग करण्यांत आला आहे ?’ हेप्‌बर्ननें घाबरून विचारलें, ‘मी खिडकी-जवळ गेलों तेव्हां मला त्याचे ते चकाकणारे हिरवे डोळे दिसले.’

‘हिरवे डोळे !’ नेलँड त्याच्याकडे आश्चर्यानें पहात म्हणाला, ‘डॉक्टर फू–मॉंच्यू हा दुनियेंतील अद्वितीय मांत्रिक आहे, फे, पळ आणि मॅनेजराला बोलाव. हेप्‌बर्न, तूं त्याला कुठें पाहिलेस ?’

‘खालच्या मजल्यावर, उजव्या बाजूची तिसरी खिडकी.’ हेप्‌बर्न म्हणाला, तो आतां शुद्धीवर आला होता.

‘आतां त्या खोलींत तर अंधार आहे.’ धांवत प्रयोगशाळेंत जाऊन तेथल्या खिडकींतून बाहेर डोकावीत नेलँड म्हणाला, ‘हेप्‌बर्न, मी अगदीं थोडक्यांत वाचलों. त्यानें मोठी साहसी हालचाल केली आणि त्यावरून तो अगदीं टेकीस आलेला दिसतो, तूं या फाऊंटनपेनमध्यें काय भरलें आहेस तें

एका ईश्वरालाच माहित. तुझ्या प्रयोगशाळेंत इंजेक्शनची सुई असणार असें त्यानें गृहीत धरलें होतें, तूं त्याच्या सूचना अंमलांत आणल्यास. पण सिरींज-ऐवजीं फाऊंटनपेन भरलास ! बहुधा त्यामुळेंच माझे प्राण वाचले.'

आणखी पांचच मिनिटांत त्या जागेची तपासणी करण्यांत आली पण त्यांना तेथें कुणीहि सांपडलें नाहीं. डॉ. फू-मांच्यू त्यावेळीं लोटस कंप-नोच्या टॅक्सींत बसून कितीतरी दूर गेला होता. आपला शत्रू या वेळेंपावेतों नाहींसा झाला असणार अशी त्याची पूर्ण खात्री होती.

११

गोल घुमटींत

सकाळचा प्रकाश बैठकीच्या खोलींत खिडकीवाटे पसरत होता. 'गेल्या रात्रीचा प्रयत्न डॉ. फू-मांच्यूच्या कार्यपद्धतीला धरूनच आहे.' नेलँड म्हणाला.

'पण असल्या बोलण्यानें माझें समाधान होत नाहीं.' हेप्बर्न म्हणाला.

'तू निष्कारण चिंता करूं नकोस. फू-मांच्यूच्या या असल्या प्रयोगांचा मला अनुभव आहे. खुद्द माझ्यावरहि त्यानें प्रयोग केला होता. तो एकटाच आपला हेतु साध्य करण्यासाठीं आपल्या शत्रूच्या गोटांत शिरला होता यावरून त्याची छाती किती जबरदस्त असली पाहिजे तें पहा, तो फार मोठा माणूस आहे.'

'यांत शंकाच नाहीं.' हेप्बर्न म्हणाला.

'गेल्या रात्रीं तुझ्यावर गुंगीच्या औषधाचा प्रयोग करण्यांत आला होता असें म्हणावयास कांहींच आधार नाहीं. तूं झोपेंत असतांनाच त्यानें तुझ्यावर ती मोहिनी विद्येचा प्रयोग करण्यास सुरवात केली होती. तुला

पडलेलें तें भयंकर स्वप्न हा त्या प्रयोगाचाच भाग होता. तुझ्याजवळ इंजेक्शनची सिरींज असणार असें त्यानें गृहीत धरलें हीच काय ती त्याची मोठी चूक झाली.'

'पण मी माझ्या फाऊंटनपेनमधें कोणतेंतरी जहरी औषध भरलें आणि तें कोणत्या प्रकारचें आहे हें आतांपर्यंत तज्ञांना ओळखतां आलेलें नाहीं.' हेप्बर्न म्हणाला.

'तू त्यानें तुला दिलेल्या सूचना अंमलांत आणल्यास; डॉ. फू–मांच्यूमधें भयंकर शक्ति आहे. केवळ योगायोगानेंच त्याच्या हातून लहानशी चूक झाली आणि त्यामुळेंच त्याचा डाव फसला पण आतां आपण एकंदर परिस्थितीचा आढावा घेतला पाहिजे.' नेलँड म्हणाला.

'वू–चिंगच्या हॉटेलाखालीं कुठेंतरी गुप्त जागा असली पाहिजे यांत शंका नाहीं. शत्रूला आपली झळ पोहोंचूं लागली आहे. आणि त्याच वेळीं आपण जोर केला पाहिजे. मिसेस् अडेरच्या माहितीचा आपणांला कितपत उपयोग करतां येईल हाहि एक प्रश्न आहे. तिच्या मुलाला अधुन मधून लाँग आयलंडमधें पाठविण्यांत येतें. त्यावेळीं त्याला आपल्या ताब्यांत घेणें शक्य आहे.'

'त्या मुलाला जेथें पाठविण्यांत येतें त्या घराचा मालक आणि त्याच्या कुटुंबांतील मंडळी तेथें आहेत आणि तो माणूस हार्वेच्या लोटस टॅक्सी कंपनीचा डायरेक्टर आहे.' हेप्बर्न म्हणाला.

'तेंहि मला समजलें आहे. पण कदाचित् त्या माणसाला डॉ. फू–मांच्यूबद्दल कांहीं माहितीहि नसेल.' नेलँड म्हणाला, 'पण मुद्याचे दोन प्रश्न आहेत. मिसेस् अडेरकडून आपणांला खरोखरच कांही माहिती मिळेल काय? आणि तिच्या मुलाला पळविणें सुरक्षित आहे काय?'

'त्या मुलाला बाहेर नेणाऱ्या मोटारीचा ड्रायव्हर हबशी आहे. त्या मुलाला पळविण्याचा प्रयत्न करण्यांत आला तर त्याला ताबडतोब गोळी घालून ठार करावें. अशी सूचना त्या ड्रायव्हरला देण्यांत आली असली तर?' हेप्बर्ननें विचारलें, 'मला तरी तसा प्रयत्न करणें योग्य वाटत नाहीं.'

त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून नेलँड म्हणाला, 'समजा, आपणांला त्या प्रयत्नांत यश आलें . . .'

‘तर तिला त्याचे परिणाम भोगावे लागतील.’ हेप्बर्न म्हणाला.

‘आणि आपण तिलाहि पळविलें तर ?’ नेलँड्नें विचारलें.

मार्क हेप्बर्न एकदम उभा राहिला आणि म्हणाला, ‘सर डेनीस, ही तुमची युक्ति चांगली आहे.’

‘होय, पण त्याबद्दल खूप विचार करावा लागेल. सध्यां तरी मी तिचा किंवा तिच्या मुलाचा विचार न करतां त्या उंच इमारतीवर आपलें सारें लक्ष केंद्रित करावें अशा मताचा आहे. तेथल्या ऑफिसांत काम करणारे निघून गेल्यानंतर आणि तेथल्या व्यवस्थापकाला कळूं न देतां तूं अधिक चौकशी केली पाहिजेस.’

‘मी तेंच ठरविलें आहे. पण सर डेनीस, तुम्हांला माझ्या मनस्थितीची कल्पना आहे काय ? हेप्बर्ननें खालीं मान घालून विचारलें, ‘माझें त्या मोयावर प्रेम जडलें आहे हें मी नाकबूल करूं शकत नाहीं आणि ती शत्रू-पक्षांतील आहे. दुसरी गोष्ट मी मनाचा इतका कमकुवत आहें, कीं, फू-मांच्यू माझ्यावर मंत्रविद्येचा प्रयोग करून मला तुमचा खून करण्यास प्रवृत्त करूं शकला. अशा परिस्थितींत तुम्हीं माझ्यावर कसा विश्वास ठेवूं शकाल?’

नेलँडनें आपल्या जागेवरून उठून त्याचे दोन्ही खांदे पकडले आणि तो म्हणाला, ‘हेप्बर्न, सहसा मी कुणावर विश्वास ठेवीत नाहीं. पण तुझ्या-वर माझा संपूर्ण विश्वास आहे. तूं माणूस आहेस आणि मीहि माणूसच आहें. तूं त्या प्रयोगाबद्दल विचार करूं नकोस,दुनियेंत असा एकही माणूस नसेल कीं, जो डॉ. फू-मांच्यूच्या त्या शक्तीशीं मुकाबला करूं शकेल. फक्त एकच गोष्ट आहे कीं जर पुन्हां तुझी आणि त्याची भेट झाली तर तूं त्याच्या डोळ्यांकडे पाहूं नकोस.’

‘सर डेनीस, मी तुमचा फार आभारी आहें. तुम्हीं खरोखरच मोठ्या अंतःकरणाचे आहांत.’

‘हेप्बर्न, आपण निश्चित प्रगति करीत आहोंत. पण जसजसा काळ पुढें सरकतो तसतशी या लढाईची उग्रता वाढत आहे’ नेलँड म्हणाला, ‘कोणतीहि विमा कंपनी आपल्या आयुष्याचा विमा उतरविण्यास तयार होणार नाहीं. मला फादर अॅबॉटबद्दल चिंता वाटूं लागली आहे. तो माणूस

स्वस्थ बसणार नाहीं हें डॉ. फू–मांच्यूलाहि माहित आहे आणि त्यामुळेंच तो फादर अॅबॉटच्याविरुद्ध हालचाल करील अशी मला भीति वाटते.'

'डॉ. फू–मांच्यू सॉलव्हेटीचें बाहुलें पुढें करून आपलें ध्येय साधण्याच्या युक्तीनें निश्चित पावलें टाकीत आहे. पूर्वीपासूनच त्यानें सॉलव्हेटीची निवड केली होती आणि हार्वेचा अडथळा दूर करून त्याच्यासाठीं जागा तयार करण्यांत आली हें स्पष्ट आहे. आणखी पंधरा दिवसांच्या अवधींत कदाचित् एका आठवडयांत सॉलव्हेटी हार्वेपेक्षांहि लोकप्रिय ठरेल. त्याच्या यशाचा बुडबुडा फक्त एकच माणूस नष्ट करूं शकतो आणि तो म्हणजे फादर अॅबॉट...'

\+ + + +

त्या वृद्ध शिल्पकाराचें चिनी मुंडकें तयार करण्याचें काम जोरांत चालू होतें, आतां तें मुंडकें डॉ. फू–मांच्यूचें आहे हें परिचितांना ओळखतां येण्यासारखें होतें. तें काम चालू असतांना तो टेबलावरील सात टेलिफोनवरून येणारे संदेश ऐकत होता आणि ते लक्षांत ठेवीत होता. त्याचें जीवन हें मृत माणसाचें जीवन होतें. पण त्याचा ईश्वरावरील विश्वास यत्किंचितहि ढळला नव्हता.

अचानक तेथलें गुप्त दार उघडून फू–मांच्यू आंत आला आणि तो जर्मन भाषेंत म्हणाला, 'नमस्ते प्रोफेसर, तुम्हीं या कामामुळें थकला असाल म्हणून मी कार्यक्रमांत थोडा बदल केला आहे. तुमची जागा बदलण्यांत आली आहे. त्या ठिकाणीं अशीच व्यवस्था आहे, तुमचें सर्व सामान हलविण्यांत आलें आहे. तुम्हीं आतां माझ्याबरोबर चला.'

तो वृद्ध शिल्पकार फू–मांच्यूच्या हिरव्या डोळयांच्या अथांग सागरांत डुबत होता. आपण कुठें आहोंत, काय करीत आहोंत याचें त्याला भान नव्हतें, तो निमूटपणें उठला, त्यानें अर्धपुतळा उचलून आपल्या पोटाशीं धरला आणि तो फू–मांच्यूच्या पाठीमागून चालूं लागला.

\+ + + +

बू–चिंगच्या तळघराची तपासणी चालू होती. त्या ठिकाणीं पोलिसांना अनेक गुप्त जागा सांपडल्या. पण अगदीं खालीं असलेलीं तळघरें आणि त्याबरोबरच तें सात डोळयांच्या देवीचें देऊळ आतां नदीच्या पाण्यानें भरलें

होतें. सॅम्प् पॅकूनें तेथून निघून जातांना नदीकांठचें गुप्तदार उघडून तें पाणी आंत घेतलें होतें.

त्या ठिकाणीं कांहींच महत्त्वाचा सुगावा न लागल्यामुळें नेलँडची निराशा झाली होती. डॉ. फू–मांच्यू यापुढें त्या तळाचा उपयोग करूं शकणार नाहीं एवढीच काय ती समाधानाची गोष्ट होती. तेव्हां त्यानें ज्या स्ट्रायाटन टॉवर नांवाच्या इमारतीची हेप्बर्ननें तपासणी केली होती तिच्यावर आपलें लक्ष केंद्रित करण्याचें ठरविलें.

त्या इमारतीचा व्यवस्थापक लिफ्टमधून वरच्या मजल्यावर गेला तेव्हां त्याच्या बरोबर दोन माणसें होतीं. त्यांतील एक इलेक्ट्रिक कंपनीचा प्रतिनिधि होता आणि त्याला त्या व्यवस्थापकानें आदल्या दिवशीं पाहिलें होतें. दुसरा माणूस उंच आणि लष्करी बाण्याचा होता, त्यानें चष्मा लावलेला होता आणि त्या इमारतीचा विमा उतरविणाऱ्या विमा कंपनीतर्फे तो तेथें आला होता.

त्यावेळीं त्या इमारतीच्या शेंकडों खिडक्यांतून दिव्यांचा प्रकाश दिसत होता. तेथल्या निरनिराळ्या ऑफिसांतून काम करणारे बहुतेक लोक आपापल्या घराकडे परतले होते. फारच थोडीं माणसें तेथें होतीं आणि तीं आपलें शिल्लक राहिलेलें काम संपविण्याच्या गडबडींत होतीं.

व्यवस्थापकाला तेथल्या कंपन्यांच्या खऱ्या कारभाराची कांहींच माहिती नव्हती आणि अगदीं वरच्या मजल्यावरील ऑफिसांतील सर्व माणसें त्या संध्याकाळीं सहा वाजतांच तेथून निघून गेलीं होतीं आणि तें ऑफिस आतां पोलिसांनीं भरलें होतें याची त्याला कल्पना नव्हती.

इलेक्ट्रिक कंपनीच्या मागणीप्रमाणें वरच्या घुमटीकडे जाणाऱ्या दाराला मारलेल्या फळ्या आतां काढून घेण्यांत आल्या होत्या. व्यवस्थापकानें त्या दोघांना पहातांच आपल्या जवळचा चाव्यांचा जुडगा काढला आणि त्यांतील एका चावीनें दार उघडलें.

'मी कधींहि त्या घुमटींत गेलों नाहीं हें तुम्हांला आधींच सांगतों.' तो म्हणाला, 'मी इथलें काम पत्करल्यापासून तें दार उघडण्यांत आलें

नव्हतें. वर कांहीं खोल्या आहेत आणि त्या, या इमारतीचे मालक पूर्वी वापरीत होते ते विक्षिप्त होते आणि आतां ते स्थान नाहींत. यदाकदाचित् जर आग लागली तर तेथून सुरक्षितपणें बाहेर पडतां येणार नाही म्हणून कित्येक वर्षांपूर्वी हा मार्ग बंद करण्यात आला होता. मी पुढें होतों, वर दिव्यांची व्यवस्था नाहीं, पण माझ्याजवळ टॉर्च आहे.'

ते त्या दारानें आंत गेले. त्या व्यवस्थापकाच्या मागें इलेक्ट्रिक कंपनीचा माणूस होता. त्याच्यामागे वेपांतर केलेला नेलँड स्मिथ होता आणि आतां हेप्बर्नहि तेथें पोहोंचला होता.

आंतल्या बाजूला एक अष्टकोनी खोली होती. दक्षिणेच्या बाजूला त्या खोलीला तीन खिडक्या होत्या, त्या ठिकाणीं आतां कांहींच सामान नव्हतें. पण तेथे बरेंच सामान ठेवण्यांत आलें होतें अशा खुणा होत्या.

'आपण आतां वरच्या घुमटींत जाऊं.' हेप्बर्न म्हणाला.

व्यवस्थापकानें आपल्या जवळचा एक छोटा नकाशा बाहेर काढला आणि तो म्हणाला, 'येथें वर जाण्याचें दार असलें पाहिजे.'

तो तेथल्या मधल्या खिडकीजवळ गेला आणि बराच वेळ शोध करून त्यानें जवळच्या भिंतीतलें एक किल्लीचें छिद्र शोधून काढलें, नंतर कित्येक चाव्या लावून पाहिल्या .शेवटीं त्यांतील एकीनें तें गुप्त दार उघडलें.

दार उघडतांच त्यांना जिना दिसला, जिन्याच्या वरच्या पायरीवर एक दार होतें. व्यवस्थापकानें तें दार उघडतांच त्यांनीं एका लहान पण अष्टकोनी खोलींत प्रवेश केला. तीहि रिकामी होती.

आपल्या टॉर्चचा प्रकाश आजूबाजूला फेकीत व्यवस्थापक म्हणाला, 'या खोलीच्या बाहेर एक गच्ची आहे. खिडकी बंद आहे.'

नेलँडनें अचानक विचारलें, 'या जागेवर एक मजला आहे ना ?'

हेप्बर्ननें ती खिडकी उघडली आणि वर पहात तो म्हणाला, 'वर एक छोटी घुमटी आहे खरी. त्या घुमटीकडे जाणारें दार खिडकीजवळच दिसतें. तें उघडता येईल कीं नाहीं तें पाहिलें पाहिजे.'

व्यवस्थापक तें दार उघडण्यासाठीं पुढें सरकला आणि नेलँड त्या गच्चींत गेला. कैदेंत असलेला वृद्ध शिल्पकार त्याच गच्चींत फेऱ्या घालीत असे आणि दिवसभर परिश्रमानें तयार केलेलें चिनी मुंडकें तेथूनच खालीं टाकीत असे.

तेवढ्या अवधींत व्यवस्थापकानें वरच्या घुमटींत जाण्याचें दार उघडलें होतें. नेलँडनें त्याला तेथून खालीं जावयास सांगितलें व नंतर तो हेप्बर्नला म्हणाला, 'ही जागा कांहीं तासांपूर्वींच घाईघाईनें रिकामी करण्यांत आली आहे. आतां आपली शेवटची आशा म्हणजे ती घुमटी.'

त्यानें टॉर्चचा प्रकाश त्या दारावर सोडला. वर जाण्यासाठीं छोटासाच जिना होता. हेपबर्नसह तो वरच्या घुमटींत पोहोंचला. तीहि रिकामी होती.

' त्याचा पुन्हां विजय झाला आहे ! ' नेलँड निराशेनें म्हणाला. मला वाटतें तेथून बाहेर पडण्याचा आणखी एक गुप्त मार्ग असावा.

त्याच वेळीं कांहीं आवाज झाल्यामुळें त्यानें आपलें बोलणें अचानक थांबविलें. त्या घुमटीची एक खिडकी बंद झाली होती व बाहेर चंद्रकिरणांत फू–मांच्यू जणूं अधांतरीं उभा होता !

'हेपबर्न त्याच्या डोळ्यांकडे पाहूं नकोस ! ' खिशांतलें पिस्तूल बाहेर काढीत नेलँड म्हणाला. फू–मांच्यूचे हिरवे नेत्र देदीप्यमान पांचूप्रमाणें खिडकीच्या काचेंतून दिसत होते.

' सर डेनिस, पिस्तुलाची गोळी फुकट जाईल ' फू–मांच्यूचा आवाज अगदीं स्पष्ट ऐकूं आला. ' खिडकीची कांच विशिष्ट प्रकारची आहे. '

डॉ. फू मांच्यू कधींहि खोटें बोलणार नाहीं हें नेलँडला माहित होतें. पण त्याच्या आयुष्यांतील ती निर्वाणीची वेळ होती. तशा वेळीं त्याच्या सारख्यांच्या हातूनहि चूक घडण्याचा संभव होता. त्यानें गोळी झाडली पण कांच अभेद्य राहिली.

' सर डेनिस, तुम्हीं माझ्या बोलण्यावर शंका घेतली त्याचें मला वाईट वाटतें. ' फू–मांच्यू म्हणाला, ' माझ्या दीर्घ आयुष्यांत माझ्या नजरेला नजर भिडवूं शकणारे फक्त तुम्हींच एक आहांत. आणि त्यासाठींच मला

तुमच्याबद्दल आदर वाटतो. पण सध्याची वेळच अशी आहे कीं मला माझ्या मार्गात येणारा कोणताहि अडथळा दूर केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

'मी अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठीं सॉल्व्हेटीची निवड केली आहे. या अमेरिकेंत मी माझें साम्राज्य स्थापन करणार आहें. अनेक वेळीं तुम्हीं माझा डाव उधळविला आहे. पण सर डेनीस, या खेपेला तुम्हीं येथें फार उशिरां आलांत. या जागेंतून बाहेर पडण्याचा दुसरा मार्ग आहे हा तुमचा तर्क अगदीं बरोबर आहे.

'सर डेनीस, मी आतां तुमचा निरोप घेतों. तसें करतांना मला अंतःकरणपूर्वक खेद होत आहे. तुमची शक्ति मर्यादित आहे.' फू-मांच्यू घड्याळासारखी कोणती तरी वस्तू बाहेरच्या गच्चीवर ठेवीत म्हणाला, 'मी या ठिकाणीं जें कांहीं ठेवलें आहे त्याचा बरोबर दोन मिनिटांनीं स्फोट होईल व त्याबरोबर या इमारतीचा सर्व वरचा भाग नष्ट होईल. नमस्ते सर डेनीस,

डॉ. फू-मांच्यू अचानक नाहींसा झाला. नेलँड हाताच्या मुठी आवळीत होता. हेप्बर्न त्याला ओढीत म्हणाला, आपणाला ती खालची गच्ची गांठली पाहिजे. त्या गच्चीखालीं टेलीफोनची तार आहे व ती खालच्या तिसऱ्या मजल्यापर्यंत गेली आहे.'

ते दोघेहि धांवले. धांवतांना नेलँड म्हणाला, 'ईश्वरच आपलें संरक्षण करो! ती तार आपलें वजन सांभाळूं शकेल काय?'

१२

निर्णायक हालचाली

'सर डेनीस, आपल्या मागल्या भेटीनंतर अमेरिकेच्या इतिहासाला कित्येक नवीन प्रकरणांची जोड मिळाली आहे.' फादर ॲबॉट म्हणाले.

नेलँड स्मिथ तेथल्या खिडकीजवळ उभा होता. त्यानें किंचित् मान लवविली. त्या दोघांच्या पूर्वीच्या भेटींत काय घडलें हें त्याला बरोबर आठवत होतें. यावेळीं अमेरिकेचें सर्व भवितव्य अधांतरीं लोंबकळत होतें आणि आतांपर्यंत यश त्याच्यापासून दूरच राहिलें होतें.

न्यूयॉर्कमधील त्या उंच इमारतींत झालेला स्फोट, ही घटना आतां इतिहासजमा झाली होती. एकामागून एक अनेक घटना अशा वेगानें घडत होत्या कीं अठ्ठेचाळीस तासांपेक्षां अधिक त्यांतील कोणत्याहि गोष्टींची आठवण टिकणें अशक्य होतें. त्या स्फोटाच्या वेळीं नेलँडला आणि हेप्बर्नला अगदीं सत्य अशा भयानक अग्निदिव्यांतून बाहेर पडावें लागलें होतें.

त्या लहानशा लोंबकळणाऱ्या तारेच्या आधारें खालच्या तिसऱ्या मजल्यापर्यंत उतरणें ही अशक्य गोष्ट होती, पण त्या दोघांनीं ती साध्य केली होती आणि त्या तारेवर लोंबकळत असतांनाच स्फोटानें वरच्या घुम-टीच्या ठिकऱ्या उडविल्या होत्या. ती नुसती आठवणहि अंगावर रोमांच उभे करणारी होती.

'केवळ पैशाच्या जोरावर सॉल्व्हेटीनें माझे कित्येक अनुयायी फितूर केले आहेत. आणि तुम्हांला माहितच असेल, माझे मित्र डॉ. प्रेसकॉट हे जहाजांतून जगाला प्रदक्षिणा घालण्यासाठीं बाहेर पडले आहेत. सर डेनिस् तुम्हांला कल्पना नसेल इतकी सॉल्व्हेटीच्या अनुयायांची संख्या वाढली आहे आणि त्यांनीं आतांपर्यंत अनेकांचीं तोंडें बंद केलीं आहेत.' फादर ॲबॉट म्हणाले.

'माझीहि त्यांत भर पडली असती.' नेलँड म्हणाला, 'पण फादर, तुम्हीं जर आपलें तोंड उघडलें असतें तर यापूर्वी तुमचेंहि नांव त्या यादींत पडलें असतें.'

'पण आतां मला तोंड उघडावें लागणार आहे.' ॲबॉट म्हणाले.

'फादर, मी सूचना देईपर्यंत जर तुम्हीं थांबलां असतां तर बरें झालें असतें.' नेलँड म्हणाला. संरक्षण करणाऱ्या माणसांचा मला तुटवडा भासूं लागला आहे आणि आज हा देश महायुद्धाच्या काळांतहि झाला नसेल इतका

उत्तेजित आणि स्फोटक बनला आहे. आजच्या परिस्थितीला तोड नाहीं, बडी मंडळीहि शत्रूला सामील होतात. '

तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. कोणत्या उपायानें ती बडी मंडळी शत्रूनें वश केली तेंहि मला माहित आहे. '

'होय, फादर, अनेकांचा त्यासाठीं अमानुष छळ करण्यांत आला आहे.' नेलँड म्हणाला, 'येत्या बुधवारीं रात्रीं तुम्हीं तुमच्या भाषणांत या चळवळीसंबंधीं बोलणार आहांत आणि शत्रूचीं कांहीं रहस्यें उघडकीस आणण्याचा तुमचा विचार आहे. पण फादर, त्यामुळें तुम्हांला धोका निर्माण होईल, निदान तुम्हीं काय बोलणार आहांत याबद्दल तरी मला कल्पना द्या.'

फादर ॲबॉट त्याच्याकडे रोखून म्हणाले, 'ज्या माणसानें अनेकांचीं प्रेतें ओलांडून सॉल्व्हेटीला इतका मोठा बनविला आहे, त्या माणसाची मला माहिती आहे पण नांव माहित नाहीं. तो अतिशय सुसंस्कृत माणूस आहे, एका जुन्या चिनी घराण्यांतील आहे. त्याची गुप्त संस्था आहे आणि त्या संस्थेचें मुख्य ठाणें तिबेटमध्यें आहे. ती संस्था सप्तमंडळ या नांवानें ओळखली जाते. मंडळाची संपत्ति अगणिक आहे आणि त्याच्या शाखा सर्व जगभर पसरल्या आहेत, त्या संस्थेचा प्रमुख म्हणजे या जगात उतरलेला सैतान आहे. मी तुमचा सल्ला ऐकण्यास तयार आहें, अर्थातच तो मान्य करीनच अशी हमी देणार नाहीं. '

'तर मग मला माझे शब्द फुकट घालवायचे नाहींत.' नेलँड म्हणाला, 'तुम्हीं तुमचा कार्यक्रम ठरविला आहे, त्यांत बदल करण्याची माझ्यांत शक्ति नाहीं. पण जर आपण दोघांनीं एकत्र काम करावें असें तुम्हांला वाटत असेल तर कांहीं गोष्टींबद्दल मला आग्रह धरावा लागेल. फादर, तुमच्या वैयक्तिक स्थिरतेबद्दल मी जबाबदार आहें, तुम्हीं मला मदत केली पाहिजे. अखिल मानवतेचें भवितव्य आज तुमच्यावर अवलंबून आहे. '

'मानवी जीवनांतील यश किंवा अपयश अगदीं क्षुद्र तंतूवर अवलंबून असतें हें मला मान्य आहे.' फादर म्हणाले, 'पॉल सॉल्व्हेटी आणि लोला ड्युमास यांच्या आगामी विवाहाची जाहिरात झाली आहे आणि त्यावरून

ज...७

जो अमेरिकेचा हुकूमशहा बनण्याचें स्वप्न रचीत आहे तो माणूस आहे असें सिद्ध होतें आणि सर डेनीस, माणसाच्याच हातून चुका घडतात.'

'असें! तुम्हांला सॉलव्हेटीच्या खाजगी जीवनाची माहिती दिसते.' नेलँड म्हणाला.

'होय,' फादर अॅबॉट म्हणाले,' आणि ती माहिती जाहीर करणें मला मातें पवित्र कर्तव्य वाटतें.'

+ + + +

'माझ्या मित्रा, जरी आपण आतां अंतिम यशाजवळ पोहोंचलों असलों तरी आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें फादर अॅबॉटला नाहींसा करणें आवश्यक आहे.'

डॉ. फू-मांच्यू बोलत होता. तो बसला होता त्या खोलींत स्ट्रॅयाटन बिल्डींगच्या घुमटींत असलेलीं सर्व शास्त्रीय आणि यांत्रिक उपकरणें होतीं. फरक इतकाच कीं आतां उघडया खिडकींतून आंत येणारा फुलांचा मधुर सौगंध त्या जागेंत दरवळत होता. खिडकींतून बाहेरचें उद्यान दिसत होतें. डॉ. फू–मांच्यू आपल्या मुख्य तळासाठीं वेगवेगळ्या जागा शोधून काढण्यांत कुशल होता.

नेलँडच्या हुकमतीखालीं काम करणाऱ्यांच्या दृष्टीनें स्ट्रॅयाटन बिल्डिंगच्या स्फोटानंतर डॉ. फू-मांच्यू अजिबात अदृश्य झाला होता. त्या सात डोळ्यांच्या देवीच्या गुहेनें आपलें रहस्य फोडलें नव्हतें आणि त्याबरोबरच सॅम्प् पॅक्चाहि पत्ता नव्हता. सर्व अमेरिकाभर शोध करूनहि डॉ. फू-मांच्यू भात्र देशांत आहे असा पुरावा मिळाला नव्हता. पण त्याच्या हालचाली मात्र पूर्वीपेक्षांहि अधिक प्रखरतेनें जाणवत होत्या.

सॉलव्हेटी सर्वसामान्य अमेरिकन जनतेचा लाडका बनला होता आणि लोलाबरोबरच्या त्याच्या आगामी विवाहाला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें होतें. कांहीं शहाण्या लोकांचा त्याला विरोध होता. पण पूर्वीं जे बेकार किंवा अर्ध- होते त्यांना पैसा मिळू लागल्यामुळें ते कुणाचीहि विरुद्ध टीका ऐकू-

ण्याच्या मनस्थितींतच नव्हते. त्यामुळें बुद्धिवानांना न बोलण्यांतच शहाणपणा आहे हें पटलें होतें.

नेलँडनें जागतिक कीर्तीच्या तज्ञांचा सल्ला घेतला होता आणि फू-मांच्यूची गुप्त संघटना त्या चळवळीसाठीं दर आठवड्याला वीस लक्ष डॉलर खर्च करीत आहे असा अंदाज बांधण्यांत आला होता. इतके पैसे कुठून आणण्यात आले असावेत हें कोडें मात्र कुणालाहि सोडवितां येण्यासारखें नव्हतें.

नंतर आकाशवाणीप्रमाणें अचानक फादर अॅबॉटचा आवाज सर्व राष्ट्राला ऐकावयास मिळाला आणि त्यामुळें प्रचंड खळबळ उडाली. लक्षावधी लोकांची इच्छा होती कीं फादर अॅबॉटनें कांहींतरी बोलावें, पण सर्वांची अशी कल्पना होती कीं जरी ते जुन्या राजवटीचे अभिमानी असले तरी ते नव्या राजवटीला मान्यता देतील.

पॉल सॉलव्हेटीचा कार्यक्रम हुकूमशाहीला पोषक होता आणि त्यानें तें दडविण्याचा मुळींच प्रयत्न केला नव्हता. संपत्तीच्या विभागणीबद्दल तो जें बोलत होता तें प्रामाणिक माणसाला समजण्यासारखें नव्हते, पण ज्यांचा फायदा होता ते त्यांना भरघोस पाठिंबा देत होते.

शेतीच्या पद्धतींत अमूलाग्र बदल करण्यांत आला होता. ठिकठिकाणीं शेतकऱ्यांच्या संघटना स्थापन झाल्या होत्या आणि शेतकऱ्यांनीं सहकार्यानें शेती करावी असा आदेश देण्यांत आला होता. शेतांत पिकविलेलें धान्य एकत्र करण्यांत येत होतें आणि तें त्या संघटनेमार्फतच विकण्यांत येत होतें. अनेक शहरांतून त्या संघटनेच्या वखारी स्थापण्यांत आल्या होत्या. त्या योजनेनुसार सॉलव्हेटीच्या संस्थेच्या हातीं सर्व महत्त्वाच्या उद्योगधंद्यांची चावीच येणार होती. हार्वे जें नुसतें बोलत होता आणि ज्याला लोक हार्वेचें स्वप्न म्हणत होते तें सॉलव्हेटीनें साकार केलें होतें.

फू-मांच्यूच्या समोर स्टुलावर बसलेला मॅम् पॅक् म्हणाला, 'मालक असें त्या विद्वान् पाद्रयाला काय समजलें आहे कीं, जें इतरांना माहित नव्हतें?'

'आपल्या मुख्य शत्रूनें पुरावा मिळविण्यांत यश मिळविलें आणि त्यामुळें फादर अॅबॉटला घोषणा करता आली.' फू-मांच्यू म्हणाला, 'आपण

यश मिळविण्याच्या अगदीं बेतांत असतांना तो आपल्या मार्गांत अडथळा आणीत आहे. मला त्या पाद्रयाची भीति वाटूं लागली आहे.'

'शहाणा माणूस त्याला जें ज्ञात असतें त्यालाच घाबरतो. सॅम्पॅक् म्हणाला, 'कारण अज्ञाताविरुद्ध तो आपला बचाव करूं शकत नाहीं.'

डॉ. फू-मांच्यू अगदीं निस्तब्ध बसून निर्विकार मुद्रेनें सॅम्पॅक्चा शेंकडों सुरकुत्या पडलेला चेहरा न्याहाळीत होता. तो म्हणाला, 'त्या पाद्रयाची स्वतःची गुप्त पोलीस संघटना आहे. त्यामुळें त्याला वाटेल ती बातमी मिळूं शकते. त्याचे लाखों अनुयायी आहेत. एखादा माळी बागेंतील नाजूक फुलझाडाला सांभाळतो त्याप्रमाणें मी ज्याची काळजी घेतली आहे त्या सॉलव्हेटीचें दिवस-रात्र संरक्षण केलें पाहिजे.'

'हार्वेपेक्षां त्याच्या शरीरसंरक्षकांची संख्या पांच पटीनें अधिक आहे.' सॅम्पॅक् म्हणाला.

'पण अशी बातमी आहे कीं, तो आपल्या संरक्षकांनाहि फसवितो आणि लोलानें त्या बातमीला दुजोरा दिला.' फू-मांच्यू म्हणाला, 'तो अशा प्रकारें कोठें जात असतो हें आपणांला समजलें पाहिजे. मी आतां शिकागो शहरांत जाणार आहें आणि बरोबर त्या प्रोफेसरला नेणार आहें. शनिवारीं रात्रीं मी तेथें जातीनें हजर असणें आवश्यक आहे.'

'तुमचें विमान तयार आहे. पण तें गांठण्यासाठीं तुम्हांला न्यूयॉर्कमधून मोटारीनें जावें लागेल.'

'मी एका तासानें येथून निघेन.' फू-मांच्यू म्हणाला, 'सॉलव्हेटीच्या शनिवारच्या भाषणाला महत्त्व आहे, तेव्हां आपण त्यापूर्वीं फादर अँबॉटचें तोंड बंद केलें पाहिजे.'

१३

अजब चमत्कार

मार्क हेप्‌बर्न अस्वस्थ झाला होता. त्या 'पहांटेस नेलँड विमानानें फादर अॅबॉटला गांठण्यासाठीं निघून गेला होता. फादर अॅबॉटनें सॉलव्हेटी-संबंधीं कांहीं संदिग्ध विधानें केली होतीं आणि त्यामुळें जनतेंत खळबळ उडाली होती. पण सॉलव्हेटीविरुद्ध भरभक्कम पुरावा मिळाल्याशिवाय त्याची प्रगति खुंटणार नव्हती.

पण हेप्‌बर्नच्या मनांत यावेळीं निराळेच विचार घोळत होते. तो शहरांतील एका बागेंत ठराविक ठिकाणीं उभा होता आणि प्रथमच मोया वेळेवर हजर राहिली नव्हती. जसा अधिक वेळ निघून जाऊं लागला तशी त्याला भीति वाटली. रॉबीला लाँग आयलंडमधें कोणत्या ठिकाणीं नेण्यांत येत असतें हें पोलिसांनीं शोधून काढलें होतें, पण आपल्या मुलाच्या बाबतींत पुन्हां तसला पाठलाग करूं नये अशी मोयानें हेप्‌बर्नची विनवणी केली होती. त्याबाबत प्रेसिडेंटनीं तिला अनेक प्रश्न विचारले होते आणि तिनें दिलेल्या उत्तरानें त्याचें समाधान झालें असावें अशी तिची खात्री नव्हती. आणि आतां गुफीबरोबर चिठ्ठी पाठवूनहि ती तेथें हजर झाली नव्हती.

नंतर त्यानें मोयाला तेथें येतांना पाहिलें आणि त्याचें हृदय आनंदानें नाचूं लागलें. तो उठून तिच्या रोखानें धांवणार होता, पण तिची आणि त्याची नजरानजर होतांच तो थांबला. तिनें आपल्या नजरेनें त्याला सुचविलें होतें, 'माझ्याबरोबर बोलूं नका, माझा पाठलाग करण्यांत येत आहे.'

धूर्त हेप्‌बर्न लागलींच एका झाडाआड झाला. त्यानें मोयाचा पाठलाग करणाऱ्याला पाहिलें, मोया एका बांकावर बसली आणि तिनें आपल्या पर्समधून एक पुस्तक काढून तें वाचावयास सुरवात केली. तो माणूस घुटमळतच कांहीं वेळ तिच्याकडे पहात उभा राहिला व नंतर त्या बागेंतून बाहेर पडला.

हेप्बर्ननें त्या माणसाचा पाठलाग केला आणि तो पुन्हां परतणार नाहीं अशी खात्री झाल्यानंतर तो मोयाकडे परतला.

'तो निघून गेला ना?' तिनें थकलेल्या स्वरांत विचारलें, 'तो आतां रिपोर्ट देण्यासाठीं गेला आहे. माझा त्यांना संशय आला असावा असें दिसतें आणि त्यामुळेंच माझ्यावर अतिशय काम लादण्यांत येतें. मला बाहेर पडण्यास फुरसत मिळूं नये हा त्यांचा तसें करण्यांत हेतु असावा, आतां त्या सॉल्व्हेटी आणि लोला यांचें लग्न जमल्यामुळें तर कामांत भरच पडली आहे. सॉल्व्हेटीला अध्यक्षपद मिळावें यासाठीं ती गोष्ट प्रचाराच्या दृष्टीनें योग्य पडणार आहे.'

'मोया, तू घाबरूं नकोस.' हेप्बर्न म्हणाला, 'साऱ्या जगांतील दुष्ट माणसांची सेवा करणें तुला भाग असलें तरी—'

'प्रेसिडेंट!' ती मधेंच म्हणाली, 'बरे आणि वाईट याच्याहि पलिकडचा तो माणूस आहे. मला स्वत:ला या देशाची सत्ता कुणाकडे जाईल या गोष्टीचें महत्त्व वाटत नाहीं. राज्य करणारा कुणीहि असला तरी सर्व साधारण जनतेच्या दैनंदिन जीवनांत कांहींच फरक पडत नाहीं. पण मला रॉबीबद्दल अतिशय चिंता वाटत आहे.'

तिच्या डोळ्यांतील अश्रू पाहून तो घाबरला आणि त्यानें विचारलें, 'काय झालें?'

'तो आजारी आहे. त्याला डिफ्थेरिया झाला आहे. डॉक्टर बर्नेट त्याच्यावर औषधोपचार करीत आहेत.'

हेप्बर्न हा स्वत: डॉक्टर होता आणि तें मोयालाहि माहित होतें. तो म्हणाला. 'मला त्याला पाहूं दे, मी जरी सामान्य डॉक्टर असलों तरी मला रॉबीबद्दल आपुलकी वाटते.'

'तुम्हीं त्याला पहावें अशीच माझी इच्छा आहे. त्यासाठींच तर मी तुम्हांला भेटावयास आलें.' ती म्हणाली, 'गेल्या रात्रींच त्याला कोणत्या आजारानें पछाडलें हें मला समजलें म्हणून . . .'

नेलँड विमानांतून खालीं उतरतांच त्याला जॉनसन नांवाचा अधिकारी भटला. नेलँडला मदत करण्यासाठीं त्याची नेमणूक झाली होती.

'डॉ. फू-मांच्यू आणि सॅम् पॅक् यांचें ठिकाण तुम्हीं शोधून काढलें आहे असें मला कळविण्यांत आलें होतें. ताजी बातमी काय आहे ?'

'कांहीं मिनिटांपूर्वीं फू-मांच्यू तेथून निसटला, माझीं माणसें त्याला अडवूं शकलीं नाहींत. तो न्यूयॉर्ककडे चालला होता, त्या रस्त्यावर जागोजाग पहारे बसविण्याची व्यवस्था झाली आहे. तुम्हांला भेटण्यासाठीं मी येथें आलों.' जॉन्सन म्हणाला.

'प्रत्येक खेपेला मला उशीर होतो आणि तो माझ्या हातांतून निसटतो.' नेलँड म्हणाला.

नेलँड आपल्या निवासस्थानी पोहोंचला तेव्हां कॅ हेप्बर्न तेथें नव्हता. नेलँडनें फेला विचारलें, 'हेप्बर्न कुठें गेला तें तुला माहित आहे काय ?'

'नाहीं साहेब, पण त्या गोष्टीशीं मिसेस अडेरचा संबंध असावा असें मला वाटतें. आज सकाळीं तुम्हीं येथून निघून गेल्यानंतर तिची नर्स एक पत्र घेऊन येथें आली होती. हेप्बर्न बाहेर गेले आणि सर्व दिवसभर ते बाहेरच होते; एका तासापूर्वीं ते परतले. त्यांनीं आपल्या प्रयोग शाळेंतील कांहीं वस्तू गोळा केल्या आणि ते पुन्हां बाहेर गेले.'

नेलँडला त्या गोष्टीचा अर्थच समजेना. पण त्याच वेळीं त्याला हेप्बर्नचा टेलिफोन आला.

डॉ. बर्नेट, हे तरुण होते. ते म्हणाले, 'मिसेस अडेर, चिंता करण्याचें कारण नाहीं, एवढें मात्र खरें कीं माझें पूर्ण समाधान झालेलें नाहीं.'

मोयानें हेप्बर्नकडे पाहिलें आणि ती म्हणाली, 'डॉ. बर्नेट, हे डॉक्टर पर्सेल माझे जुने मित्र आहेत, त्यांनीं रॉबीची प्रकृति तपासली तर चालेल काय?'

'माझी मुळींच हरकत नाहीं, उलट एखाद्या दुसऱ्या डॉक्टराला त्याची प्रकृति दाखवावी असें मी सुचविणार होतों.'

डॉ. बर्नेट हेप्बर्नला घेऊन रॉबीच्या खोलींत गेले. रॉबीची नर्स जवळ बसून रडत होती. हेप्बर्ननें मुलाची प्रकृति तपासली आणि त्याला धक्काच बसला. तो म्हणाला, 'डॉ. बर्नेट, तुम्हांला डॉक्टर डेटमोल्डचा नंबर माहित आहे काय ?' त्यांचा सल्ला घेतला पाहिजे.'

डॉ. डेटमोल्ड हे न्यूयॉर्कमधील एक प्रख्यात बालरोगतज्ञ होते.

नेलँडनें हेप्बर्नची हकीकत ऐकल्यानंतर तो खिडकीजवळ उभा राहिला. त्याला स्ट्रयाटन बिल्डिंग दिसत होती. त्या इमारतीची घुमटी नाहींशी झाली होती आणि तिला अनेक भेगा पडल्यामुळें आतां ती रिकामी करण्यात आली होती.

ज्यानें तें केलें होतें तो फू-मांच्यू अद्याप पकडला गेला नव्हता.

सॉलव्हेटीचा पाडाव कसा होईल हा महत्त्वाचा प्रश्न होता. बुधवारीं रात्रीं आठवाजेपर्यंत फादर अॅबॉट जिवंत राहूं शकले तर ते साऱ्या जगाला सत्य ऐकविणार होते, पण त्याचा काय परिणाम होईल ? डॉ. फू-मांच्यू तर सोनें देऊन सारी अमेरिका खरेदी करीत होता !

तो एकदा नेलँडला म्हणाला होता, 'सोनें, मी अखिल मानवतेला सोन्यांत बुडवूं शकतों !'

अशा माणसाबरोबर लढायचें कसें ? एकच उपाय होता. तो म्हणजे पॉल सॉलव्हेटीला ठार करणें. पण जरी तो सर्व अमेरिकेच्या भवितव्याचा प्रश्न होता तरी नेलँड तसें करूं शकत नव्हता. आणखी एक मार्ग होता तो म्हणजे, फू-मांच्यूलाच नष्ट करणें, पण तो साधायचा कसा ?

\+ \+ \+

'मी डॉक्टर डेटमोल्टना बोलाविलें आहे. मोया, तूं चिंता करूं नकोस ! हेप्बर्न म्हणाला, 'सर्व कांहीं ठीक होईल. मीं येथें आलों याबद्दल मला आनंद होतो.

'पण तुम्हीं डेटमोल्डना येथून टेलिफोन केलात त्यामुळें ही गोष्ट

बाहेर फुटली असणार ?' ती म्हणाली, 'इथल्या टेलिफोनवर प्रेसिडेंटचें नियंत्रण आहे.'

'कांहीं हरकत नाहीं.' हेप्बर्न म्हणाला, 'जर तुझ्या मालकानें मला येथें पकडण्याचा प्रयत्न केला तर मीं कोण आहे हें जाहीर करीन आणि तुम्हां सर्वांनाच अटक करीन.'

थोडयाच वेळांत तेथल्या दारावर कुणीतरी थांप मारली आणि डॉ. डेटमोल्ड आले असावेत, अशा कल्पनेनें मोया दार उघडण्यासाठीं धांवली. तिनें दार उघडनाच एक. उंच व्यक्ति रॉबीच्या खोलींत शिरली, त्या व्यक्तीनें अंगावर पायघोळ कोट चढविला होता आणि रशियन पद्धतीची गरम टोपी चढविली होती. पण त्या व्यक्तीच्या हिरव्या डोळ्याकडे पाहतच हेपबर्न हादरला होता, खुद्द डॉ. फू-मांच्यूच तेथें आला होता !

डॉ. फू-मांच्यूनें डोक्यावरची टोपी काढून तेथल्या खुर्चीवर उडविली आणि नंतर तो डॉ. बर्नेटकडे वळून म्हणाला, 'तुम्हीं या मुलावर औषधोपचार करीत असतां काय ?'

डॉक्टरांना त्याचा तो हुकमी स्वभाव आवडला नाहीं. ते म्हणाले, 'होय, पण आपण कोण ?'

फू-मांच्यूनें त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून रॉबीला तपासलें. नंतर तो कठोर स्वरांत मोयाला म्हणाला, 'मला हें अगोदर कां कळविण्यांत आलें नाहीं ?'

ती घाबरून म्हणाली, 'प्रेसिडेंट, मला कसें माहित असणार ? कीं हा आजार--'

'तुझें म्हणणें बरोबर आहे.' तो मान हालवून म्हणाला, 'मी अतिशय कामांत होतों त्यामुळें माझी चूक झाली. त्या भागांत डिफ्थेरियाची सांथ आहे हें माहित असतांना मी रॉबीला तेथें पाठविलें. मोया, तूं स्त्री आहेस एवढाच तुझा गुन्हा आहे. अगदीं शेवटच्या क्षणापर्यंत तूं आपल्या

ज...८

कर्तव्यांत मुळींच कसूर केली नाहींस तेव्हां मलाहि माझें कर्तव्य केलें पाहिजे. मी तुझ्या मुलाच्या सुरक्षिततेची हमी घेतली होती आणि आतां-पर्यंत मी माझें प्रत्येक वचन पाळलें आहे.'

'तुम्हीं बाजूला व्हा.' डॉ. बर्नेट रागानें पण हळूंच म्हणाले, 'कोणत्याहि क्षणीं डॉ. डेटमोल्ड येथें येण्याची शक्यता आहे.'

'डॉ. डेटमोल्ड मूर्ख आहे. त्यानें येथें येण्याचें कांहीं कारण नाहीं असें मी त्याला कळविले आहे.' फू-मांच्यू म्हणाला.

'हें तुमचें वर्तन अयोग्य आहे.' डॉ. बर्नेट रागानें म्हणाले, 'तुम्हीं माझ्या पेशंटपासून दूर व्हावें असा माझा तुम्हांला सल्ला आहे.'

डॉ. फू मांच्यूनें रॉबीच्या कपाळावरून हात फिरवला, नंतर खालीं वाकून बोटानें त्याचे ओंठ विलग केले आणि ते तपासले, नंतर विचारलें, 'डॉक्टर, तुम्हीं या मुलाला अॅन्टी टॉक्सीन् कधीं दिलें?'

'गेल्या रात्रीं अकरा वाजतां.'

'म्हणजेच, तुम्हीं त्याला तें देण्यांत आठ तासांचा उशीर केलात! डॉक्टर, आतां तुम्हीं येथून चालते व्हा! हे कॅ. हेप्बर्न मला मदत करतील!' फू–मांच्यू म्हणाला.

डॉ. बर्नेट एखाद्या यंत्राप्रमाणें तेथून निघून गेले. डॉ. फू–मांच्यूनें नांवानें आपला उल्लेख करावा याचें हेप्बर्नला आश्चर्य वाटलें, जणू काय त्याच्या मनांतील विचार फू–मांच्यूनें ओळखले असावेत असेंहि आढळून आलें.

'कॅ. हेप्बर्न, त्यांत कांहींच नवल नाहीं, तुम्हीं सर डेनिस नेलँड स्मिथना येथूनच टेलिफोन केलात आणि तुमचें तें संभाषण मी प्रवास करीत असतांना मला वाटेंत कळविण्यांत आलें, पण चला, आपणांला आतां ताबडतोब या मुलावर शस्त्रक्रिया केली पाहिजे. तुम्हीं माझी ती पेटी उघडा.' फू–मांच्यू म्हणाला.

त्यानें पुन्हां रॉबीच्या तोंडावरून आपला हात फिरवला, त्याबरोबर

त्या मुलानें आपले डोळे उघडलें आणि तो हंसला, ‘ पिवळे काका, तुम्हीं आलांत ? मला फार–फार आनंद झाला !’

त्याच्या कपाळावर एक बोट टेकून फू–मांच्यू म्हणाला, ‘ रॉबी, तूं आतां झोंप, ’ आणि त्याबरोबर रॉबीला गाढ झोप लागली.

‘ त्याला गुंगीचें औषध द्यायला हवें ना ?’ हेप्बर्ननें घोगऱ्या स्वरांत विचारलें.

‘ मी शस्त्रक्रिया करतांना क्लोरोफॉर्मचा कधींच उपयोग करीत नाहीं. त्यामुळें आजारी माणसाची नैसर्गिक प्रतिकारशक्ति कमी होते. ’ फू–मांच्यू म्हणाला.

इकडे नेलँड फू–मांच्यूचा जारीनें शोध करीत होता. पहांटेचे सव्वा तीन वाजले होते आणि तेवढ्या अवधींत फू–मांच्यू न्यूयॉर्क शहराच्या हद्दींत पोहोंचला होता अशी त्याची खात्री होती.

रॉबी जेथें रहात होता त्या इमारतीजवळ पोहोंचल्यानंतर त्याच्या बरोबर असलेला जॉन्सन म्हणाला, ’ कॅ. हेप्बर्न येथून बाहेर पडले नाहींत हें मी आपणांला निश्चित सांगूं शकतों. या इमारतीवर आपल्या गुप्त पोलिसांचा पहारा आहे. एक उंदीरहि त्यांची नजर चुकवून येथून बाहेर पडूं शकणार नाहीं. ’

आणि त्याच वेळीं मार्क हेप्बर्न डॉ. फू-मांच्यूला शस्त्रक्रिया करण्यास मदत करीत होता. आणि नेलँडनें त्या परिस्थितींत काय केलें असतें याबद्दल विचार करीत होता.

तसली शस्त्रक्रिया त्यानें कधींच पाहिली नव्हती. डॉ. फू–मांच्यूनें शस्त्रक्रियेच्या इतिहासांतील एक अपूर्व चमत्कार घडविला होता.

‘ कॅ. हेप्बर्न, या ठिकाणीं तुमचे लोक येऊन गडबड करणार नाहींत अशी दक्षता घ्या. ’ फू–मांच्यू म्हणाला, ‘तुम्हीं लष्करी अधिकारी आहांत, आणि डॉक्टरहि आहांत. या मुलाची किती नाजूक अवस्था आहे हें तुम्हांला सांगायला नकोच. ’

डॉ. फू–मांच्यू पांच तास रॉबीच्या उशाशीं बसला होता आणि अधून मधून त्याच्यावर औषधोपचार करीत होता. घामाघूम झालेला हेप्‌बर्न त्याच्याजवळ उभा होता. चार वाजेपर्यंत जर रॉबीनें टिकाव धरला तर त्याला भीति नाहीं, हें हेप्‌बर्नला माहित होतें.

चाराचे टोले पडले, रॉबीनें डोळे उघडले, आपल्या पिवळ्या काकाकडे पाहून हंसण्याचा प्रयत्न केला. नंतर पुन्हां डोळे मिटले आणि त्याच्या उशाशीं ध्यानस्थ बसलेला तो जगांतील सर्वोत्कृष्ट डॉक्टरहि ते मिटलेले चिमणे डोळे पुन्हां उघडूं शकणार नाहीं असें हेप्‌बर्नला वाटलें.

पहांट झाली आणि नेलँडनें पुढल्या दारावरील घंटी वाजविली. झोंपेंतून उठलेल्या रखवालदारानें डोळे चोळीतच दार उघडलें. तो शरीरानें चांगला धिप्पाड होता.

'तुम्हीं कुठें चालला आहांत?' त्यानें जोरांत विचारलें.

'मला वरच्या मजल्यावर जायचें आहे. गडबड करूं नकोस.' नेलँड त्याला आपला सरकारी बिल्ला दाखवीत म्हणाला.

त्या माणसानें बिल्ला आणि नेलँडच्या पाठीमागें उभ्या असलेल्या जॉन्सनच्या हातांतील पिस्तूल पाहिलें आणि निमूटपणें नेलँडला लिफ्टमधून वरच्या मजल्यावर नेलें.

नेलँडनें त्याला खालीं पाठविलें, त्याच्याबरोबर आणखी तीन माणसें होतीं. हेप्‌बर्नबद्दल वाटणाऱ्या चिंतेमुळेंच त्यानें ती हालचाल केली होती.

तो आपल्या जोडीदारांना म्हणाला, 'कोणत्याहि गोष्टीला तोंड देण्याची तयारी ठेवा पण माझ्याकडून सूचना मिळाल्याशिवाय कोणतीहि हालचाल करूं नका.'

तो पुढें झाला आणि त्यानें दारावरील घंटी वाजविली. क्षणभर शांतता पसरली, तें दार जबरदस्तीनें फोडण्याचीहि त्याची तयारी होती. तो पुन्हां घंटी दाबणार होता तोंच तें दार उघडलें गेलें, समोर कॅ. हेप्‌बर्न उभा होता.

नेलँडला अतिशय समाधान वाटलें: हेप्‌बर्न सुखरूप होता. बाहेरच्या माणसांना आपली जागा न सोडण्याची सूचना देऊन तो आंत गेला. ती मोयाची बैठकीची खोली होती पण ती रिकामी होती.

'सर डेनिस, तुम्हांला माझ्याबद्दल चिंता वाटली असणार हें मी जाणतों.' हेप्‌बर्न म्हणाला, 'पण जेव्हां तुम्हीं सर्व हकीकत ऐकाल तेव्हां दुसरा मार्गच नव्हता हें तुमच्याहि लक्षांत येईल.'

'हेप्‌बर्न, मी तुझ्यावर एक मोठी जबाबदारी सोंपविली होती.' सर नेलँडलनें बोलण्यास सुरवात केली.

'इतक्या मोठ्यानें बोलूं नका! हेप्‌बर्न म्हणाला, 'त्यानें जरी असंख्य गुन्हे केले असले तरी आजच्या रात्रीनंतर मला माफ करा. मोयानें ती बातमी ऐकली तेव्हां ती बेशुद्ध झाली–'

'म्हणजे, तिच्या मुलाचें–'

'नाहीं, तो जगेल!' हेप्‌बर्न म्हणाला.

'मला हें ऐकून आनंद झाला.' नेलँड मनःपूर्वक म्हणाला, 'आतां आपण डॉ. फू–मांच्यूला–'

मधलें दार उघडलें गेलें आणि डॉ. फू–मांच्यू बाहेर आला. नेलँडनें लागलीच त्याच्यावर पिस्तूल रोंखलें.

'सर डेनिस, या नाटकाची कांहींच आवश्यकता नाहीं. हा कांहीं कुठल्याहि चित्रपटाचा स्टुडिओ नाहीं. कॅ. हेप्‌बर्न, त्या मुलाच्या उपचारासंबंधींच्या सर्व सूचना मी टेबलावर लिहून ठेवल्या आहेत आणि त्याला कोणत्या डॉक्टराच्या स्वाधीन करावें तेंहि लिहिलें आहे, मी माझें वचन पूर्ण केलें आहे. सर डेनिस, आतां मी तुमचा कैदी आहें.'

कॅ. हेप्‌बर्नला काय करावें तें समजेना, पण नेलँड करड्या स्वरांत म्हणाला, 'डॉ. फू–मांच्यू, तुम्हीं माझ्यापुढें चालूं लागा.'

आपली औषधाची छोटी बॅग खाकोटीला मारून ऐटबाज पावलें टाकीत डॉ. फू–मांच्यू तेथून बाहेर पडला. बाहेरच्या तिघांनीं त्याच्यावर पिस्तुलें रोखलीं.

'लिफ्टचें बटन दाब !' नेलँड आपल्या एका मदतनिसाला म्हणाला.

तो माणूस पुढें सरसावला आणि फू–मांच्यू म्हणाला, 'सर डेनिस' या फडताळांतील माझा कोट आणि टोपी काढून घेण्यास तुमची परवानगी आहे ना ?'

त्यानें तेथलें फडताळ उघडलें, फडताळापासून अवघ्या चार हातांवर नेलँडसहित चौघांनीं पिस्तुलें रोंखली होतीं. फडताळांतील खुंटीवर टांगलेला कोट आणि टोपी त्यांना दिसत होती.

फू–मांच्यूनें त्या फडताळांत प्रवेश केला आणि त्याबरोबर नेलँडनें पुढें उडी घेतली, त्यानें आंत पाऊल टाकतांच फडताळ बंद झालें होतें, नेलँडनें तें जोरात उघडलें,

आंतल्या खुंटीवर कोट आणि टोपी पूर्ववत् होती, पण डॉ. फू–मांच्यू अदृश्य झाला होता !

१४

फू–मांच्यूचा शेवट ?

'हेप्बर्न, मी आतां म्हातारा होत चाललों आहें. मला वाटतें मी पेन्शन घेतली पाहिजे.' नेलँड म्हणाला.

'डॉ. फू-मांच्यूची तशीच इच्छा असणार.' हेप्बर्न म्हणाला.

'डॉ. फू-मांच्यू केवळ त्या इमारतींतूनच बाहेर पडला नव्हता तर त्यानें न्यूयॉर्क शहरांतूनहि निसटण्यांत यश मिळविलें होतें. मला वाटतें तो शिकागोकडे जात असावा. या शनिवारीं सॉलव्हेटी तेथल्या जाहीर सभेंत भाषण करणार आहे. त्या भाषणावरच निवडणुकीचें यश अवलंबून आहे.'

'आणि फू-मांच्यूच्या वाटेवरच फादर अॅबॉटचें निवासस्थान आहे आणि ते आज रात्रीं सर्व अमेरिकेला उद्देशून रेडिओवरून भाषण करणार आहेत.' नेलँड म्हणाला, 'माझी खात्री आहे कीं डॉ. फू-मांच्यू तें भाषण होऊं न देण्याचा अटोकाट प्रयत्न करील.'

त्या रात्रीं फादर अॅबॉटच्या मनोऱ्याभोवतीं नेलँडनें लष्कराचा पहारा ठेवला होता. मनोऱ्याकडे जाणारे सर्व मार्ग रोखण्यांत आले होते आणि त्या प्रदेशावर झगझगीत विद्युत् प्रकाश सोडण्यांत आला होता. त्या प्रकाशांत एखादा लहानसा उंदीरहि पहारा करणाऱ्यांना दिसला असता.

फादर अॅबॉटच्या बैठकीच्या खोलींत खास मामक्रोफोनची व्यवस्था करण्यांत आली होती आणि ते तेथूनच भाषण करणार होते. भाषण बरोबर आठ वाजतां सुरू होणार होतें, आणि फादर अॅबॉटजवळ खुद्द नेलँड हेप्बर्न-सह बसला होता. त्या सर्वांचे डोळे समोरच्या घड्याळावर खिळले होते.

आठाला तीन-चार मिनिटें होतीं आणि त्याच वेळीं खालीं पहारा करणारे लोक आरोळ्या ठोकीत आहेत असा आवाज झाला, विमानाचाहि आवाज येत होता आणि तें विमान मनोऱ्याकडे येत होतें.

नेलँड खिडकीजवळ गेला, आकाशांत सर्च लाईटचा प्रकाश सोडण् आला होता. एकाएकीं नेलँड मागें वळला, त्यानें फादर अॅफॉटचा ह तो पकडला आणि त्यांना जोरानें दाराकडे ढकललें. त्याबरोबरच त्यानें पुढें ती घेऊन तें दार उघडलें होतें.

'सर्वांनीं खालीं चलावें!' तो जोरानें ओरडला.

फादर अॅबॉट भांबावले होते. पण क्षणांतच त्यांनीं स्वतःला सावरलें. ते नेलँड आणि हेप्बर्नसह धांवतच खालच्या मजल्यावर गेले आणि त्याच वेळीं वर मोठा स्फोट झाला. जणू काय धरणीकंपाचा स्फोट व्हावा त्याप्रमाणें सर्व मनोरा थरथरला. चमत्कारिक वास सुटला होता पण आगीचीं चिन्हें नव्हतीं. तळमजल्यावर पहारा करणाऱ्या लोकांचीं धांवपळ उडाली होती.

'कुणी दगावलेलें दिसत नाहीं याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतों.'

नेलँड म्हणाला, ' विमानाला खात्रीनें हांकलण्यांत आलें असणार, पण हेप्बर्न, तुला हा वास ओळखतां येतो काय ?'

' ऑक्सिजनचेंच कसलेंतरी मिश्रण तयार केलेलें दिसतें. ' तो म्हणाला, ' कांहीं कारणामुळें येथें आग लागूं नये अशी फू–मांच्यूची इच्छा असावी. '

अतिशय सावधगिरीनें ते जिना चढून वर गेले. आतां फादर अॅबॉटच्या बैठकीच्या खोलीच्या छताला मोठालीं भगदाडें पडलीं होतीं, त्यांतून आकाशातील तारका दिसत होत्या. दोन भिंती संपूर्णतया नष्ट झाल्या होत्या, तेथले दिवे नाहींसे झाले होते. नेलँडच्या खांद्याला कुणीतरी स्पर्श केला, त्यानें मागें वळून पाहिलें तेव्हां त्याला अॅबॉट दिसलें.

' पहा सर डेनिस !' ते बोटानें दाखवीत म्हणाले.

कोंपऱ्यातील मायक्रोफोन शाबूत होता.

' ही ईश्वराच्या अस्तित्वाची निशाणी आहे !' फादर अॅबॉट म्हणाले, ' मी रात्रीं राष्ट्राला उद्देशून भाषण करावें अशी ईश्वराची इच्छा आहे !'

× × ×

शिकागो शहरांतील एका पहिल्या दर्जाच्या हॉटेलांतील खोलींत वस्त्रानीं नटलेली लोला बसली होती. त्या दिवसांच्या सर्व वर्तमानपत्रांनीं मोठाले फोटो छापले होते. लवकरच तिचा विवाह होणार होता आणि अमेरिकेच्या भावी अध्यक्षाची वाग्दत्त वधू या नात्यानें तिला अफाट प्रसिद्धी मिळावी हें स्वाभाविकच होतें.

लोक जरी तिला हार्वेची प्रियकरीण समजत होते तरी सुरवातीपासूनच ती सॉल्व्हेटीवर प्रेम करीत होती. पण अलिकडे तिच्या मनांत त्याच्याबद्दल थोडा संशय निर्माण झाला होता. अनेक वेळां तो त्याच्या शरीरसंरक्षकांना झुकांडी देऊन कुठेंतरी जात असे आणि शिकागो शहरांत आल्यापासूनच तर तो वारंवार तशाप्रकारें जात होता. कदाचित् तो प्रेसिडेंटच्या कामासाठीहि जात असेल पण तसें असलें तरी त्यानें तिला विश्वासांत कां घेऊं नये ?

आज रात्रींहि तो तशाच प्रकारें तिला कांहीं न सांगतां बाहेर गेला होता. आज रात्रीं...आज रात्रीं आठ वाजतां फादर ॲबॉटचें रेडिओवरून भाषण होणार होतें. तिनें दचकून घड्याळाकडे पाहिलें, आठ वाजायला अर्धें मिनीट होतें. तें भाषण होणार नाहीं असें तिला सॉल्व्हेटीनें सांगितलें होतें.

ती रेडिओकडे गेली आणि तिनें बटन फिरविलें. अचानक आवाज ऐकू आला, 'आतां फादर ॲबॉट राष्ट्राला उद्देशून भाषण करतील.' ती जवळच्या कोचावर बसली आणि तिला फादर ॲबॉटचा आवाज ऐकूं आला. ते सॉल्व्हेटीपेक्षांहि प्रभावी वक्ते होते, त्यांच्या वक्तृत्वामुळेंच अमेरिकन जनतेला त्यांचें अतिशय आकर्षण वाटत असे.

'अमेरिकेच्या नागरिकांनो, एका मिनिटापूर्वींच एक चमत्कारिक प्रकारचा टॉर्पेडो विमानांतून माझ्या निवासस्थानावर टाकण्यांत आला, त्यामुळें माझी बैठकीची खोली उध्वस्त झाली, पण मायक्रोफोन शाबूत राहिला. ईश्वराचीच अशी इच्छा आहे कीं मी आज भाषण करावें, तशी ज्याची इच्छा नव्हती तो माणूस कोण आणि कशाप्रकारचा आहे हें मी आतां सांगणार आहें आणि तुम्हींहि तें लक्षपूर्वक ऐकावें अशी माझी विनंति आहे.'

लोला हादरली, प्रेसिडेंटचा डाव हाणून पाडण्यांत आला होता ! तो दुष्ट फादर ॲबॉट आतां त्यांच्या सर्व आशांचा चुराडा करणार होता, ती अगदीं एकतानतेनें ऐकूं लागली.

'तुम्हांला माहित आहे कीं, तुमच्यापैकीं अनेकजण दिवसभर नोकरी-धंद्याचा निष्फळ शोध करून अगदीं दमून भागून आपल्या घराकडे परततां त्यावेळीं तुम्हांला तुमच्या स्त्रियांच्या दुःखी मुद्रा पहाव्या लागतात आणि भुकेलेल्या मुलांच्या आरोळ्या ऐकाव्या लागतात.'

'हार्वेच्या संस्थेनें तुमच्यापैकीं अनेकांना रोजगार मिळवून दिले आणि बेकारीला बराच आळा घातला ही गोष्ट कुणीहि नाकबूल करीत नाहीं, अशीं लक्षावधि माणसें या राष्ट्रांत आहेत कीं ज्यांना जीवनाला अवश्यक असलेला पैसा हार्वेच्या त्या संघटनेमार्फत मिळूं शकला, पण मी आतां

तुम्हांला कांहीं आंकडे सांगणार आहें त्याचा आपण विचार करावा. ते आंकडे शब्दांपेक्षांहि अधिक परिणामकारक आहेत.'

तीन मिनिटांत फादर ॲबॉटनें आंकडे सांगितले आणि हार्वेच्या निरनिराळ्या चळवळीसाठीं दर आठवड्याला वीस लक्ष डॉलर्स खर्च करण्यांत येतात आणि ते पैसे राष्ट्रांतील धनिक किंवा बँका पुरवीत नाहींत असेंहि सिद्ध केलें.

'तुम्हीं म्हणाल कीं, बाहेरून या देशांत संपत्ति येत आहे ही चांगली गोष्ट आहे. पण माझें म्हणणें आहे कीं, तुम्हीं जरा थांबा आणि विचार करा, श्रम न करतां संपत्ति कधीं मिळूं शकते काय ? कुणी इतकी मोठी संपत्ति दर आठवड्याला आपल्या राष्ट्राला देणगी म्हणून देईल काय ? अचानक संपत्तीचा वारसा मिळाला तरी सुद्धां कांहीं जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. हा जो रहस्यमय पैसा आपल्या देशांत येतो त्यामुळें आपणांवर कोणती जबाबदारी पडते ? तें मी तुम्हांला सांगतों.

'परकीय पैशानें तुम्हांला विकत घेण्यांत येत आहे. एका निर्दय मालकाचे तुम्हीं गुलाम बनत चाललां आहां, सोन्याच्या गोळ्यानें तुमचें तोंड बंद करण्यांत येत आहे. हार्वेची ती संस्था, तिचें तें उदात्त ध्येय हें सर्व थोतांड आहे. त्या संस्थेमार्फत मिळणारे पैसे स्वीकारून तुम्हीं आपला देश परकीय सत्तेला विकत आहां. अशाप्रकारें पैसे चारून अमेरिकेचा ताबा मिळविण्याचें भयानक कारस्थान आहे. तें कुणाचें आहे हें तुम्हांला माहित आहे ? तो एक चिनी माणूस आहे !

'आज रात्रीं माझ्या स्वतःच्या खोलींत माझा खून करणारा हा माणूस कोण ? केवळ ईश्वरी इच्छेमुळेच मी वाचलों आणि म्हणूनच तुम्हांला तें सांगू शकतों. सर्व सुधारलेल्या जगाचे पोलीस ज्याचा शोध करीत आहेत असा हा आंतरराष्ट्रीय गुन्हेगार आहे आणि त्याचें नांव आहे डॉ. फू-मांच्यू ! माझ्या मित्रांनो, हा डॉ. फू-मांच्यू अमेरिकेंत आहे. त्यानेंच आज रात्रीं माझ्या खुनाचा प्रयत्न केला, हार्वेच्या सर्व संघटनांचा तोच पडद्याआड असलेला सूत्रधार आहे !

' हें सत्य आहे, फादर ॲबॉट कधींच असत्य बोलत नसतो हें साऱ्या जगाला माहित आहे,अशा त्या भयंकर कारस्थानी माणसाला तुम्हीं अमेरिकेचें अध्यक्षपद बहाल करणार आहांत आणि तो आपला गुलाम सॉलव्हेटी याला पुढें करून तुमच्यावर राज्य करणार आहे. मी तुम्हांला हेंहि सांगतों कीं सॉलव्हेटीला ती जागा मिळावी म्हणून हार्वेचा खून करण्यांत आला आहे.

' सॉलव्हेटीच्या विवाहाचा विषय आतां सर्वतोमुखी झाला आहे. पण आपल्या कायद्याच्या दृष्टीनें तें लग्न बेकायदेशीर आहे. मी तसें म्हणतों. याला तीन करणें आहेत : एक, सॉलव्हेटी आपल्या चिनी मालकाच्या हातांतील खेळणें आहे. दुसरें, तो धर्मोपदेशक आहे आणि त्याला विवाह करण्याचा अधिकार नाहीं. तिसरें, तो विवाहित आहे. '

आतांपर्यंत स्तब्ध बसलेली लोला उडी घेऊनच उभी राहिली, तिचे कान मात्र रेडिओकडे होते.

' एकोणिसशें एकोणचाळीस सालांतील मार्च महिन्याच्या पंचवीस तारखेला लंडन येथील रजिस्ट्रारच्या कचेरींत मरीआना साविनी नांवाच्या एका सोळा वर्षांच्या इटालीयन तरुणीबरोबर त्याने विवाह केला होता. तो अमेरिकेंत आला तेव्हां तीहि गुप्तपणें तेथें आली, तेव्हांपासून ती त्याच्या बरोबर असते आणि आतांहि आहे.... '

ॲबॉटच्या निवासस्थानावर बॉम्ब फेकणारें विमान लष्करी विमानानें खालीं पाडले होते. अर्ध्या तासाच्या आंत पोलिसांना तें विमान मिळालें, पण त्या विमानांत माणसें नव्हती. तें विमान जपानी होतें, त्या विमानाचे सुटे भाग आणून नंतर तें जुळविण्यात आलें होतें.

त्या बिमानांत एकंदर चार माणसें असावींत असें पावलांच्या खुणांवरून नेलॅंडनें सिद्ध केलें, त्याने आणखी शोध केला तेव्हां नदीकिनाऱ्यावरील एका माणसाची मोटारबोट विकत घेऊन ते चौघे नदी मार्गानें निघून गेलें अशी त्याला बातमी मिळाली.

' आपणांला फार उशीर झाला नाहीं तेव्हां आपण त्याला पकडूं ' नेलॅंड आत्मविश्वासाने म्हणाला, ' आपला डाव फसला हें मांच्यूच्या लक्षात आलें आहे '

'तर मग आतां सॉलव्हेटीचें काय होणार ? ' हेप्बर्नने विचारलें,

'आतां ईश्वरच त्याचें संरक्षण करो ! ' नेलँड म्हणाला, 'त्यानें आपला पूर्वेतिहास फू-मांच्यूली कळूं दिला नव्हता आणि त्याबद्दल त्याचा सूड घेण्यांत येईल यांत शंकाच नाहीं. '

एका लढाऊ आणि वेगवान मोटारबोटीनें त्यांचा प्रवास सुरू झाला, मोटार बोटीवरील रेडिओवरून त्यांना प्रवासांतच एक बातमी ऐकावयास मिळाली.

'शिकागो शहरांत नुकतीच एक भयानक घटना घडली. त्या बाईचें नांव मिसेस् व्हॅलिरी असें होतें आणि ती अतिशय सुंदर होती, ती एकटीच रहात होती, पण तिचा नवरा तिला अधुन मधून भेटावयास जात असे.आज रात्रीं साडे आठ वाजतां तिचा पॉल सॉलव्हेटीबरोबर विवाह ठरला होता. मिस् लोला डयूमास त्या बाईच्या घरीं गेली आणि तिला एक भयानक दृश्य पहावयास मिळालें.

'मिसेस् व्हॅलिरी आणि पॉल सॉलव्हेटी हें दोघेहि तेथें मृतावस्थेंत पडले होते आणि त्यांच्या तोंडांवर शेंदरी ठिपके होते. मिस् डयुमास तो भयानक प्रकार पहातांच शेंदरी राण्या असें मोठ्यानें ओरडली आणि बेशुद्ध झाली. शिकागो पोलीस या रहस्यमय प्रकरणाचा शोध करीत आहेत. या घटनेचा राष्ट्राच्या राजकारणावर गंभीर परिणाम होणार आहे. '

\+ + +

'ती पहा मोटारबोट, ' नेलॅड मोठ्यानें ओरडला.

पण त्याच वेळीं त्याला एक विलक्षण दृश्य पहावयास मिळालें वैमानिक मोटारबोट चालवीत होता. पोलीस मागें लागल्यामुळें आपण कुठें चाललों आहोंत याचें त्याला भान नव्हतें, आणि त्याच्यापासून थोडयाच अंतरावर एक प्रचंड धबधबा होता.

आणि मोटार बोटींत मोठी चुरशीची झटापट चालली होती. फू–मांच्यू बरोबर त्याचा वृद्ध शिल्पकार त्वेषानें लढत होता आणि सॅम् पॅक

त्याला पकडण्याचा प्रयत्न करीत होता. त्या वृद्ध शिल्पकारानें कित्येक वर्षें फू-मांच्यूचा जाच सहन केला होता आणि आतां तो अगदीं ऐनवेळीं उलटला होता.

फू-मांच्यूच्या मोटार बोटीमागें दुसऱ्या लढाऊ मोटार बोटींत नेलँड आणि हेप्बर्न होते. त्याच्या मागें आणखी कित्येक मोटारबोटी होत्या आणि त्यांत पोलीस होते. वर लष्करी विमानें घिरट्या घालीत होतीं आणि पुढें नायगाराचा प्रचंड धबधबा होता.

फू-मांच्यूला मागें वळतां येत नव्हतें. त्यांतच त्याला त्या वेड्या शिल्पकाराबरोबर झगडावें लागत होतें, अचानक त्याची मोटारबोट वेगवान प्रवाहांत सांपडली आणि उलटली, नेलँडनें दीर्घ निश्वास सोडला.

डॉ. फू-मांच्यूंत जरी आश्चर्यकारक शक्ति होती, जरी तो दुनियेचा महान् जादूगार होता तरी तो आतां स्वतःला वाचवूं शकत नव्हता. प्रवाहा बरोबर गटांगळ्या खात तो धबधब्याच्या कांठावर पोहोंचला होता. तरीहि तो वेडा आणि वृद्ध शिल्पकार त्याच्या मानेला विळखा घालूनच होता. क्षण भरच ती जोडी कांठावर दिसली, नंतर शेंकडों फुटांवरून खालीं कोसळली.

ज्याची सर्व दुनियेला दहशत वाटत होती. निसर्गाची घडण बदलण्याची ज्याची हिंमत होती, अखिल जगतावर आपलें साम्राज्य पसरविण्याची ज्याची महत्वाकांक्षा होती असा अपूर्व आणि अलौकिक फू-मांच्यू शेवटीं त्या धबधब्यांत सांपडून नाहिंसा झाला होता !

[समाप्त]

स्थापना] **साहित्य-रस स्पर्धा** [१९५७

(पहिलीच निर्विवाद कौशल्यपूर्ण स्पर्धा)

—: ६९, शिवाजी पार्क रोड नं. १, मुंबई २८ :—

स्पर्धा कशी सोडवाल ?

या स्पर्धेचें उत्तर निश्चितच आहे. साहित्य-रस स्पर्धेसाठीं आम्हीं मराठींतील अग्रेसर लेखकांची एक मर्यादित यादी प्रसिद्ध केली आहे. बाजूला दिलेलीं विधानें या यादींतीलच लेखकांच्या लिखाणांतून घेतलेले संपूर्ण व स्वयंपूर्ण वाक्यांचे उतारे आहेत. प्रत्येक विधानांत शब्दांची एक जोडी दिलेली आहे. त्या जोडीपैकीं एक लेखकाचा मूळ शब्द आहे. तो मूळ शब्द आपण आपली बुद्धि, तारतम्य व अनुभव यांचा उपयोग करून शोधून काढा; आणि प्रवेश-पत्रांत निवडलेला शब्द ठेवून दुसरा शब्द खोडून टाका. अशा प्रकारें १२ शब्द निर्देशित केल्यावर आपलें एक प्रवेशपत्र पूर्ण होईल. —**संपादक**

वैशिष्ट्यें

(१) निर्विवाद कौशल्यपूर्ण स्पर्धा.

(२) साहित्य-रस स्पर्धेचें अधिकृत उत्तर ठराविकच आहे. संपादक तें ठरवीत नाहीं व त्यांत फेरबदलहि करूं शकत नाहीं. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांना नशिबावर अवलंबून राहण्याचें कारण नाहीं. जे स्पर्धक कौशल्य, बुद्धि तारतम्य व प्रयत्न यांचा उपयोग करतील त्यांना हमखास यश मिळेल.

(३) प्रथम विजेत्याला पुस्तकांची भेट.

प्रवेश-पत्रिका

साहित्य-रस स्पर्धेच्या प्रवेश-पत्रिका खालीं दिलेल्या नियतकालिकांतून प्रसिद्ध होतात.

मराठा, सांज मराठा, नवाकाळ, संध्याकाळ, नवशक्ति, केसरी, स्वराज्य, छाया, गांवकरी, मराठवाडा, शृंगार, मातृभूमि, सोलापूर समाचार, तरुण भारत, रसरंग, विविधवृत्त, फिल्म-केसरी, नवयुग, आलमगीर, इत्यादि.

प्रवेश-पत्रिका व रोखीच्या पावत्या स्थानिक एजंटांकडून मिळवा अगर आम्हांस वरील पत्त्यावर लिहा.

हजारों रुपयांचीं बक्षिसें दर पंधरवड्यास जिंका !

[ह्या महिन्यांत क्र. ५२ ची स्पर्धा चालू आहे]